आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ जून २०११ | वर्ष २८ | अंक ६

# शेतकरी संघटक


स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹ १०



शेतकऱ्यांनी सहकार किती दिवस पोसावा असा प्रश्न सामान्यांना पडला आहे. सहकारात स्पर्धा आल्याशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. - मा. रवि देवांग



शेतकऱ्यांचे पैसे खाऊन आमच्या परिसरात अनेक संचालक चेअरमननी स्वतःचे खासगी कारखाने कर्नाटकातसुद्धा काढले आहेत. - मा. संजय कोले



सहकारी कारखान्यांपैकी कित्येक कारखाने हे आजारी अवस्थेत आहेत.
- मा. वामनराव चटप



# अबब ! आणखी एक महाघोटाळा

शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ६ । २१ जून २०११

मूल्य : ₹ १०

**अंकाची किंमत पूर्वीएवढीच**

सन्माननीय वाचक, कागदाचे आणि छपाईचे दर वाढल्याने अंकाच्या किमतीत अपरिहार्य वाढ होत आहे. त्यामुळे मागील अंकाची किंमत आम्ही वाढविली होती, मात्र वाचकांकडून आलेल्या प्रतिक्रियांमुळे यापुढे किरकोळ अंकाची विक्री किंमत पूर्वीप्रमाणेच १० रुपये राहील आणि **वार्षिक वर्गणी : ₹ २०० फक्त** राहील. (द्वैवार्षिक, त्रैवार्षिक, आजीव आदी प्रकार नसल्यामुळे फक्त वार्षिक वर्गणीच स्वीकारली जाईल.) वर्गणी **'शेतकरी संघटक'** या नावाने औरंगाबाद कार्यालयात पाठवावी.

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठरचना/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको-औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

जागरण
**कॅगने उघड केला साखर उद्योगातील प्रचंड गैरव्यवहार**
संपादन : ज्ञानेश्वर शेलार ........ ३

मुद्दा
**आंदोलकांवर राष्ट्रदोहाचे कलम**
रवि देवांग ........ १२

स्वतंत्र
**बाबा अण्णा आणि सरकार : नपेक्षा उशिरा बरे?**
विनय हर्डीकर, अनु. शशांक जेवळीकर ........ १५

मधोमध
**सरकारशाही राज्यव्यवस्था**
दत्ता जोशी ........ १६

कॉमन नॉन सेन्स
**राजकीय बुवाबाजीवर आत्मघाती हल्ला**
सुधाकर जाधव ........ १९

वाङ्मय शेती
**कुलगुरू साहेब आव्हान स्वीकारा...**
गंगाधर मुटे ........ २२

भारत की जुबानी
**दु:खी कार्यकर्ता : विभाजित समाज**
ॲड. दिनेश शर्मा ........ २५

विशेष
**कारखान्यांसाठी भूसंपादन की शेतकऱ्यांच्या जमिनीवर डाका?**
ॲड. कांचन कोतवाल ........ २८

(उ)संतवाणी
**मृगारंभाच्या शुभेच्छा**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ ३१

# साखरेचा काळा कोळसा...

तोंड गोड करणाऱ्या साखरेच्या कारखानदारीत किती कडवटपणा भरलेला आहे, याचा विस्ताराने आढावा आपण या अंकात घेतला आहे. महालेखापालांच्या अहवालात राज्यातील साखर कारखानदारीची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. कारखानदारी, राज्य सहकारी बँक आणि मस्तवाल राजकारणी यांच्यातील अंतर्संबंध या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित होताना दिसत आहेत. शेतकऱ्यांना अनुभवातून आणि शेतकरी संघटनेच्या माध्यमातून माहीत असणाऱ्या बाबी आकडेवारी आणि अहवालांच्या रूपात न्यायालयाच्या सहकार्यामुळे सगळ्यांसमोर येत आहेत.

राजकारण मूल्याधीष्ठित असायला हवे अशी मागणीही करण्यास लाज वाटावी अशी ही वस्तुस्थिती 'कॅग'च्या अहवालाने समोर आली आहे. सामान्य शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी म्हणत सुरू झालेली सहकार चळवळ संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्यात फोफावली. बंदिस्त अर्थव्यवस्थेच्या काळात झोनबंदीसारख्या युक्त्या वापरत ही कारखानदारी वाढवण्यातला राजकीय फायदा मिळायला लागल्यावर प्रोत्साहित होऊन विविध क्षेत्रांमध्ये सहकार पद्धतीचा शिरकाव झाला. यामुळे व्यापक प्रमाणावर समाजहित साधले जावे, मोठ्या प्रमाणावर संपन्नता वाढावी आणि लाभार्थींची संख्या वाढावी हा उद्देश अपेक्षित असताना प्रत्यक्षात संपन्नता तर वाढत गेली पण लाभ व्यक्तिकेंद्रीत होत गेला आणि लाभार्थींची संख्या हातांच्या बोटांवर मोजण्याएवढीच राहिली. राज्य सहकारी बँकेचे पुरते दिवाळे वाजवत असताना साखरसम्राटांची मात्र दिवाळी साजरी होत होती. राज्याच्या राजकीय अर्थकारणाचा कणा नेमका कोठे आहे, तो किती मजबूत आहे आणि त्याच्या मजबुतीसाठी कोणती यंत्रणा वापरली गेली याचा साक्षात्कार 'कॅग'च्या अहवालातून होतो.

या अहवालातील निरीक्षणे आणि निष्कर्ष या अंकात पुढे नोंदविलेले आहेतच, पण मूळ मुद्दा आहे तो समाजाने अंधपणे टाकलेल्या या मंडळींवरील विश्वासाचा. 'केसाने गळा कापला' हा वाक्प्रचारही निष्प्रभ वाटावा अशी स्थिती या राजकारण्यांनी आणली आहे. 'उसाला रु. २७५० इतका दर दिला तर कारखान्यांची स्थिती दत्त कारखान्यासारखी (आसुर्ले-पोर्ले) होईल. बाजारात साखरेला दर नसताना कर्ज काढून दर देण्याच्या स्पर्धेने कारखान्यांची स्थिती बिकट बनते' असा एक सुविचार 'जाणता राजा' श्री. शरद पवार यांनी २० मे २०११ रोजी मांडला. कागलच्या कारखान्याने या वर्षी २७०० रुपयांचा भाव दिल्याच्या पार्श्वभूमीवर श्री. पवार यांनी कोल्हापुरात हे वक्तव्य केले होते. राजकारणात, सहकार बँकेत आणि मुक्त आर्थिक व्यवस्थेत एवढ्या उलाढाली होत असताना अशी विधाने करून ही मंडळी सामान्य शेतकऱ्यांना आणखी किती काळ मूर्ख बनविणार आहे? उसाला २७५० रुपये दर देण्यासाठी कारखान्यांना कर्ज काढावे लागेल असे वातावरण आधीच तयार करायचे. असे कर्ज काढायचे (आणि पुढे साहजिकच ते बुडवायचे) तर त्या साठी राज्य सरकारला वेठीला धरायचे आणि स्वतःच्या तुंबड्या भरायच्या, असा हा प्रकार.



ही लूट कोणाची आहे? ही सामान्यांच्या पैशांची लूट आहे. जो वर्ग आपले कर न चुकता नियमीतपणे भरतो, आणि अर्थव्यवस्थेतल्या अशा उद्योगांमुळे जो वर्ग कर भरण्याइतक्या उत्पन्नांपर्यंत पोहोचतच नाही अशा सगळ्यांची ही लूट आहे. त्या निधीतूनच सरकारी मदत करण्यात येत असते. सहकारी कारखानदारी उभी करण्यासाठी लागणारा पैसा सरकार आपल्या तिजोरीतून देते. राज्य सहकारी बँकेच्या तिजोरीतील पैसाही अप्रत्यक्षपणे जनतेचाच पैसा असतो. एकीकडे २७०० रुपयांचा भाव देता येणे शक्य नसल्याचा गळा काढायचा आणि दुसरीकडे मात्र राज्याच्या तिजोरीत भरावयाच्या पैशावर डल्ला मारून स्वतःची घरे भरायची, हा दुटप्पी खेळ आता थांबला पाहिजे. ४५ दिवसांत हिशेब पूर्ण करण्याचे असलेले नियम धाब्यावर बसवून या हिशेबांनाच फाटा देण्याचे अनेक प्रकार या लेखापरीक्षणातून उघड झाले आहेत. ही सारीच काळ्या पैशाची उगमस्थाने ठरली आहेत.

देशभरात काळ्या पैशाविषयी आणि भ्रष्टाचाराविषयी मोठी चर्चा सुरू आहे. असा काळा पैसा कोणकोणत्या मार्गांनी उभा राहतो यांची संशोधने चालू असताना एकेकाळी साऱ्या देशात आदर्श म्हणवल्या गेलेल्या महाराष्ट्रातील सहकार चळवळीत झालेला हा विश्वासघात इतिहासात काळ्या अक्षरांनी नोंदविण्यासारखा आहे. कर्ज बुडविणे, हिशेब न देणे, हिशेबात खोट आणणे, कर न भरणे, अनुत्पादक गुंतवणूक करणे, शेतकऱ्यांकडून जमा केलेले भागभांडवल स्वतःकडेच ठेवून घेणे, मशीनरी खरेदीच्या टेंडरमध्ये घोळ घालणे हे आणि असे अनेक गैरव्यवहार कारखानदारांनी केले आहेत. नव्या कारखान्यांसाठी कर्ज उचलल्यानंतर तीन वर्षांत कारखान्यांची उभारणी बंधनकारक असताना ती ५ ते ११ वर्षांत करणे किंवा उभारणीच रखडणे असे प्रकारही झालेले आहेत.

हा पैसा कोठे गेला? शेतकऱ्याने कर्ज बुडविले तर त्याची मालमत्ता विकून वसुली केली जाते. मात्र कारखान्यांनी कर्जे बुडविली तर संचालक नामानिराळे राहतात आणि सरकार थकहमी भरते. राजकीय नेत्यांची संस्थाने अशा प्रकारे जनतेच्याच पैशातून गब्बर झाली आहेत. सत्तेचा माज यातूनच विकसित होत गेला. दुर्दैवाने कोणताही राजकीय पक्ष या पासून दूर नाही. राजकीय व्यवस्थेचा डोलारा यातूनच उभा राहतो. त्यामुळेच १९९४ मध्ये भाजप-शिवसेनेचा 'झेंडा' विधानसभेवर फडकला तरी त्याचा 'दांडा' अपक्षरुपी पवार समर्थकांच्या हाती होता! अशा या स्थितीत कोणाकडून स्वच्छ कारभाराची अपेक्षा करायची?

तोट्यात जात असलेल्या राज्य सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेकडून प्रशासक नेमला जात असताना, 'कॅग'च्या अहवालातून राज्यातील कारखानदारीच्या नेकीवर भलेमोठे प्रश्नचिन्ह लावले जात असताना आणि ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांच्याच ताब्यात यातील बहुसंख्य कारखाने असताना होत असलेल्या राज्याच्या तिजोरीच्या दुर्दशेस जबाबदार कोण? यावर चर्चा होणे व त्यातून मार्ग निघणे अपेक्षित असताना ही मंडळी दादर स्टेशनच्या नामांतरासारखे मुद्दे समोर आणून समाजाचे लक्ष विचलीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

राज्याची साखर कारखानदारी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि राजकारणाचा कणा आहे. राज्यकर्त्यांचा कणा ताठ राहत असताना या अर्थव्यवस्थेचा कणा मोडून काढण्याचा प्रयत्न राजकीय नेतेमंडळी करीत आहे. या मंडळींपासून सावधान.



# कॅगने उघड केला साखर उद्योगातील प्रचंड गैरव्यवहार

सहकारी साखर कारखानदारीतील प्रचंड भ्रष्टाचार, गैरकारभार व त्यामुळे होणारी शेतकऱ्यांची कुचंबणा, त्यांच्या कष्टाची होणारी माती हे दाहक वास्तव वारंवार सामोरे आल्याने पुण्याचे श्री. अशोक कुलकर्णी यांनी मुख्य न्यायाधीशांना एक सविस्तर पत्र पाठवून राज्यातील सहकारी साखर कारखानदारीच्या दुरावस्थेकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. ऊसाची उपलब्धता नसूनही नव्या कारखान्यांना परवानगी देणे, स्थापन केल्या गेलेल्या कारखान्यांमधे मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व भ्रष्टाचार होणे आणि या सर्वांस आळा घालण्यास साखर आयुक्तालयाची यंत्रणा कुचकामी ठरणे, यामुळे राज्य सरकारने, केंद्र सरकारने मदत, अनुदान, भागभांडवल व कर्ज या रुपाने सहकारी साखर कारखानदारीत घातलेले जनतेचे कित्येक हजारो कोटी रुपये बुडाले आहेत.

हे सगळे निर्दशनास आणून देणाऱ्या श्री. कुलकर्णी यांच्या साध्या पत्राची दखल न्यायालयाने घेतली व त्याचे रुपांतर सुमोटो जनहित याचिकेमधे केले. या याचिकेच्या पहिल्या सुनावणीच्या वेळेसच (१२ जुलै २००६ रोजी) उच्च न्यायालयाने असा अंतिरिम आदेश दिला कि न्यायालयाकडून या प्रकरणाचा सखोल शहानिशा होऊन पुढील आदेश दिला जाईपर्यंत -

१. राज्यात कोणत्याही नव्या साखर कारखान्याच्या उभारणीस परवानगी दिली जाऊ नये.

२. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक बाबी तपासण्यासाठी देशाच्या महालेखापालांना (कॅग) याचिकेत प्रतिवादी करुन, महालेखापालांकडून सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक बाबींची चौकशी करुन न्यायालयास त्याचा अहवाल सादर करावा.

या जनहित याचिकेच्या संबंधाने महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षकांनी (कॅग) प्रथमच लेखापरीक्षण केले. यासाठी राज्यातील २०२ पैकी फक्त २२ सहकारी साखर कारखान्यांची चाचणी पाहणी करण्यात आली. आश्चर्य म्हणजे २२ पैकी २० कारखान्यांमधे कॅगला गंभीर स्वरुपाचे गैरव्यवहार झाल्याचे आढळून आहे. विशेष म्हणजे सहकारी साखर कारखानदार सर्व नियम धाब्यावर बसवून गैरव्यवहार करत असताना राज्य शासन किंवा साखर आयुक्तांनी त्याकडे पूर्णपणे कानाडोळा केल्याचा ठपकाही लेखापरीक्षण अहवालात ठेवण्यात आला. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकारी साखर कारखानदारीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांपेक्षा, कामगारांपेक्षा कारखाने चालवणाऱ्या राजकारण्यांचाच वैयक्तिक अधिक फायदा झाला आहे. स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या सहकारी साखर कारखानदारांच्या मनमानीला आळा घालण्यात राज्य सरकार पुरते अपयशी ठरले आहे. सहकारातील सर्वच नेत्यांनी सहकारातील सर्व नियम व कायदे बाजूला सारून स्वतःचे भले करून घेतले आहे, असे महालेखापालांचे गंभीर आरोप आहेत.

## धक्कादायक निष्कर्ष

- **२२ पैकी २० कारखान्यांमध्ये कॅगला आढळले गंभीर स्वरुपाचे गैरव्यवहार.**
- **सर्व नियम धाब्यावर बसवून गैरव्यवहार**
- **राज्यशासन किंवा साखर आयुक्तांनी त्याकडे पूर्णपणे कानाडोळा केला.**
- **ऊस उत्पादक शेतकऱ्यांपेक्षा, कामगारांपेक्षा कारखाने चालवणाऱ्या राजकारण्यांचाच वैयक्तिक अधिक फायदा.**

कॅगने सहकारी साखर कारखान्यांच्या २००१ ते २००६ या कालावधीचे परीक्षण न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे २००७ मधे केले. नमुन्यादाखल केवळ २२ कारखान्यांचे परीक्षण केल्यावर निदर्शनास आलेल्या गोष्टी ह्या फारच धक्कादायक होत्या. कॅगने कारखान्यांची, परवानगी मिळाल्यापासून त्यातील साखर निर्यात होईपर्यंत वा कारखाना अवसायनास निघेपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावरच्या गैरपकाराची नोंद घेत हा अहवाल केला आहे. राज्य शासनाने या २२ कारखान्यांना सुमारे २६५८.६५ कोटी रुपये अर्थसहाय्य केलेले आहे, म्हणजे ही साखर कारखान्यांची देणी आहेत. या आकड्यांवरून २०२ कारखान्यांकडे किती रक्कम थकबाकी असेल याचा अंदाज घेता येईल. ही थकबाकी वसूल करण्याची कुठलीही मानसिकता राज्यशासनाकडे नाही. एक कारखाना उभारणीपूर्वीच अवसायनात गेला व त्याची बँक गॅरंटीही शासनाला भरावी लागल्याचे उदाहरण येथे दिसते.

नियमानुसार ठरलेल्या दिवसात हिशोब पूर्ण न करणे, कर्ज खाते वही व शासनाची देणी याचा हिशोबच न ठेवणे, तसेच थकबाकी, भागभांडवल वा शासकीय देणी याचा आढावाच न घेणे अशा अनेक धक्कादायक बाबी या अहवालातून उघडकीस आल्या. तसेच बाहतुकदारांना द्यावयाच्या आग्रीम रकमांमधे, गळीत हंगामासाठी लागणाऱ्या खर्चासाठी मिळणाऱ्या पूर्वहंगामी कर्जामधे, खते आणि ऊस बियांणांच्या खरेदीसाठी घेण्यात येणाऱ्या कर्जामधे, अशा अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे गैरव्यवहार या लेखापरीक्षणामुळे उघडकीस आहे.

ह्या लेखापरीक्षणा नंतर बराच कालावधी लोटल्यामुळे १३ डिसेंबर २०१० रोजी उच्च न्यायालयाने महा लेखापरिक्षकांना दिनांक १/४/२००७ पासून ३१/३/२०१० पर्यंत चा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे महालेखापाल, लेखापरीक्षण -१ यांनी राज्यातील ५० सहकारी साखर कारखान्यांच्या कार्याचे परीक्षण करुन आपला अहवाल उच्च न्यायालयात सादर केला आहे, जो अगोदर सादर केलेल्या अहवाला पेक्षा अधिक धक्कादायक आहे.

**२२ कारखान्यांना सुमारे २६५८.६५ कोटी रुपये अर्थसाहाय्य केलेल आहे. म्हणजे ही साखर कारखान्यांची देणी आहेत. या आकड्यांवरून २०२ कारखान्यांकडे किती रक्कम थकबाकी असेल याचा अंदाज घेता येईल.**

या ५० साखर कारखान्यांपैकी ३४ कारखाने सुरु असून ७ कारखाने अवसायानात निघाले आहेत तर ६ कारखाने उभारणी मधे आहेत. शासनाचे कायदे, अध्यादेश, नियम, परवान्यातील अटी यानुसार कामकाज होते आहे की नाही हे बघण्याचा लेखा परिक्षकांचा उद्देश आहे.

या परीक्षणाच्या उद्देशात पुढील बाबी समाविष्ट आहेत :

- कारखान्यांचे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील तरतुदी नुसार व सर्वमान्य हिशोब पध्दतीनुसार ठेवले असावेत.
- सहकारी साखर कारखान्यांना व ऊस उत्पादकांना दिलेली आर्थिक मदत प्रत्येक योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसारच असावी.
- नवीन कारखान्यांचे परवाने, मशिनरी खरेदी, भांडवल उभारणी, ऊस खरेदी, उत्पादन खर्च, कामगार व्यवस्थापन इत्यादि बाबी कायद्यातील तरतुदी व नियमानुसार असाव्यात.
- सहकारी साखर कारखान्यांनी इतर सहकारी संस्थांमधे केलेली गुंतवणूक अनुत्पादक नसावी.
- साखर आयुक्तांनी सहकारी साखर कारखान्यांच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवावे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील नियम ६१ प्रमाणे सहकारी साखर कारखान्यांनी आर्थिक वर्ष संपल्यानंतर ४५ दिवसात हिशोब पूर्ण करायचा आहे. वर्षातून किमान एकदा हिशोब तपासणी करण्याची जबाबदारी साखर आयुक्तांची आहे. परंतु एकाही साखर कारखान्याने ४५ दिवसात हिशोब पूर्ण केलेले आढलेले नाही. विलंबाचे प्रमाण १ ते २३ महिने इतके दिसून आले आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या म्हणण्याप्रमाणे साखरेच्या शिल्लक साठ्याची किंमत ठरवण्याचे अधिकार राज्याच्या मंत्री समितीकडे आहेत. सदर समिती ऑगस्ट-ऑक्टोबर दरम्यान कधीतरी ही किंमत ठरवते. त्यानंतरच कारखान्याचे हिशोब पूर्ण होऊ शकतात. त्यानंतर तीन महिन्यात लेखापरीक्षण अहवाल तयार करुन सभासदांच्या सर्वसाधारण सभेत ठेवणे आवश्यक आहे. कित्येकदा विलंबामुळे सर्वसाधारण सभा घेण्याला शासनाने मुदतवाढी दिलेल्या आहेत. २००९-२०१० मधे अशा २० प्रकरणात एक महिना ते अडीच वर्षेइतकी मुदतवाढ देण्यात आली आहे. महालेखाकारांच्या मते शिल्लक किंमत त्याचा उत्पादन खर्च किंवा बाजारभाव यातील जी रक्कम कमी असेल तेवढी ठेवणे हे सर्वमान्य तत्वानुसार आहे. परंतु मंत्री समिती प्रत्येक वर्षी मार्च-ऑगस्ट या काळात झालेल्या विक्रीनुसार शिल्लक साठ्याची किंमत काढते. महालेखाकारांनी नोंदवलेल्या निरिक्षणावर तज्ञांनी योग्य मार्ग काढला पाहिजे अन्यथा कारखान्यांची खरी आर्थिक परिस्थिती समोर येणार नाही.

परीक्षण झालेल्या ३४ चालू कारखान्यांपैकी एकाही सहकारी साखर कारखान्याने गुंतवणूक, साखर साठा, हिशोबात न आलेली संभाव्य देणी, कायदेशीर वाद आणि त्यातील रकमा, घसारा आकारण्याची पध्दत या विषयी कसलेच स्पष्टीकरण त्यांच्या वार्षिक अहवालात दिलेले नाही. याशिवाय कामगारांची अपेक्षित ग्रॅच्युइटी, विविध करांचे निर्धारण याविषयी माहिती दिलेली नाही. त्यामुळे कारखान्यांच्या हिशोबात त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे खरे व योग्य चित्र दिसत नाही. त्यामुळे कारखान्यांच्या ऑडिटर्सनी दिलेली प्रमाणपत्रे योग्य नाहीत. महालेखापालांचे हे निरीक्षण सहकारी साखर कारखान्यांची हिशोब तपासणी करणाऱ्या ऑडिटर्सच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे. निरीक्षणाखालील ३४ सहकारी साखर कारखान्यांनी ११.५ ते १४.५ दराने शासकीय हमीवर बँकाकडून साखर व मळीवर कर्ज उचलले आहे. यातून कंत्राटदार व पुरवठादारांनी त्यांनी वेळोवेळी उचल दिलेली आहे. ३१/०३/२०१० रोजी या उचलीतील ७३१ कोटी रुपयांची वसुली बाकी आहे. अशा थकीत येण्यापैकी १ ते ३ वर्षांपेक्षा जास्त काळातील थकीत रक्कम खर्च टाकण्याचे आदेश साखर आयुक्तांनी २००५ मधे दिले असूनही २५ साखर कारखान्यांनी एकूण ४४२ कोटी रुपयांची रक्कम अजूनही येणे दाखवून आपला तोटी कमी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

एकूण २०२ साखर कारखान्यांपैकी परीक्षणांतर्गत असलेल्या ३४ साखर कारखान्यांकडे ३१/०३/२०१० रोजी एकूण देणे ४५९४

कोटी रुपये आहे. ही देणी २ ते ९ वर्षांपूर्वीची आहेत. यावरुन असे लक्षात येते की एका साखर कारखान्याकडे सरासरी १३५ कोटी रुपये येणे बाकी आहे. म्हणजेच सर्व २०२ साखर कारखान्यांकडे अंदाजे २३,००० ते ३०,००० कोटी रुपये येणे बाकी आहे.

जेव्हा शासन साखर कारखान्यांना कर्ज देते, तेव्हा त्याच्या वसूलीसाठी साखर विक्रीतील रु. २५/- प्रति क्विंटल इतकी रक्कम कर्जापोटी वळती करुन घेते. ही जबाबदारी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची असते. परंतु २००७-०८ ते २००९-२०१० ह्या काळात विकल्या गेलेल्या २०८१.७५ लाख क्विंटल साखरेच्या विक्री रकमेतून रु. ५२१/- कोटी रुपये वळते करुन घ्यायला हवे होते. परंतु महाराष्ट्र राज्य बँकेने सदरची रक्कम वसूल करुन शासनाला दिली नाही, असे ही महालेखापालांनी नमूद केले आहे.



**श्री. अशोक कुलकर्णी यांनी मुख्य न्यायाधीशांना पाठवेलल्या साध्या पत्राने साखर उद्योगात धरणीकंप झाला**

सहकारी साखर कारखाने हे त्यांचे भाग भांडवल हे ऊस उत्पादक शेतकरी, शासन, वित्तीय संस्था आणि नाममात्र सभासद यांच्या मार्फत उभे करते. महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यानुसार कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना कारखान्याचे सभासद करणे बंधनकारक असते. असे सभासद होण्यासाठी शेतकऱ्यास रु. ५०००/- एका भागासाठी द्यावे लागतात. परीक्षणांतर्गत असलेल्या ३४ कारखान्यांपैकी १९ कारखान्यांनी ३९.५० कोटी इतकी रक्कम अशा भाग भांडवलामार्फत जमा केली नाही. अशाप्रकारे भाग भांडवल उभे केल्याने कारखान्यांवरील इतर संस्था व शासनाकडील कर्जाचा बोजा कमी होतो. अशाप्रकारचे भाग भांडवल उभे करणे बंधनकारक करुनही कारखान्यांनी ह्यासाठी काहीही प्रयत्न केले नाहीत.

**कारखान्यांच्या हिशेबात त्यांच्या आर्थिक परिस्थितीचे खरे व योग्य चित्र दिसत नाही. महालेखापालांचे हे निरीक्षण सहकारी साखर कारखान्यांची हिशेब तपासणी करणाऱ्या ऑडिटर्सच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे आहे.**

नाबार्ड पॅकेज २००५ च्या अंतर्गत साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून काही रक्कम वजा करुन ती भाग भांडवलापोटी जमा करावयाची होती. काही कारखान्यांनी सदरचे भाग भांडवल रु. ४० कोटी जमा केले नाही तर काही कारखान्यांनी अशी रक्कम वजा केली, जी रु. ७२ कोटी रुपये आहे, पण त्याचे भाग भांडवलात रुपांतर न करता ती अनामत हया नावाखाली ठेवलेली आहे, हे महालेखापालांनी निदर्शनास आणून दिले आहे.

कॅश बुक व बँक बुक यातील खात्यांचे रिकंसिलिअेन हे अनेक कारखान्यांकडून केले गेले नाही. त्यातील रकमांमधे असलेला फरकांचा काहीही तपशील नाही. कृष्णा कारखाना, कराड यांनी १९९८-९९ पासून, वसंतदादा शेतकरी सांगली यांचे पाच बँकातील खात्यांचे रिक्नसिलीअेशन, तसेच निफाड व कादवा कारखान्यांनी त्यांच्या खात्यांचे रिक्नसिलीअेशन केलेले नाही. ह्या कुठल्याही प्रकारची दखल साखर आयुक्तालयाने घेतलेली नाही.

विकलेल्या साखरेची पूर्ण किंमत मिळाल्याशिवाय कारखान्याने साखर देऊ नये असे साखर आयुक्तालयाचे आदेश असताना सुध्दा निफाड साखर कारखान्याने जून २००५ पर्यंत साखर दिली. त्या विक्रीपोटी मिळालेले रु. १०.१२ कोटी रुपयांचे चेक हे वटले आहेत का नाही याची खात्री न करता सदरची साखर दिली गेली. साखर दिल्यावर दिलेले चेक वटले नाहीत. बँकेचे रिकन्सीलिअेशन न केल्यामुळे हा प्रकार जूलै २००७ पर्यंत उघडकीसच आला नाही.

तसेच २००४-०५ मधे कादवा कारखाना ह्यांना साखर वितरकांनी रु. ३.१४ कोटी रुपये बँकेत भरल्याच्या खोट्या पावत्या दिल्या. ह्या खोट्या पावत्यांचा शहानिशा न करता कारखान्यानी साखर वितरकांना दिली. हा प्रकार जूलै २००७ मधे उघडकीस आला.

शासनाने सहकारी साखर कारखान्यांना वेळोवेळी दिलेली कर्जे, भागभांडवल व अनुदाने यांचे लेजर साखर आयुक्तालयाच्या विभागीय सहसंचालकांनी ठेवायचे असते. पण एकाही सहसंचालकांकडे असे अद्यावत लेजर नाही. त्यामुळे शासनाला कारखान्यांकडून येणे असलेल्या रकमांचा आढावा महालेखाकारांना घेता आला नाही. केवळ त्यांच्यापुढे आलेल्या अंदाजित रकमांचीच त्यांना नोंद घेता आली.

राज्य शासन हे साखर कारखान्यांना भाग भांडवलाच्या रुपात अर्थसहाय्य करत असते. ह्या व्यतिरिक्त वेगळ्या वेगळ्या स्वरुपातील अनुदाने, सबसिडी, प्रकल्प खर्च वाढल्यास जादाचे भाग भांडवल, अशा अनेक स्वरुपात शासन अर्थ सहाय्य करत असते. विविध योजनांतर्गत शासनाने साखर कारखान्यांना व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केलेल्या अर्थ सहाय्याची रक्कम मार्च २०१० अखेर रु. ३६७४.६० कोटी आहे. ह्या व्यतिरिक्त केंद्र शासनाकडून साखर कारखान्यांना विविध योजनांतर्गत रु. १३५२ कोटी चे अर्थ सहाय्य मिळाले आहे. एवढे अर्थ सहाय्य देऊन सुध्दा प्राप्त असलेल्या तपशीला नुसार ११८ कारखान्यांपैकी ४५ कारखाने हे बऱ्याच कालावधीपासून तोट्यात आहेत व त्यांचा तोटा वाढतच आहे.

सरकारने १९९२ ते २०१० या कालावधीत ७७ कोटी रुपये रस्ते दुरुस्तीसाठी दिले होते. काही साखर कारखान्यांनी त्याचा अद्यापपर्यंत हिशोबही दिलेले नाही. उरलेले पैसेही शासनाला परत केले नाहीत. साखर आयुक्त कार्यालयाने त्याच्या वसूलीसाठी काहीच पावले उचलेली नाहीत.

काही शेतकऱ्यांना शासन शेअर खरेदी करण्यासाठी ५०% कर्जाच्या रुपात व ५०% सबसिडीच्या रुपात सहाय्य करते. सदरची रक्कम ही

ऊस बीलातून तीन वर्षामधे सम प्रमाणात वळती करुन घ्यायची असते. २००७ ते २०१० ह्या काळात १०,२१२ शेतकऱ्यांना रु. १४० लाख इतके सहाय्य केले गेले. त्यातील रु. १३१ लाख रक्कम अजूनही येणे बाकी दिसत आहे. तसेच परीक्षणांतर्गत असलेल्या ३४ कारखान्यांपैकी १७ कारखान्यांनी ११८८९ शेतकऱ्यांना दिलेली रु. २५१ लाख ची कर्जे वसूल केलेली नाहीत.

साखर कारखानदारीच्या क्षेत्रात संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला शासनाने ३० ते ३२ कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. या संस्थेच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेण्याची मानसिकता सहकारी साखर कारखान्यांमधे दिसून येत नाही. परीक्षणा अंतर्गत असलेल्या ३४ साखर कारखान्यांपैकी केवळ २००६-०७ मधे पाच, २००७-०८ मधे पाच व २००९-१० तघे सात कारखान्यांनी याचा लाभ घेतला आहे. सर्व सहकारी साखर कारखाने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे सभासद आहेत.

नावार्ड पॅकेज अंतर्गत कर्जपुर्नरचनेचा फायदा साखर कारखान्यांनी घेतला मात्र त्यांचे घालून दिलेल्या नियमांचे पालन मात्र केले नाही. परीक्षणातील ३४ साखर कारखान्यांपैकी २२ कारखान्यांनी ह्या नियमांचे पालन केले नाही. तसेच अशा साखर कारखान्यांना उत्पादन खर्च २२५ रु. प्रतिटन इतका मर्यादित ठेवण्यात अपयश आले आहे. तसेच खरेदीकराची थकित रक्कम कर्जात रुपांतरीत करण्यासाठी १ ते १३ वर्षेइतका विलंब झाला आहे. त्या साखर कारखान्यांनी थकीत खरेदी कराचे रुपांतर कर्जात केले नाही, कर भरला नाही अथवा तो भरण्यास विलंब केला. हे कर्ज केवळ पहिल्या ५ वर्षेतर काहींना १० वर्षेविना व्याजी होते. त्यामुळे पैसे भरण्यास झालेल्या विलंबाचे व्याजाचे पैसेही वसूल झालेले नाहीत. ह्या सगळ्या वसूलीची जबाबदारी ही साखर आयुक्तालयाची आहे. परंतु ह्या थकीत रकमेचे कुठलेही तपशील साखर आयुक्तालयात नाहीत.

**३४ कारखान्यांकडे ३१ मार्च २०१० रोजी एकूण देणे ४५९४ कोटी रुपये आहे. ही देणी २ ते ९ वर्षांपूर्वीची आहेत. यावरून असे लक्षात येते, की एका साखर कारखान्याकडे सरासरी १३५ कोटी रुपये येणे बाकी आहे. म्हणजेच सर्व २०२ साखर कारखान्यांकडे अंदाजे २३,००० ते ३०,००० कोटी रुपये येणे बाकी आहे.**

शासनाने कारखान्यांनी साखर कारखाने उभे करण्यासाठी घेतलेल्या कर्जाला हमी दिली होती. ह्या हमी अंतर्गत जर काही कारणांनी कारखाने कर्ज परतफेड करु शकले नाहीत तर शासनाला सदर कर्जाची परतफेड करावी लागते. महालेखापालांच्या रिर्पोट नुसार मार्च २०१० अखेर शासनाने १२४ सहकारी साखर कारखान्यांना रु. २५३८ कोटी इतक्या रकमेच्या कर्जासाठी हमी दिली होती. त्यापैकी ७२ साखर कारखान्यांनी कर्जेपरत न केल्या मुळे शासनाला हमी अंतर्गत रु. १८७४/- कोटी इतक्या रकमेचे कर्ज परत फेड करावे लागले. तसेच मार्च २०१० अखेर घेतलेल्या हमीची फी, व्याज, दंड अशा स्वरुपाची साखर कारखान्यांकडून शासनाला येणे असलेली रक्कम रु. १६० कोटी इतकी आहे.

ऊस तोडणी व वहातूकीसाठी पुरेशी हमी न घेताच आगाऊ रकमा दिल्या गेल्या आहेत. बीलातून रक्कम वसूल करुन सुध्दा ती रक्कम कर्ज परत फेडीसाठी वापरली गेली नाही. ती रक्कम ११ कोटी रुपये आहे. ह्या कारखान्यांमधे सहकार राज्य मंत्र्यांचा माजलगाव कारखाना, अशोक चव्हाण माजी मुख्यमंत्री यांचा आंबेजोगाई कारखाना, आंबेडकर, निफाड व आदिवासी या कारखान्यांचा समावेश आहे. खते व बियाण्यांसाठीची कर्जेदुसरीकडेच वापरली गेली आहेत तर काही कारखान्यांनी ती न वापरताच काही कालावधीनंतर परत केली आहेत.

तसेच काही कारखान्यांकडे पूर्व हंगामी कर्जापोटी जुने येणे असताना सुध्दा त्यांना नवीन कर्जेदिली गेली आहेत. त्याचप्रमाणे पूर्व हंगामी कर्जे उचलून सुध्दा १२ सहकारी साखर कारखान्यांनी ५०% पेक्षा कमी गाळप केले आहे.

महालेखाकरांच्या आकडेवारी वरुन असेही दिसून येते की २००९-२०१० ह्या हंगामात ५४० लाख मे. टन ऊसाचे गाळप झाले. अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यांची संख्या लक्षात घेता प्रत्यक्ष ६१५ लाख मे. टन ऊसाचे गाळप व्हायला हवे होते. महालेखाकारांनी दिलेल्या रिर्पोट नुसार उपलब्ध ऊसापेक्षा ४० जादा साखर कारखान्यांना परवनगी दिली गेली होती. २००९-२०१० ह्या गाळप हंगामात ३६ साखर कारखाने त्यांच्या क्षमतेच्या ७५% गाळप करत होते तर १९ साखर कारखाने त्याच्या क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी क्षमतेने गाळप करत होते. महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की अशा परिस्थितीत ३० साखर कारखाने अवसायानात निघणे ही काही आश्चर्याची बाब नाही.

नवीन साखर कारखान्यांना परवानगी देताना त्या क्षेत्रातील उपलब्ध असलेला ऊस, आजूबाजूच्या परिसरातील अस्तित्वात असलेले साखर कारखाने, त्या भागातील पाण्याची उपलब्धता, पर्जन्यमान इत्यादी बाबींचा विचार साखर आयुक्तालयास करावा लागतो. परंतु साखर आयुक्तालयात ह्या बाबतची पुरेशी माहिती उपलब्ध नाही. तसे२००१-२००६ ह्या काळामधे काही साखर कारखान्यांना बँकेमधे खाते उघडण्यास साखर आयुक्तालयाने ऊसाची पुरेशी उपलब्धता नाही हे कारण देऊन परवानगी नाकारली होती. परंतु शासनाच्या आदेशानुसार साखर आयुक्तालयास सदरची परवानगी द्यावी लागली होती. अशा प्रकारे परवानगी दिलेल्या ६ कारखान्यांपैकी फक्त २ कारखान्यांनी त्यांचे उत्पादन सुरु केले. रेना, लातूर यांनी २००३-०४ मधे तर सागर जालना यांनी २००९-१० मधे उत्पादन सुरु केले. मार्च २००९ अखेरीस ह्या कारखान्यांपैकी रेना कारखान्यांचा साठलेला तोटा होता २.९० कोटी तर मार्च २०१० अखेर सागर जालना चा तोटा होता १.७४ कोटी. सदर निर्णयाचे कोणतेही पुरेसे स्पष्टीकरण कोठेही उपलब्ध नाही. सदरच्या सहा कारखान्यांपैकी फक्त दोन कारखान्यांने उत्पादन सुरु केले, पण सुरवातीपासूनच हे कारखाने तोट्यात चालले आहेत.

२००५ मधे काही साखर कारखान्यांना पुरेसा ऊस उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी, बानगंगा, छत्रपती, टोकाई, घृणेश्वर, जामनेर व सह्याद्री हया कारखान्यांना पाईप लाईन मधून वगळण्याची शिफारस साखर आयुक्तालयाने शासनास केली होती. परंतु शासनाकडून असे काहीही आदेश न आल्याने सदरच्या कारखान्यांना रु. ९.५० कोटींचे

भाग भांडवल शासनाकडून दिले गेले. तसेच इतर संस्थांकडून रु. १७ कोटी रुपयांचे अर्थ सहाय्य ही दिले गेले. इतके सहाय्य देऊन सुध्दा सदरच्या कारखान्यांची जानेवारी २०१० पर्यंत उभारणी झालेली नाही त्यामुळे शासनाचे भाग भांडवल अडकून पडले आहे. असे असूनसुध्दा सदरचे कारखाने अजूनही पुढील अर्थ सहाय्य मिळण्यास पात्र आहेत.

असे अनेक आक्षेप महालेखाकारांनी नोंदवले आहेत. साखर आयुक्तालय अशा बाबतीत निष्क्रिय झाल्याचे दिसत आहे. काही वेळा तर साखर कारखान्यांपुढे/शासनापुढे ते हतबल दिसतात.

शासनसुध्दा साखर कारखान्यांना नियम डावलून मदत करताना दिसून आले आहे. सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवल देताना १:३ (मराठवाडा/विदर्भासाठी १:५) असे प्रमाण ठरलेले असताना सुध्दा शासनाने काही कारखान्यांना जास्त भाग भांडवल दिले आहे. एका कारखान्याने तर भाग भांडवल गोळा केल्याची खोटी प्रमाणपत्र सादर करुन शासकीय भांडवल मिळवले. या कारखान्याची अजून चौकशी सुरु झाली नाही. शासनाच्या मनमानी कारभाराची एक झलक म्हणजे वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याला दिलेले २.७० कोटींचे जादा भागभांडवल. २००८ मधे शासनाने हा धोरणात्मक निर्णय होता अशी सारवासारव केली. पण महालेखाकारांनी हे स्पष्टीकरण नाकारले आहे.

**महालेखापालांच्या रिपोर्टनुसार मार्च २०१० अखेर शासनाने १२४ सहकारी साखर कारखान्यांना रु. २५३८ कोटी इतक्या रकमेच्या कर्जासाठी हमी दिली होती. त्यापैकी ७२ साखर कारखान्यांनी कर्जे परत न केल्यामुळे शासनाला हमी अंतर्गत रु. १८७४ कोटी इतक्या रकमेचे कर्ज परत फेड करावे लागेल.**

ज्याप्रमाणात कारखाने स्वतःचे भाग भांडवल उभे करतात त्या प्रमाणात शासन त्यांना भाग भांडवल पुरवत असते. शरद कारखाना, औरंगाबाद यांनी स्वतःचे रु. १५३.१३ लाख रुपयांचे भाग भांडवल उभे केले. प्रमाणाप्रमाणे त्यांना रु. ७६५.६५ लाख इतके भांडवल शासनाकडून मिळावयास हवे होते. पण प्रत्यक्षात कारखान्याने दिलेल्या खोट्या माहितीच्या आधारे शासनाने रु. ९३३.३३ लाख रुपयांचे सर्व भाग भांडवल कारखान्याला दिले. जादा दिलेल्या रु. १६७.६८ लाख च्या भाग भांडवलाच्या वसूलीसाठी कुठलीही कारवाई केली गेलेली नाही.

घृष्णेश्वर कारखाना व जामनेर कारखाना ह्यांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे रु. ७.७५ कोटी रुपयांचे जादा भाग भांडवल उचलले. सह्याद्री साखर कारखाना, कोल्हापूर यांनी बँकेचा खोटा दाखला दाखवून रु. ९.५० कोटी रुपयांचे जादा भाग भांडवल उचलले. तसेच अंबादेवी अमरावती, डी वाय पाटील कोल्हापूर, ह्या कारखान्यांनासुध्दा जादा भांडवल दिले गेले आहे. साखर आयुक्त कार्यालयाने त्यावेळी योग्य ते निरीक्षण न करता पैसे दिले जे अजून पर्यंत वसूल झाले नाहीत. साखर आयुक्त यावर काहीही कारवाई करत नाही. प्रकल्प खर्च वाढला तर असे जादा भांडवल देण्याचे अधिकार शासनाकडे आहेत. पण तसे नसताना असे जादा भांडवल देणे अनाकलनीय आहे.

नवीन साखर कारखान्यांची उभारणी ही परवानगी मिळाल्यापासून ३ वर्षात करावयाची असते. पण नवीन कारखान्यांच्या उभारणीत ५ ते ११ वर्ष विलंब दिसून येत आहे. मार्च २०१० अखेर पर्यंत शासनाचे १०१ कोटी रुपये अशा विलंबीत कारखान्यांमधे अडकलेले दिसून येतात. अशा प्रकारच्या झालेल्या विलंबामुळे उभारणीचा खर्च हा भरमसाठ वाढला आहे. ह्या व्यतिरिक्त कर्जावरील साठलेल्या व्याजाच्या बोज्यामुळे कारखान्यांच्या फायद्यावर विपरीत परिणाम होईल व कर्ज परतफेडीमधे, ऊसाच्या बीलांच्या पेमेंटमधे अडचणी उत्पन्न होतील असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. शिवशक्ती अदिवासी ह्या कारखान्याची उभारणी डिसेंबर १९९४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. पण त्याची उभारणी मार्च २००२ मधे पूर्ण झाली. रु. ३७.५० कोटी खर्चून कारखाना उभा केला गेला पण तो फक्त तीन दिवसच ट्रायल बेसीस वर चालला व त्याने केवळ ८२९ मे.टन ऊसाचे गाळप केले. ह्यानंतर तो कारखाना बंद होता. सदरचा कारखाना २००५ मधे अवसायानात निघाला व मार्च २०१० रोजी त्याचे शासनाचे देणे रु. १५ कोटी होते. संत तुकाराम पुणे जिल्हा, संत कुरमादास सोलापूर, सागर जालना ह्या कारखान्यांच्या उभारणी मधे झालेल्या विलंबामुळे कोट्यावधी रुपयांची देणी या कारखान्यांकडून येणे आहेत. साखर आयुक्त अशा विलंबावर कुठलेही नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरले आहेत असा कडक ताशेरा महालेखापालांनी आपल्या अहवालात ओढला आहे.

साखर कारखान्यांसाठी मशिनरी खरेदी करण्यासाठी नव्या कारखान्यांसाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि अस्तित्वात असलेल्या कारखान्यांच्या नूतनीकरणासाठी साखर संघाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली, अशा दोन समित्या काम करतात. पण या समितीच्या कार्यपध्दतीत अनेक उणीवा आहेत.

सहकारी साखर कारखान्यासाठी लागणारी मशिनरी खरेदी होते त्यामधे अनेकबाबतीत अनियंत्रता झाली आहे. सोमेश्वर साखर कारखाना पुणे यांनी २००२ मधे ६१० लाख रुपयाला प्राज इंडस्ट्रिज कडून डिस्टलरी खरेदी केली. काही कारणामुळे त्यांनी ३ वर्षेडिस्टलरी खरेदी केली नाही. नंतर त्यांनी प्राज ला ६४१ लाख रुपये किंमत वाढवून दिली. त्यावेळी त्यांनी नवीन टेंडर मागवायास पाहिजे होती. सदर कमिटीला जादा दर देण्याचा अधिकार नाही.

सप्टेंबर २००३ मधे वालचंदनगर इंडस्ट्रिजला रु. ६२४ लाख चे काम दिले गेले होते. सदर मशिनरीचा वेळेत पुरवठा न होऊ शकल्यामुळे सप्टेंबर २००४ मधे वालचंदनगरला रु. ७० लाखाने किंमत वाढवून देण्यात आली जी रु. ६९४ लाख झाली. परंतु सप्टेंबर २००६ पर्यंतसुध्दा मशिनरीचा पुरवठा झाला नाही व परत वालचंदनगरला रु. ८१ लाखाने किंमत वाढवून दिली. अशी एकूण रु. १५१ लाख रुपयाची किंमत वाढ देण्यात आली.

अनेक साखर कारखान्यांनी मशिनरी सप्लायर्सना किंमत वाढूवन दिली आहे. त्यांस साखर आयुक्त कार्यालयाची मंजूरी घेतली नाही. अनेक साखर कारखान्यांनी प्राज इंडस्ट्रिजकडून सिंगल टेंडरवर डिस्टलरीची मशिनरी बेकायदेशीर खरेदी केली आहे.

मशिनरी परचेस कमिटीच्या २००७-२०१० पर्यंत ६९ मिटींग्ज झाल्या. त्यापैकी ६४ मिटींगला साखर आयुक्त हजर नव्हते. त्यामुळे टेंडरमधे घोळ झाल्याचे दिसून येते. प्रधान सचिवांनी अनेक वेळा सांगून सुध्दा टेंडरची योग्य प्रोसीजर तयार केली नाही.

मशिनरी खरेदी साठी आवशक असलेली प्राथमिक स्वरुपाची तयारी जसे प्रॉजेक्ट रिपोर्ट बनवणे, टेक्नीकल स्पेसिफिकेशन तयार करणे, निवीदा काढणे, त्यासाठी आवशक असलेले फायनाशीअल व ॲडमिनीस्ट्रेटिव्ह ॲप्रुव्हल घेणे इत्यादी, ही साखर कारखान्याची जबाबदारी असते. पण ह्यासाठी शासनाने काहीही एक प्रणाली कारखान्यांना ठरवून दिलेली नाही. ज्यामुळे मशिनरी खरेदी करण्याच्या पध्दतीमधे काहीही नियमीतता दिसून येत नाही. २००७ मधे प्रधान सचिवांनी टेंडर प्रणाली प्रमाणित करण्याचे मान्य केले होते. पण अजून ते झालेले नाही. त्यामुळे कोट्यावधी रुपयांची मशिनरी/विस्तारीकरणाची कामे ही मनमानी पणाने झालेली दिसून येतात. त्याची काही उदाहरणे महालेखापालांनी दिली आहेत.

साखर कारखान्यांला लागणारी मशिनरी खरेदी करताना मशिनरी पुरवठादारास ऑर्डरपोटी ॲडव्हान्स देताना त्या रकमेची बँक गॅरेंटी त्याच्याकडून घ्यावयाची असते. साखर कारखान्यांच्या आर्थिक सुरक्षततेसाठी ही बाब आवशक असते. ह्यावर साखर आयुक्तालयाने लक्ष ठेवून सदरची मशिनरी खरेदी व त्याचा पुरवठा, उभारणी व्यवस्थित होते की नाही हे बघायचे असते. परंतु अनेक उदाहरणांमधे असे दिसून आले आहे की पुरवठादारास बँक गॅरेंटी न देता ॲडव्हान्स दिला गेला आहे पण त्याने काम न करता सदरची रक्कम बुडवली आहे. तसेच काही ठिकाणी मशिनरीचा पूर्ण पुरवठा झाल्यावर द्यावयाचे पैसे अगोदरच प्रोफॉर्मा इनव्हाईस पोटी दिले आहेत परंतु त्या मशिनरीचा पुरवठा झालेला नाही. ह्या अशा प्रकारे होणाऱ्या नुकसानाचे प्रमाण लक्षणिय दिसून येते. ह्या सगळ्यावर साखर आयुक्तालय नियंत्रण ठेवण्यास अपयशी ठरले आहे असा ताशेरा महालेखापालांनी मारला आहे.

**विविध योजनांतर्गत शासनाने साखर कारखान्यांना व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केलेल्या अर्थ साहाय्यची रक्कम मार्च २०१० अखेर रु. ३६७४.६० कोटी आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाकडून साखर कारखान्यांना विविध योजनांतर्गत रु. १३५२ कोटींचे अर्थसहाय्य मिळाले आहे. एवढे अर्थसहाय्य देऊनसुद्धा प्राप्त असलेल्या तपशीलानुसार ११८ कारखान्यांपैकी ४५ कारखाने हे बऱ्याच कालावधीपासून तोट्यात आहेत व त्यांचा तोटा वाढतच आहे.**

याचे उदाहरण म्हणजे विघ्नहर साखर कारखान्याने बॉयलर सप्लायरला २.२१५ कोटी रुपये ॲडव्हान्स हा बँक गॅरेंटी न घेता दिला. नंतर त्यांच्यामधे टर्म्स कंडीशनवरुन वाद झाल्याने सदरची ऑर्डर कारखान्याने रद्द केली. सदरचा ॲडव्हान्स मार्च २०११ पर्यंत कारखान्याने वसूल केला नाही. सदर सप्लायरला काळ्या यादीत टाकण्याच्या सूचना सहकार मंत्र्यांनी केल्या. पण साखर आयुक्त कार्यालयाने त्यावर अजून काहीच कारवाई केली नाही. त्याचप्रमाणे साखर आयुक्त यांनी सेक्शन ७८ प्रमाणे निष्काळजीपणाबद्दल निघ्नहर कारखान्यावर आत्तापर्यंत कारवाई केली नाही. अशाच प्रकारे अंदाजे २० कोटी रुपये अनेक सप्लायर्सनी कारखान्याचे बुडविले आहेत.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सेक्युरिटायझेशन कायद्याखाली विकलेल्या ९ सहकारी साखर कारखान्यांकडे १९८.७५ कोटी रुपयांचे शासनाला येणे बाकी आहे. बँकेने हे साखर कारखाने खाजगी कंपन्यांना विकताना शासनाशी कुठलीही सल्ला मसलत केली नाही. त्यामुळे हे १९८ कोटी रुपये वसूल झालेले नाहीत. त्यासाठी साखर आयुक्तालयाने कुठलीही हालचाल केलेली नाही.

मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह ॲक्ट २००२ च्या अंतर्गत ज्या मल्टी स्टेट को- ऑपरेटीव्ह संस्थांमधे केंद्र अथवा राज्य शासनाचे भांडवल गुंतलेले आहे त्या संस्थामधे सदरच्या संस्थाच्या कार्यकारी मंडळावर सरकारचे प्रतिनिधी दिलेल्या कर्जाच्या प्रमाणात नेमायचे असतात. परंतु कोणत्याही मल्टी स्टेट को-ऑपरेटीव्ह झालेल्या साखर कारखान्यांमधे अशा प्रकारचे शासनाचे प्रतिनिधी नेमलेले दिसत नाहीत. काही संस्थांची उदाहरणे देत महालेखाकारांनी हा आक्षेप घेतला आहे.

अनेक सहकारी साखर कारखाने जे मल्टी स्टेट मधे रुपांतरीत झाले आहेत त्यांनी सरकारची जुनी देणी दिलेली नाहीत. उदाहरणादाखल श्री महांकाली स.सा.कारखाना, कवठेमहांकाल हा कारखाना मल्टी स्टेट मधे जानेवारी २००८ मधील ना हरकत प्रमाणपत्रानुसार रुपांतरीत झाला. त्यावेळी ह्या कारखान्याचे शासकीय देणी रु. १२.७६ कोटी रुपये होते. जरी सदरच्या कारखान्याने लेखी स्वरुपात कर्ज परताव्याची हमी दिली होती तरी सुध्दा मार्च २०११ अखेर पर्यंत ह्या कारखान्याने शासकीये देणे रु. १२.७६ कोटी दिलेले नाहीत.

ह्याचे अजून एक उदाहरण म्हणजे डोंगराई सागरेश्वर सहकारी साखर कारखाना. सदरचा कारखाना एप्रिल २००५ मधे सेंट्रल रजिस्ट्रारच्या आदेशानुसार साखर आयुक्तलयाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेताच मल्टी स्टेटमधे रुपांतरीत झाला. नंतर हा कारखाना कंपनीज ॲक्ट १९५६ अंतर्गत मे. केन ॲग्रो कंपनी लिमीटेड ह्या नव्या नावाने नोंदणीकृत झाला. ह्या कारखान्याने शासकीय देणे रु. ६५.५३ कोटी रुपये आजपर्यंत दिलेले नाहीत. सदर कारखान्यावर महाराष्ट्र शासनाच्या इच्छे विरुध्द सदर संस्थेचे बहुराज्यीय संस्थेमधे रुपांतर केलेबद्दल संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द राज्य शासनाने माननीय उच्च न्यायालयात जाऊन सदर रुपांतर रद्द करुन घेणे योग्य ठरेल तसेच महाराष्ट्र शासनाचे भाग भांडवल व इतर मदत घेऊन सदर रकमेचा परस्पर गैरव्यवहार केल्याबद्दल संबंधिताना जबाबदार धरण्यासंबंधी व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासंबंधी साखर आयुक्त कार्यालयाने शासनास कळविले आहे. पण चार वर्षांपासून शासन त्यावर काहीही कारवाई करत नाही.

या खेरीज कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध असताना आयुक्तांच्या परवानगीशिवाय बाहेरील ऊस आणणे, पैसे नसताना किमान दरापेक्षा ऊसाला जास्त दर देणे, परराज्यातून परवानगीशिवाय ऊस आणणे अशा अनियमितता व त्यामुळे उत्पादन खर्चात झालेली वाढ महालेखापालांना आढळून आलेली आहे. २००७-२०१० ह्या कालावधीत १८ साखर कारखान्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध असताना सुध्दा २० लाख मे.टन ऊस बाहेरुन आणून खर्चात वाढ केली आहे. तसेच कृष्णा व दौलत ह्या कारखान्यांनी साखर आयुक्तालयाची परवानगी न घेता १११८० मे.टन ऊस बाहेरुन आणला. परीक्षण केलेल्या ५ कारखान्यांनी २००७-२०१० ह्या कालावधीत २४० कोटी रुपये हे जादा ऊस दर देण्यात घालवले आहेत.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे साखर आयुक्तालयाकडे ऊस



## मा. वामनराव चटप

सहकारी साखर कारखान्यांना व त्या संबंधीत असणाऱ्या संस्थांना राज्य सहकारी बँकांनी कर्ज दिलेल आहे व त्याला राज्य सरकारची थकहमी आहे. आणि हे कर्ज जवळजवळ ३७०० कोटींच्याआसपास थकलेले आहे. व हे सर्व कर्ज साखर कारखाने भरू शकत नसल्यामुळे (एनपीए) बुडीत निघालेली कर्ज झालेली आहे. त्यामुळे राज्य सहकारी बँक डबघाईस आली असून त्यांचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले आहे व राज्य सहकारी बँक व त्योंच्या संबंधित बँका पीक कर्ज देण्यास असमर्थ ठरल्यामुळे शेवटी २३०० कोटींच्या पीक कर्जासाठी राज्य सरकारला राष्ट्रीय कृत बँकाकडे धाव घ्यावी लागली आहे. या सहकारी कारखान्यांपैकी बव्हंशी कारखाने हे आजारी अवस्थेत आहेत.



## मा. रवि देवांग

या अहवालाने सरकारमधील मंत्री राज्यशिखर बँकेतील संचालक आणि साखर कारखान्यांचे चेअरमन या तिघांनी संगनमताने शेतकऱ्यांचा पैसा कसा लुटावा ही गोष्ट जगजाहीर केली आहे. याच्यामध्ये साखर कारखान्यांना कर्ज मंजूर करणारे, साखर कारखान्यांची हमी घेणारे आणि साखर कारखाने बुडवणारे हे एकाच माळेचे मणी आहेत ही गोष्ट कॅगने चव्हाट्यावर आणली आहे. शेतकऱ्यांनी सहकार किती दिवस पोसावा असा प्रश्न सामान्यांना पडला आहे. सहकारात स्पर्धा आल्याशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणे शक्य नाही. ही संघटनेची भूमिका कॅगने प्रसारित केली आहे.



## मा. संजय कोले

कॅगच्या अहवालामुळे हे सिद्ध झालेले आहे की कारखान्यांनी निव्वळ शेतकऱ्यांचीच लूट केली असे नव्हे, तर सहकारी कारखानदारीतून जी सत्तेची पदे मिळाली त्याचा वापर करून सरकारी पैसा सरकारी बँका, वित्तीय संस्था यांच्या पैशांबरोबरच काही खासगी वित्तीय संस्थांचाही पैसा लुटला आहे. जिथे जाऊ तिथे खाऊ याच्या पलीकडे या मंडळींनी दुसरा काहीही उद्योग केलेला नाही. शेतकऱ्यांचे पैसे खाऊन आमच्या परिसरात अनेक संचालक चेअरमननी स्वतःचे खासगी कारखाने कर्नाटकातसुद्धा काढले आहेत. ते सर्व शेतकऱ्यांचे घामाचे पैसे आहेत व हे लुटणारे आजही सत्तेत आहेत. त्यांचा बंदोबस्त केल्याशिवाय शेतकऱ्यांची लूट थांबणार नाही. याविषयी पुढील धोरण ठरविण्यासाठी जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात सांगली येथे शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाची सहकारी कारखानदारीबाबत व कॅगच्या अहवालाबाबत चर्चा करून पुढील धोरण ठरविण्यासाठी परिषद घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा.

लागवडीसंबंधी व ऊस उत्पादना संबंधी खात्रीशीर माहिती उपलब्ध नसते. प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या ऊस लागवडीची नोंद सहकारी साखर कारखान्याकडे व तलाठ्याकडे करावी लागते. ही माहिती साखर कारखान्याकडे नियमीत येत असते. साखर आयुक्तालयाला ही माहिती योग्य नियोजन आणि क्रशिंग लायसेन्स देण्यासाठी गरजेची आहे. परंतु साखर कारखाने, महसूल खाते आणि पाटबंधारे खात्याकडील माहितीमधे बराच फरक असतो. अशा अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीवर आधारीत नियोजन करण्यात येत असल्याने प्रत्यक्ष उपलब्ध ऊस आणि साखर आयुक्तांनी दिलेले गाळप परवाने यांचा मेळ बसत नाही. परवान्याप्रमाणे गाळप पूर्ण झाल्यावरही ऊस शिल्लक असल्याचे दिसून येते. २००६-०७ या वर्षासाठी शिल्लक ऊसासाठी शासनाने १३१ कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. योग्य नियोजनाअभावी शासनाला मोठी नुकसान भरपाई द्यावी लागते.

विविध साखर कारखान्यांच्या तोडणी व वाहतूक खर्चात प्रमाण खर्चापेक्षा ४ ते ७३२ टक्के इतका जास्त खर्च दिसून येतो. ही प्रचंड तफावत कमी करण्याच्या दृष्टिने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

शासनाच्या साखर नियंत्रण कायद्याअंतर्गत एकूण साखर उत्पादनाच्या १०% साखरेचा साठा हा राज्य शासनाला लेव्ही कोटा म्हणून द्यावयाचा असतो जो आर्थिकदृष्या कमकुवत लोकांना स्वस्तात विकला जातो. उरलेली साखर ही निविदा पध्दतीने विक्री करायची असते. २००३-२००४ मधे स्टॅटच्यूटरी ऑडिट मधे असे आढळले आहे की काही साखर कारखान्यांनी योग्य निविदा पध्दत न अवलंबता साखरेची कमी दरात विक्री केली आहे. तसेच २००७-२०१० ह्या काळात तपासलेल्या ३४ साखर कारखान्यांपैकी १८ साखर कारखान्यांनी ३ लाख क्विंटल साखर ही कमी दरात विकली ज्यामुळे १४.७० कोटी रुपयांचा तोटा झाला. २००८-०९ ह्या कालामधे वैद्यनाथ, पांडुरंग, निफाड, बागेश्वरी, अंबेजोगाई, कडा, गजानन, समर्थ आणि माझलगांव ह्या नऊ साखर कारखान्यांनी परदेशात कमी दराने साखर विकली. विक्रीचा दर हा लोकल मार्केटपेक्षा कमी होता कमी किंमतीत साखर विकल्यामुळे ह्या साखर कारखान्यांना ३१ कोटी रुपयांचा तोटा झाला. ह्या सर्व बाबतीत साखर आयुक्त काहीही कारवाई करण्यास असमर्थ दिसत आहे असा आक्षेप महालेखाकारांनी घेतला आहे.

भारत सरकारने राज्य शासनाला बहाल केलेला साखरेचा कोटा हा राज्य शासनाने २००७-२००९ पासून कारखान्यांतून उचललेला नाही. त्यामुळे मार्च २०१० अखेरीस ९३ साखर कारखान्यांमधे ६००४१ मे.टन इतका साखरेचा प्रचंड साठा शिल्लक आहे. परीक्षण केलेल्या ११ साखर कारखान्यांमधे साठलेला साखरेचा साठा १११५६ मे.टन इतका आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना त्यांच्या कर्जाची परतफेड करणे अवघड झाले आहे व थकीत रकमेवरील व्याजावर प्रचंड प्रमाणात खर्च होत आहे. ह्यासाठी ना भारत सरकारने काही कारवाई केली ना राज्य शासनाने भारत सरकारला काही कारवाई करण्याची विनंती केली. ह्यामुळे साखर कारखान्यांचा तोटा वाढतच चालला आहे.

**२००७-०८ ते २००९-१० या काळात विकल्या गेलेल्या २०८१.७५ लाख क्विंटल साखरेच्या विक्री रकमेतून ५२१ कोटी रुपये वळते करून घ्यायला हवे होते; परंतु महाराष्ट्र राज्य बँकेने सदरची रक्कम वसूल करून शासनाला दिली नाही.**

शासन साखरेच्या निर्यातीसाठी रु. १०००/- प्रति मे.टन इतकी सबसिडी देते. ह्यापुढे जाऊन शासनाने रु. १३५०/- प्रति मे.टन इतके साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य करते. असे साखर निर्यातीसाठी एकूण रु. २३५०/- प्रति मे. टन सहाय्य करते. परंतु राज्य शासनाने त्यासाठी अट घातली आहे की साखर निर्यातीचा खर्च हा कुठल्याही परिस्थितीमधे रु. २३५०/- प्रति मे.टन च्या वर जाता कामा नये. साखर निर्यातीसाठी केलेल्या खर्चाचे तपशील साखर आयुक्तालयाकडे उपलब्ध नाहीत. एप्रिल २००७ ते सप्टेंबर २००८ ह्या काळात शासनाने एकूण रु. ४०१.७१ कोटी रुपयांची सबसिडी दिली आहे. खर्चाचे तपशील उपलब्ध नसल्यामुळे दिली गेलेली सबसिडी ही जास्त प्रमाणात आहे का कसे हे पडताळून पहाता येत नाही.

महाराष्ट्रात साखर, मळी, मद्यार्क यांच्या विक्रीची किंमत ८००० कोटी रुपये आहे. स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवण्याची पध्दत आहे. टेंडरला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळावा व निकोप स्पर्धा निर्माण व्हावी या करता साखर आयुक्तांनी २००६ मधे ३४ लाख रुपये खर्च करुन एक वेबसाईट तयार केली आहे. परंतु २०११ पर्यंत ही वेबसाईट वापरात आणायला मुहूर्त मिळालेला नाही. २००८ मधे या बाबत विचार सुरु असल्याचे शासनाने म्हटले होते पण अजून विचार पूर्ण झाल्याचे दिसत नाही.

साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांची समिती नेमण्यात आली. ह्या समितीचे काम आहे की साखर कारखाने सुरु करत असलेल्या को-जनरेखन प्रकल्पांच्या उभारणीवर, खरेदीवर लक्ष ठेवणे. तसेच अशा प्रकल्पांना तांत्रिक सल्ल्यासाठी सदस्यांची नेमणूक करणे. परंतु मार्च २०११ अखेरपर्यंत कोणत्याही को-जनरेशन प्रकल्पांवर ना अशा प्रकारचे तांत्रिक सदस्य नेमले ना प्रकल्पासाठी काही नियमावली वा मार्गदर्शन कारक तत्वे दिली गेली. त्यामुळे साखर कारखाने सुरु करत असलेल्या को-जनरेशन प्रकल्पांची अंदाजित आकडेवारी/नफा आणि प्रत्यक्ष नफा यात चिंताजनक तफावत आहे. महालेखापालांना दिलेल्या उदाहरणांवरून सहकारी साखर कारखान्यांनी सहवीज उत्पादन प्रकल्प योग्य आणि तज्ञ संस्थांकडून काळजीपूर्वक उभारला पाहिजे असे दिसते. आर्थिक अडचणी, प्रकल्प अहवाल तयार करण्याऱ्या संस्थांनी कागदावर दाखवलेला अवास्तव नफा, प्रकल्पातील तांत्रिक त्रुटी, अंमल बजावणीतील उशीर अशा बाबी नुकसानीस कारणीभूत ठरल्या आहेत. सहवीज उत्पादन अपेक्षेइतके उत्पन्न देत नाहीत असे दिसून आले आहे.

यशवंतराव मोहिते कृष्णा कारखान्याने डायरेक्ट इन्सलिरेशन एनर्जी जनरेशन प्लॅण्ट वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या सहाय्याने १४ कोटी रुपये खर्च करुन १९९३ मधे टाकला. तो प्रकल्प मार्च २०१० पर्यंत करोडो रुपयांचा तोटा करत आहे. तसेच वसंतदादा शुगर्स सांगली व विठ्ठलराव विखे पाटील यांनी सुध्दा करोडो रुपये खर्च करुन केमिकल प्लॅण्ट टाकले ते सुध्दा तोट्यात चालत आहेत.

सातपुडा तापीने ७५ कोटी रुपये खर्च करुन पार्टीकल बोर्ड प्रोजेक्ट टाकला. तसेच दौलत साखर कारखान्याने ५० कोटी रुपये खर्च करुन पार्टीकल बोर्ड प्रोजेक्ट टाकला. त्यात प्रचंड तोटा झाला आहे. वसंतदादा कारखान्याने १९९४-९५ मधे त्याच्यांच मॅनेजमेंट खाली असलेल्या यूथ डेव्हलपमेंट को-ऑपरेटीव्ह सोसायटी मधे ८ कोटी रुपये गुंतवले. त्या पैशांपैकी बरेच पैसे सोसायटीकडे येणे बाकी आहेत. वरील प्रकरणामधे गंभीर गुन्हा असून साखर आयुक्त कार्यालयाने सहकारी कायद्याखाली वसंतदादा शुगर वर व क्रेडिट सोसायटीवर काहीच कारवाई केली नाही.

तसेच मद्यार्क प्रकल्प, बायोगॅस प्लॅण्ट, इथेनॉल प्रॉजेक्टस, पेपर आणि पार्टीकल बोर्ड प्रॉजेक्टस

अशा सह-उत्पादन प्रकल्पामधे अनेक साखर कारखान्यांनी पैसे गुंतवले आहेत. असे बहुतांशी प्रकल्प त्यांच्या पूर्ण क्षमतेने न चालल्यामुळे तोट्यात आहेत असेही महालेखापालांनी निदर्शनास आणून दिले आहेत.

अशा आक्षेपांबरोबरच सहकारी साखर कारखान्यांचा पैसा इतर सहकारी संस्थांमधे नियमबाह्य पध्दतीने गुंतवणे, जादा कर्मचारी भरती करणे, सदोष पाणीपुरवठा योजना हे आक्षेप सुध्दा अहवालात आहेत.

साखर आयुक्त कार्यालयाने १९९३ मधे आणि २००४ मधे कामगारांची संख्या निश्चित केली होती. पण प्रत्यक्षात अनेक साखर

कारखान्यांमधे कामगारांची संख्या जादा प्रमाणात आहे. त्यामुळे साखर कारखान्याचे प्रत्येक वर्षी १५० ते २०० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे.

सहकारी साखर कारखान्यांना १६ प्रकारच्या साप्ताहिक/मासिक/अर्धमासिक रिटर्न्सव्दारे ऊस उत्पादन, साखर उत्पादन, मद्यार्क उत्पादन, ऊसाचे पेमेंट, साखर विक्री, इतर खरेदी इत्यादिंची माहिती साखर आयुक्तांना सादर करावी लागते. या रिटर्न्सवर नजर ठेवणे, यात असलेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण करणारी कुठलीही यंत्रणा साखर आयुक्तालयाकडे नाही. २००८ मधे ही माहिती संगणकावर टाकून त्याचा उपयोग चांगल्या व्यवस्थापनासाठी करु असे आश्वासन देणाऱ्या साखर आयुक्तांनी २०११ पर्यंत काहीही कार्यवाही केलेली दिसत नाही. तसेच महाराष्ट्र शुगर इन्फोर्मेशन सिस्टिम २९ लाख रुपये खर्च करुन तयार केली आहे. परंतु आजपर्यंत या संगणकाचे प्रोग्रॅममधे माहिती भरली गेली नाही. २००७ मधे सहकार सचिवांनी या प्रणालीचा वापर करु असे आश्वासन दिले होते. २०११ पर्यंत ही संगणक प्रणाली वापरावाचून पडून आहे. यावरुन साखर आयुक्तालय हे जास्तीत जास्त निष्क्रीय राहील अशी परिस्थिती तयार झाली आहे.

बंद पडलेले, आजारी असलेले व भाडे तत्वावर दिलेले कारखाने अवसायानात काढण्यात साखर आयुक्तालय अपयशी ठरले आहे. कारखाने लिक्वीडेशन मधे काढायची प्रोसेस ही १० वर्षाचा नमूद कालावधी लोटल्यावर सुध्दा अपूर्ण आहे. भाडे तत्वावर दिलेल्या कारखान्यांकडून भाडे वसूली होत नाही तसेच सदरचे कारखाने भाडेकराराचे नियम पाळत नाहीत. अशा मुळे शासनाची देणी व त्यावरील थकीत व्याज ह्याची रक्कम वाढतच आहे असे महालेखालांनी नमूद केले आहे.

**शासनाने सहकारी साखर कारखान्यांना वेळोवेळी दिलेली कर्जे, भागभांडवल व अनुदाने यांचे लेजर साखर आयुक्तालयाच्या विभागीय सहसंचालकांनी ठेवायचे असते; पण एकाही सहसंचालकांकडे असे अद्ययावत लेजर नाही.**

बाराशीव हनुमान साखर कारखान्याने पूर्णा सहकारी साखर कारखान्याशी पार्टनरशिप अॅग्रीमेंट केले. पण त्याला कुठलीच टेंडर प्रोसीजर वापरात आणली नाही. लिज रेंट सुध्दा कमी ठरविला गेला. ८ ते १० कोटी रुपयांचा लिज रेंट सदर कारखान्याकडून येणे बाकी आहे. त्यासाठी साखर आयुक्त कार्यालयाने काहीच कारवाई केली नाही.

अनेक साखर कारखान्यांमधे सक्षम कार्यकारी संचालक नेमलेले नाहीत. अनेक साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची सर्वसाधारण माहिती देखील नाही.

साखर आयुक्त कार्यालयाची अनेक साखर कारखान्यांमधे म्हणजे जवळ जवळ १८५ साखर कारखान्यांमधे गंभीर बाबींची चौकशी चालू आहे. परंतु साखर आयुक्त कार्यालयाने साखर कारखान्यांची १९९९ ते २०१० पर्यंत काहीच चौकशी न केल्यामुळे ती प्रकरणे धुळ खात पडती आहेत. अशा प्रकारच्या चौकशीची कारवाई करण्यात साखर आयुक्त कार्यालय निष्क्रिय ठरले आहे.

विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा, निफाड, बाबासाहेब आंबेडकर, कृष्णा, भाऊराव चव्हाण, सागर, निरा भीमा, समर्थ, वैद्यनाथ, सिध्देश्वर, राजारामबापू, रेना, माझलगांव, जयभवानी, इत्यादी साखर कारखान्यांनी ४ ते २३ महिन्याचा वार्षिक अहवाल सादर करण्यास उशीर केला आहे. त्यावरही साखर आयुक्त कार्यालयाने काहीच कारवाई केली नाही.

महालेखाकारांचे पुढे असेही म्हणणे आहे की कारखान्यांचे स्टॅट्यूटरी ऑडीट करण्यास १ ते ११ वर्षेइतका विलंब झाला आहे. तसेच झालेल्या ऑडीटला मिळालेला प्रतिसादही समाधानकारक नाही. ह्यावर साखर आयुक्तालयाने काहीही कारवाई केलेली दिसत नाही. साखर कारखान्यांच्या कार्यपध्दतीची वेळोवेळी करावयाची तपासणीही साखर आयुक्तालयाने केलेली दिसत नाही. साखर कारखान्यांमधे होणाऱ्या कार्यकारी संचालकांच्या नियुक्तीवर सुध्दा साखर आयुक्तालयाने लक्ष दिलेले नाही. कारखाना सुरळीतपणे व पूर्ण कार्यक्षमतेने चालावा ह्यासाठी आवशक असलेल्या प्रगल्भ कार्यकारी संचालकाच्या नेमणुकीवर साखर आयुक्तालयाचे काहीही नियंत्रण नाही. तसेच कारखान्यांच्या संचालक मंडळाबाबतच्या आलेल्या काही तक्रारींचे सुध्दा निवारण करुन त्यांच्या विरुध्द काही कारवाई साखर आयुक्तालयाने केले नाही.

सिध्देश्वर सोलापूर, राजारामबापू पाटील, वसंतदादा, कृष्णा, दौलत, निरा भीमा, पांडुरंग, रेणा, आंबेडकर, जयभवानी, सागर, माझलगांव इत्यादी साखर कारखान्यांकडे ७२ कोटी रुपयांची अनामत रक्कम येणे बाकी आहे.

नवले यांचा संत तुकाराम, सहकार राज्यमंत्री प्रकाश सोळंकी यांचा माझलगांव, शिवाजीदादा पाटील यांचा शिरपूर, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा भाऊराव चव्हाण या कारखान्यांकडे करोडो रुपयांच्या भाग भांडवलापोटी येणे बाकी आहे. तरीसुध्दा सदर कारखाने अनेक प्रकल्प उभे करत असून सरकारी देणी असताना सुध्दा साखर आयुक्त कार्यालय त्यास मंजूरी देत आहे.

माझलगांव, भाऊराव चव्हाण अशा कारखान्यांनी ऊस तोडणी व वहातूक कर्ज शेतकऱ्यांकडून वळते केले आहे परंतु त्याचा भरणा बँकेत केला नाही.

साखर कारखान्यांचे एनर्जी व कॉस्ट ऑडीट करुन त्यांच्या कार्यकारणीचा वेळोवेळी आढावा घेण्यासही साखर आयुक्तालय असमर्थ ठरले आहे असा आरोप महालेखाकारांनी केला आहे. सरकारने साखर कारखान्यांचे आजारीपण दूर करण्यासाठी गोडबोले कमिटीची स्थापना केली होती. सदरच्या कमीटीने सुचवलेल्या सूचनांचे/उपयांचे पालन मार्च २०११ अखेरपर्यंत झालेले नाही असेही महालेखाकार म्हणतात.

आधीच साखर उद्योग अडचणीत आहे. त्यात अजून ८८ सहकारी साखर कारखान्यांचे कामकाज अव्यवस्थित आणि बेजबाबदार होत आहे. यात शासनाचे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे, इतर वित्तीय संस्थांचे शेकडो कोटी रुपये गुंतले आहेत. साखर आयुक्तालय असून अडचण नसून खोळंबा अशी भूमिका निभावत आहे. या परिस्थितीला निरीक्षण/परीक्षणाव्दारे महालेखापालांनी दुजोरा दिला आहे..

**संदर्भ :** साखर डायरी दि. ६ जून २०११ मधून साभार

संपादन : **ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■


# आंदोलकांवर राष्ट्रद्रोहाचे कलम

**विपश्यना ध्यान शिकल्यावर त्यांचा 'बुद्ध अँण्ड हीज धम्मा' या ग्रंथाचं पारायण केलेला. डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस वंदन करून त्यांनी दिलेल्या देशाच्या मूळ घटनेची पुर्नस्थापना व्हावी म्हणून संकल्पबद्ध झालो. जबरदस्त घोषणाबाजी झाली. कर कर्जा नहीं देंगे- कुणब्याच्या पोरा आता मारायला शिक इ. ने परिसर दणाणला. विद्यमान घटना जाळायची नव्हतीच; पण परिशिष्ट (९) जाळायचे होतेच. पोलिसांनी गराडा घातला. प्रचंड हातापाई झाली. ऐनवेळी माचीस सापडेना. परिशिष्ट (९) ची झेरॉक्स प्रत जप्त झाली. तेवढ्यात ८२ वर्षांचे शेवाळी (ता. साक्री) चे भिका अप्पा कडाडले, खबरदार मला फाशी देऊन टाका; पण शेतकऱ्याचा गळफास असलेले परिशिष्ट नऊ मला जाळू द्या. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भिका अप्पा इयत्ता पाचवीत होते. रात्रभर नाचून त्यांनी त्यावेळी पाय सुजवून घेतले होते.**

धुळ्याचे डीएसपी यांच्यावर तोंड काळं करून घेण्यापेक्षा, तोंड लपवून पळून जाण्याची नामुष्की आली. छप्पन पोलिस कर्मचाऱ्यांच्या तोंडी बदल्या करून बेणं लाटल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एका बदलीची सरासरी किती किंमत आकारावी? माझ्याएका अभियंता (सिंचन) मित्राने कार्यकारी अभियंत्याच्या बदलीसाठी दहा वर्षांपूर्वी ३५ लाख रु. मोजल्याचे सांगितले होते. त्यामुळे २जी स्पेक्ट्रम घोटाळ्याचा, म्हणजे खरे सरकारी महसूल बुडविल्याचा आकडा २ लाख ७६ हजार कोटी रुपयांच्या घरात गेल्याचे काही आश्चर्य वाटले नाही. मोबाईल कंपन्यांना किती कोटी रुपयांचा फायदा झाला असावा? ए. राजांना किती कोटी मिळाले असावेत? श्रीमती कनिमोझी किंवा कनीमोळी यांना किती कोटी मिळाले असावेत? यातील खरे आकडे कधीही बाहेर येणार नाहीत; पण शिंदे धुळ्यातून कोट्यवधी रुपये घेऊन गेलेत यात शंकाच नाही.

आम्ही उ. महाराष्ट्र विद्यापीठ आंदोलनासाठी १९७२ साली चळवळीत होतो. त्यावेळी पी.एस.आयचा रेट फक्त २५००० रु. होता. गृहराज्यमंत्री होते शरदचंद्रजी पवार... आता महागाई खूप वाढली आहे, त्यामुळे रेट बदलणंही साहजिकच आहे.

लाच घेणे हा गुन्हा आहे; पण आपल्या देशात अशा गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रकार अत्यल्प आहे. म्हणूनच अण्णा हजारेंना जनलोकपाल विधेयक प्राणाची बाजी लावून आणावे लागत आहे; पण लाच देणं हासुद्धा गुन्हा आहे. आता या 'छप्पन' छुऱ्यांना काही शिक्षा होणार आहे काय? बहुधा नाहीच. प्रश्न डिपार्टमेंटच्या शिस्तीचा आहे. विचारवंतांना यामुळे डिपार्टमेंटवरील विश्वास नष्ट होण्याचा धोका वाटतो. सिस्टीम अशीच चालू राहिली पाहिजे म्हणून अंडीपिल्ली बिंग चव्हाट्यावर येऊ नये म्हणून सबंध प्रकरणाची गोपनीय चौकशी होऊन प्रकरण 'फाईल' केले जाईल. पुन्हा नवी विट्टी नवे राज्य, शिंदे गेले देशपांडे आले. आता नवे भिडू नवे राज्य. पंत गेले राव चढले. नवे हप्ते नवे डिलींग... फार तर एखादा दुसरा सोनवणे जिवंत जाळला जाईल. शो मस्ट गो ऑन...


रवि देवांग

तर सांगत होतो... शशिकांत शिंदे धुळ्याला आले होते. त्यांनी बहुदा चळवळ्या कार्यकर्त्यांची माहिती घेतली असावी. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते यांच्याजवळ ते म्हणाले मला रवि देवांग यांना भेटायचं आहे. पुढे ते मला शहरातून परागंदा होईपर्यंत भेटले नाहीत; पण एसेमेस पाठवत राहिले. इतका दिखावा करणारा माणूस नक्की फ्रॉड असला पाहिजे असा मोझा होरा होता. अनिल अण्णा गोटेंची तशी खात्रीच असावी. ते खरेही ठरले.

दिवाळीच्या सुमारास त्यांनी फराळाला बोलावले. मी टाळायचं ठरवलं; पण श्याम पाटलांनी (नर्मदा फेम) आग्रह धरला. गेलो. लखनजी आणि लक्ष्यवेधी जेजी होते. आमच्या गप्पा रंगल्या. थेट आणीबाणीपासून तर आजपर्यंत. डीएसपींचा पत्ता नाही. मी कंटाळून निघून गेलो. दारात टोळकं उभं होतं. घोळक्यात इजा बिजा तिजा मध्ये 'बाज्या' होता. ही मांदियाळी पाहिल्यावर मा श्यामला म्हणालो, तुझा माझा धंदा एक नंबरचा आहे, की दोन नंबरचा अशीच मला शंका येऊ घातली. डीएसपींना न भेटताच घरी आलो.

छप्पन पोलिस कर्मचारी बायकामुलांसह कुटुंब कबिल्यासह डीएसपींच्या बंगल्यावर. डीएसपी लपून बसलेले, हे दृश्य मोठे विदारक, गंभीर. आपल्या व्यवस्थेचे लक्तरं टांगणारे; परंतु तरीही मनोरंजकच होते. स्थानिक टीव्ही चॅनेलवर एकदोन गोलमाल प्रतिक्रियाही पाहिल्या. झालं पायजेल आहे. केलं पायजेल आहे इत्यादी इत्यादी.

चॅनेल बदलला. स्टार माझा वर वृत्तपट्टीका सरकत होती. ती अर्थात फारशी महत्त्वाची न्यूज नव्हती. त्यामुळे ब्रेकींग असण्याचा प्रश्नच नव्हता. सामाजिक कार्यकर्ते डॉ. विनायक सेन राष्ट्रद्रोहाचे कलम वगळण्यासाठी दहा लाख सह्यांची मोहीम राबविणार... डॉ. सेन हे प्रतिष्ठीत सामाजिक कार्यकर्ते. देशातील सर्व डाव्या इंटलेक्च्युअल्सचा भक्कम पाठिंबा असलेले झळाळी प्राप्त कार्यकर्ते.

शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता म्हणून मला या




सह्यांच्या मोहिमेत भाग घ्यावासा वाटला... त्याला कारणही तसंच होतं. संघटनेचा अध्यक्ष झाल्यापासून संघटक बारकाईनं वाचणं क्रमप्राप्त होतं. ॲड. सुभाष खंडागळे यांचे भारतीय संविधान शेतकरी विरोधीच, असे पाठोपाठ तीन लेखांक वाचले. फारसे समजले नाही. पुन्हा वाचले, दोनदा, तीनदा. थोडा उजेड पडला. दोन-चार दिवस झोप आली नाही. अस्वस्थता शिगेला पोहोचली. घटनेतील परिशिष्ट (९) ही नवी मनुस्मृती आहे आणि स्वतंत्र्यवाद्यांपुढील ते आव्हान आहे. या लेखाच्या शेवटच्या वाक्याने मला डोकं फिरलया, बाप्पाचं डोकं फिरलया असं झाले.

चौदा एप्रिलची तारीख मी म्हणत होती. कार्यकारणी लांब होती. फिल्डवरचा कार्यकर्ता मी. अध्यक्ष होतोच; पण एरवी वरिष्ठ नेत्यांशी संपर्क करून त्यांच्या सल्ल्याने निर्णय घेणारा. कामगिरी करून दाखवायची ठरवलं.

शेतकऱ्यांना मालमत्तेचा मूलभूत अधिकार नाकारणारे, जीवनावश्यक वस्तू कायदा या अंतर्गत शेतीमालाला बाजारपेठेचे स्वातंत्र्य नाकारणारे निर्यातबंदी लादून भाव पाडणारे, विकास कामांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी मातीमोल (खरं तर त्याला माती मोत्याच्या मोलाची असूनही) किमतीत घेऊन 'यमायडीशा' काढून उद्योगपतींना सोन्याच्या भावात विकायला कायदेशीर अधिकार देणारे घटनेतील परिशिष्ट (९) शिलगावून टाकायचे मी ठरवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ जानेवारी १९५० साली देशाला व्यक्ती स्वातंत्र्यवादी घटना दिली. ती उदारमतवादी घटना पुढे समाजवादी झाली. त्याआधीच १९५१ साली पंडित नेहरूंनी देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक होण्याअधीच बदलून टाकली आणि शेतकरी, लघु उद्योजकांना, गुलाम करून गेली. मी परिशिष्ट (९) चे दहन करण्याची घोषणा केली. लोकसत्ताने प्रादेशिक पानावर वृत्त छापले. या आंदोलनाची रिस्क पाहता हे आंदोलन मी एकट्यानेच प्रथमपुरुषी एकवचनी म्हणून करायचे ठरवले. तरीही लाल बिल्लाधारी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते वीर वेडात निघाले.

**बऱ्याच पोलिसांनी मला माझी जात विचारली. मी देवांग म्हणजे देवांग कोष्टी विणकर. पूर्वाश्रमीचा ओबीसी त्यामुळेच पुणे विद्यापीठाचा पदवीधर अभियंता झालेला. नंतर गोवारी कांडनंतर माझ्या जातीची रवानगी मागासवर्गीयांत, तेही विशेष मागासवर्गीयांत. पोलिस म्हणाले, आम्हाला वाटलं तुम्ही ब्राह्मणच आहात.**

दुपारी १२ च्या सुमारास देवपूर पोलिस स्टेशनचे पोलिस अधिकारी अकिल शेख पोलिसी लव्याजम्यासह ऑफिसात आले. संघटनेच्या कार्यालयात एक-दोन पत्रकार हजर. मी पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेजला असताना भावुर्डात आताचे महानगरपालिकेजवळील ताराबाई हॉस्टेलमध्ये डॉ. धनंजय कीर यांनी लिहिलेले डॉ. बाबासाहेबांचे चरीत्र वाचलेले, त्यामुळे भारावून गेलेलो.

पुढे विपश्यना ध्यान शिकल्यावर त्यांचा 'बुद्ध ॲण्ड हीज धम्मा' या ग्रंथाचं पारायण केलेला. डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस वंदन करून त्यांनी दिलेल्या देशाच्या मूळ घटनेची पुर्नस्थापना व्हावी म्हणून संकल्पबद्ध झालो. जबरदस्त घोषणाबाजी झाली. कर कर्जा नहीं देंगे- कुणब्याच्या पोरा आता मारायला शिक इ. ने परिसर दणाणला. विद्यमान घटना जाळायची नव्हतीच; पण परिशिष्ट (९) जाळायचे होतेच. पोलिसांनी गराडा घातला. प्रचंड हातापाई झाली. ऐनवेळी माचीस सापडेना. परिशिष्ट (९) ची झेरॉक्स प्रत जप्त झाली. तेवढ्यात ८२ वर्षांचे शेवाळी (ता. साक्री) चे भिका अप्पा कडाडले, खबरदार मला फाशी देऊन टाका; पण शेतकऱ्याचा गळफास असलेले परिशिष्ट नऊ मला जाळू द्या. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भिका अप्पा इयत्ता



पाचवीत होते. रात्रभर नाचून त्यांनी त्यावेळी पाय सुजवून घेतले होते.

किनगाव ता. यावलचे कडू आप्पा पाटील ज्यांचे वडील विनोबांचे सेवाग्रामला सेवक होते. ते महामानव बाबासाहेबांचे जयजयकार करत होते. आंदोलक २०, तर पोलिस सुमारे पस्तीस. सर्वांना उचलून व्हॅनमध्ये कोंबले. देवपूर स्टेशनला जत्रेचे स्वरूप, पत्रकारांची गर्दी. माझी बाईट. १६७ अन्वये अटक व १६८ अन्वये सुटका. आंदोलकांना कडक ताकीद पुन्हा असे करू नका...

आम्ही सगळेजण घरी... दोन तासांनी शांतू घरी आला. संघटनेचे कार्यालय फोडले. फर्निचरची नासधूस झाली. मॉब प्रचंड संतप्त आहे. घटनाच जाळल्याचा आरोप. पोलिस स्टेशनवरून मला बुलावा. मी निघालो एकटाच. रस्त्याच मला मॉबने गाठले. माझी प्रचंड धुलाई. मोटारसायकल स्टॅण्ड करायच्या आत डोक्यावर, डोळ्यावर टोले, पोटात लागणारे गुद्दे... मी पडलो. अर्धबेशुद्ध. तेवढ्यात एक माणुसकीभरा आवाज. अरे तो मरून जाईल. बस करा. पोलिस बघ्याच्या भूमिकेत. मला उचलून खासगी गाडीत कोंबले. शिवीगाळ, गाडीतून बाहेर आलेल शांतू पटेल, आत्माराम पाटलांचा संताप. एकाने गच्ची पकडली. सदरा फाडला. मग पोलिसांनी मला उचलून अज्ञातस्थळी नेले. १ दिवस रिमांड १५ दिवस न्यायालयीन कोठडी. शहरात तणाव. बातम्या सेन्सॉर झालेल्या. बऱ्याच पोलिसांनी मला माझी जात विचारली. मी देवांग म्हणजे देवांग कोष्टी विणकर. पूर्वाश्रमीचा ओबीसी त्यामुळेच पुणे विद्यापीठाचा पदवीधर अभियंता झालेला. नंतर गोवारी कांडनंतर माझ्या जातीची रवानगी मागासवर्गीयांत, तेही विशेष मागासवर्गीयांत. पोलिस म्हणाले, आम्हाला वाटलं तुम्ही ब्राह्मणच आहात.

रात्रभर झोप नाही. मी नामांतर चळवळीतला. ढसाळांना नाम्या म्हणणारा लतीफ खाडीकचा मित्र. पेटलेला मराठवाडा पाहिलेला. एसेम अण्णांना चपलांचा दिलेला हार आठवला. सगळी रात्र तळमळत काढली. दुसऱ्या दिवशीचा पुण्यनगरी 'बाहेर' आल्यावर आठ दिवसांनी वाचला. आंबेडकर जयंतीला घटना जाळणे हे षडयंत्रच- इति शशिकांत शिंदे. जातीय सलोखा फेम हेच ते शिंदे. घटना जाळली, की नाही याची खात्री न करताच बोंबलले. आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यावरही विश्वास न ठेवणारे.

न्यायालयात हजर केल्यावर कळले- शेतकरी संघटना अध्यक्ष रवि देवांग व इतर १८ यांच्यावर १२४ (अ) अन्वये राष्ट्रीय अवमानना. कलमाअंतर्गत आरोप. मी काय राष्ट्रद्रोह केला होता? अनिल अण्णा गोटेंचे मी मनोविकृत असल्याचे तयार पत्रक... 'मर्डर'मध्ये घटना घडल्याच्या सुमारास तत्परतेने तयार ठेवलेले. आदिवासी दलित शेतकरी मुसलमान या वंचितांसाठी तीव्रपणे लढणाऱ्या आंदोलनकर्त्यांना राष्ट्रद्रोहाचे कलम हा राजकीय काटा काढण्याचा प्रकार तर नाही?

मी क्रॉस कंप्लेंट केली नाही. याचा अर्थ मी गांडू नाही. जिल्हाधिकारी संयमाने वागले. अफवांवर विश्वास ठेवू नका. असे पत्रक काढले. त्यांना धन्यवाद! शशिकांत शिंदेंवर मात्र मी दावा दाखल करणार आहे. सामाजिक स्वास्थ्य बिघडविण्याच्या आरोपाखाली. त्याचबरोबर प्रतिभा शिंदेंसाठी राजद्रोहाचे कलम लागल्याचे कळाले म्हणून डॉ. सेन यांच्या सह्यांच्या मोहिमेस पाठिंबा. एवढेच... बाकी सगळं ठीक आहे.

**रवि देवांग**
मो. ९४२२२९६३५८
ravi.metta@gmail.com

■■

# बाबा, अण्णा आणि सरकार : नपेक्षा उशिरा बरे?

सर्व बाबींचा विचार करता, अर्ध्या रात्रीतून रामदेवबाबांची उचलबांगडी करून ते जिथले आहेत त्या हरिद्वारला त्यांची रवानगी करण्याची सरकारची कृती योग्यच होती हे मान्य करावे लागेल. ही कृती घाईची आणि धसमुसळेपणाची होती हे कबूल... बाबांवर स्त्रीवेषात लपण्याची आणि त्यांचा आधार घेण्याची परिस्थिती ओढवली तर त्यांच्या भगतगणांची (काहींच्या मतातली 'सिव्हील सोसायटी) दिल्लीतली रेल्वेस्टेशन्स गाठेपर्यंत पळता भुई थोडी झाली; पण दिल्ली पोलिसांनी जरा जादागिरी करण्याची परवानगी नेहमीच असते. माध्यमं आणि घायकुतीला आलेले विरोधी पक्ष याला 'लोकशाहीवरचा घाला' म्हणतील आणि १९७५-७७ च्या कुप्रसिद्ध आणीबाणीशी त्याची तुलना करू पाहतील; पण आणीबाणीशी लढणारे माझ्यासारखे लोक हे जाणून आहेत की बाबांना आणीबाणीशी काडीचेही देणेघेणे नाही.

होय, आम्हाला हे माहीत आहे, की उच्चपदस्थांच्या हाताबाहेर गेलेला भ्रष्टाचार हा राज्यसंस्थेला झालेला गँगरिनच आहे आणि परिस्थिती दिवसांगणिक अधिकच वाईट होत आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढाई ही काळाची गरज आहे आणि अक्षम्य उशिरानेच आपण जागे झालो आहोत! तरीसुद्धा या लढाईचे नियम आणि चौकट नीटपणे आखलेली हवी आणि बाबांसारख्या स्वयंघोषित उपटसुंभ नेतृत्वाची विश्वासार्हता निःसंशयच असायला हवी. काहीजण निसर्गतः नैतिक असतात. काही अनुभवातून नैतिकता अंगी बाणवतात, नैतिकता काहींवर लादली जाते तर काही स्वतःलाच नैतिकतेवर लादतात. यातल्या दुसऱ्या प्रकारात अण्णांना जागा देता येते. बाबांची जागा मात्र कायमस्वरूपी चौथ्या प्रकारातच मोडणारी आहे. लोकपालाच्या नेमणुकीची मागणी मान्य करीत दुबळ्या झालेल्या सरकारला कोंडीत पकडण्याचा संधीसाधूपणा बाजूला ठेवला, तरी त्याच्याच म्हणण्याप्रमाणे हजार कोटी रुपयांची पूंजी तथाकथित भ्रष्टाचाराच्या लढाईविरोधात बाजूला ठेवणारा एक प्रतिगामी उपटसुंभ नैतिकतेचा झगा लेवून कसा उभा राहू शकतो? आपले लोक अगदीच भोळसट आहेत आणि भगव्या रंगाचा भुलावा कधी चुकलाच नाही. बाळ ठाकरे हे अजून एक उदाहरण आणि भगव्या रंगाने साक्षात्कारापेक्षा दडविण्याचेच काम जास्त केले आहे हा जुना अनुभव आहे.

**कोणताही अध्यात्मिक गुरू लोकशाहीवादी असल्याचे माहीत नाही. अध्यात्मिकतेचा प्रांत फारतर अराजकतावादी असतो आणि अध्यात्मिक गुरू मात्र त्यांच्या गणांची मान्यता पावलेले हुकूमशहाच असतात. अशा लोकांना त्यांच्या गुरूंचे पिसाट लोक म्हणणेच अधिक योग्य ठरेल. नागरी समाजाचे पाईक नव्हे!**

याशिवाय कोणताही अध्यात्मिक गुरू लोकशाहीवादी असल्याचे माहीत नाही. अध्यात्मिकतेचा प्रांत फारतर अराजकतावादी असतो आणि अध्यात्मिक गुरू मात्र त्यांच्या गणांची मान्यता पावलेले हुकूमशहाच असतात. अशा लोकांना त्यांच्या गुरूंचे पिसाट लोक म्हणणेच अधिक योग्य ठरेल. नागरी समाजाचे पाईक नव्हे! आपली लोकसंख्या आणि आनपला नमुनेदारपणा पाहता कोणीही बुवा, बाबा किंवा महंत काही हजार लोकांचा गोतावळा देशात आणि काहीवेळा देशाबाहेरही गोळा करू शकतो.

भ्रष्टाचारविरोधी लढाईचा हा दैवदुर्विलास आहे. अगदी निर्दोषपणे अधार्मिक, लोकशाहीवादी आणि स्वच्छ सार्वजनिक जीवनाचा लेखा असणाऱ्या लोकांकडूनच अशा लढ्याची सुरुवात आणि नेतृत्व होण्याची आवश्यकता आहे. अण्णांसारख्या केवळ सद्हेतू असणे किंवा बाबांसारखी भक्तांची, पैशाची (बळाचीही?) सत्ता असणे पुरेसे नाही. व्यवस्था कशी निर्माण होते याची जाणकारी बाळगून, अगदी बारकाईने व्यवस्थेची छाननी करून, व्यवस्थेतील कमतरता आणि पळवाटा दूर करण्यासाठी अगदी निश्चित सूचना करणाऱ्यांकडूनच व्यवस्थेचा अपूरेपणा दूर होऊ शकतो. अगदी पूर्ण आदराने सांगतो अण्णा म्हणजे गांधी नव्हेत!

गांधी कायदेमंडळात होते, वर्णभेदासारख्या अमानुष व्यवस्थेविरुद्ध त्यांनी लढा दिला. नेमका कुठे आणि कसा घाव घालायचा हे त्यांना माहीत होते. फाळणीसकटचे स्वातंत्र्य मिळवायला त्यांनासुद्धा तीन दशके लागली. आधुनिक नागरी समाज कसा चालवावा याची काहिशीच किंवा अगदीच काहीही कल्पना गांधींना नव्हती. अण्णांच्या मागे राहिलोत, तर आपण एका नीरस गांधीवादी समाजात पोहोचतो. जिथे कधीतरीच काही घडामोड होऊ शकते आणि बाबा तर आपल्याला मध्ययुगातच घेऊन जातील- रोगापेक्षा उपचारच घातक ठरण्याची ही उदाहरणे आहेत.

अगदी स्पष्टपणे सांगायचं म्हणजे, हा चेंडू आपल्या बाजूला आहे. आपण बुद्धिजीवी लोकांनीच हे दुर्दैव आपल्यावर ओढवून घेतले आहे. जाणकार, माहीतगार, विचारवंत, संशोधक, माध्यमवाले, लेखक, कलावंत या आपणा सर्वांना, स्वातंत्र्योत्तर काळात आपण टाळलेलं काम अंगीकृत करावं लागेल. 'आपण आपले काम नीट केले की झाले' हा आपला स्वतःचा फाजील लाडच होता. निवडणुकांच्या राजकारणात आपल्याला अगदी थोडीच किंवा अजिबात संधी नाही हे लक्षात येताच आपण अगदी एकमताने विस्मृतीच्या गर्तेत फुरंगटून राहिलोत आणि देश चालवणे अशांवर सोपवले ज्यांना आज आपण सुकाणूधारक म्हणून पाहातोय. अगदी वाच्यार्थाने पाहिल्यास आपली व्यवस्था अगदीच वाईट नाही, हे बहुधा आपल्यापैकी काहीजणांना माहीत आहे. भ्रष्टाचाराला आळा घालणारे सर्व कायदे आहेत; पण ते कधी बाजूला टाकले जातात, वाकवले जातात, दुर्लक्षित केले जातात आणि हेही पुरेसे नाही म्हणून अधिकार पदस्थांकडून उद्दामपणे उल्लंघिले जातात. अधिकारपदाचा कार्यकाळ जितका कमी उल्लंघने तितकीच जास्त. आपल्या कार्यक्षेत्रातील व्यवस्थेच्या अपयशाचा अभ्यास करणाऱ्या लोकांचा राष्ट्रीय पातळीवरचा गट/गटांचं जाळं आपल्याला हवं आहे. विविध स्तरावरील आवश्यक उपचारांचा सारांश तयार करून त्यांचा प्राधान्यक्रम ठरवून आणि एका छोट्या निश्चित उद्दिष्टांसह सरकारला सामोरे जाणे आवश्यक आहे. बिचकून, विफल होऊन आणि फुरंगटून जर आपण आपापल्या छोट्या जगात माघार घेणार असून तर आपण केवळ आपल्या लोकशाही नागरिकत्वाच्या कर्तव्याला कमी पडतोय असे नसून आपण आपलीच कबर/कबरी खणत असू.

कोणी सामोरं येतंय?

**मूळ इंग्रजी लेख : विनय हर्डीकर**
**मराठी अनुवाद : शशांक जेवळीकर**

■■

**मधोमध**

# सरकारशाही राज्यव्यवस्था



**दत्ता जोशी**
media.care.abd@gmail.com

**- १ -**

मुंबईत मिड डे या दैनिकाचे पत्रकार ज्योतिर्मय डे यांची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या प्रकरणी राज्यातील सत्ताधीशांची विधाने ऐकून छान करमणूक होते आहे. राज्याचे बोलघेवडे गृहमंत्री आबा पाटील यांनी नेहेमीप्रमाणे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याची भाषा केली. मुख्यमंत्र्यांनीही गुन्हेगारांना पकडून शिक्षा देण्याची भाषा केली. पण या इच्छाशक्तीचे प्रतिबिंब प्रत्यक्ष कृतीत कुठेच दिसले नाही. पत्रकारांच्या संरक्षणासाठी खास कायदा करण्याची मागणी पत्रकारांच्या संघटनांनी केली आहे. त्यासाठी गावोगाव मोर्चे काढण्यात आले. मुंबईत साखळी उपोषणाचा इशारा देण्यात आला. पत्रकारांच्या मागण्यांसंदर्भात सध्या तरी मुख्यमंत्र्यांनी संयत पण ठाम भूमिका घेत बहुसंख्य मागण्या नाकारल्या असल्या तरी ज्य पद्धतीने 'लवासा' प्रकरणी त्यांनी शीर्षासन केले, त्याची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही, याची खात्री नाही.

**- २ -**

दिल्लीत जंतरमंतरवर अण्णा हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केंद्र सरकारला कोंडीत पकडून पुरते नमोहरम केले आणि सरकारच्या मांडीला मांडी लावून बसत 'लोकपाल'चा मसुदा तयार करण्यासाठी संयुक्त समिती स्थापन करण्यास भाग पाडले. पुरत्या बावचळलेल्या केंद्र सरकारनेही फारसा विचार न करता निर्णय घेऊन टाकले. समिती स्थापन झाली, पण कामकाजाच्या दृष्टीने प्रगती शून्य. आता पुन्हा एकदा १६ ऑगस्टपासून उपोषणाचे इशारे देण्यात येत आहेत.

**- ३ -**


रामलीला मैदानावर झालेल्या रणकंदनाने बाबा रामदेव यांनी साऱ्या देशाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून शहाणपण शिकलेल्या सरकारने बाबांचे उपोषणच होऊ नये या साठी प्रयत्न केले. सर्व प्रयत्नांनंतरही उपोषण पुढे सुरू आहे हे पाहून बिथरलेल्या सरकारने लोकशाही सभ्यता आणि संस्कतीच्या सर्व मर्यादांना हरताळ फासत हे आंदोलन उधळून लावले. बंदिस्त जागेत अश्रुधुराचा वापर करण्याचा पाशवी प्रयोग स्वातंत्र्योत्तर भारतात प्रथमच करण्यात आला. सर्वच दृष्टीकोनातून असमर्थनीय ठरणाऱ्या या कारवाईने सरकारचे पुरते हसे झाले.

......

हे सारे काय चालू आहे? लोकशाही पद्धतीने सत्तेवर आलेल्या सरकारलाच आरोपीच्या कोठडीत उभे राहण्याची वेळ का येते आहे? सरकार केंद्रातील आहे की राज्यातील हा प्रश्नच बाजूला ठेवला, तर एक चित्र सार्वत्रिकपणे स्पष्ट होते आहे, ते हे की सरकार नावाची यंत्रणा एकतर अस्तित्वात नाही किंवा असेलच तर तिच्यात प्राणतत्व उरलेले नाही. ती एक निर्जिव यंत्रणा झालेली आहे. हे का झाले, कसे झाले याच्या कारणमीमांसेत मला जावयाचे नाही. मला एकच बाब खटकते आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश ठरलेल्या भारतात लोकशाहीची पुरती वासलात लागली आहे. लोकशाहीने ज्यांना शासन चालविण्याचे हक्क दिले, ते निष्क्रीय आहेत. त्यांच्यात इच्छाशक्तीचा अभाव आहे. लोकशाहीच्या कक्षेत कुठेही न बसणारे दबावगट या सरकारवर नियंत्रण आणू पाहत आहेत. त्यांना नियंत्रित किंवा दिग्भ्रमित करीत आहेत. सरकार म्हणून अस्तित्वात असलेली यंत्रणा या सर्व बाबतीत उदासीन दिसते आहे आणि ज्यांचे सरकार आहे त्या पक्षांनी पोसलेली तोंडाळ मंडळी रोज नवनव्या आक्षेपार्ह विधानांनी लोकशाही व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगत आहेत.

बाबा रामदेव यांनी केलेल्या प्रत्येक मागणीमागे त्यांची तळमळ आहे, हे कोणीही नाकारणार नाही. पण हे आंदोलन पुकारताना, पुढे नेताना आणि संपवताना त्यांना ज्या कोलांटउड्या माराव्या लागल्या त्यामुळे ते देशभरात थट्टेचा विषय ठरले. एका अत्यंत संवेदनशील व देशहिताच्या दृष्टीने मौल्यवान असणाऱ्या विषयाचा त्यांच्या या अपरिपक्क कृतींमुळे चोथा झाला. सत्याग्रहाचे नाव घेणे सोपे आहे पण तो पेलण्याची ताकद बाबांमध्ये नव्हती हे या नऊ-दहा दिवसांच्या आंदोलनात स्पष्ट झाले. मागची दोन - अडिच वर्षे त्यांनी आपल्याभोवती निर्माण केलेले वलय या दहा दिवसांत लुप्त झाले. सरकार मात्र अध्यरात्रीच्या कारवाईमुळे लालूप्रसाद यादव वगळता इतर सर्व पक्षांच्या टीकेचे धनी बनले. हे आंदोलन हाताळताना सरकार निःष्प्रभ ठरले.

मात्र, सरकारच्या अकर्मण्यतेवर टीका करीत असतानाच दुसरा एक पैलू अचानक लकाकतो आणि विचारांची सारी दिशाच बदलून जाते. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला अभूतपूर्व आणि अनपेक्षित पाठिंबा



**अण्णा-बाबांचे आंदोलन संपविल्यानंतर त्यांना बदनाम करण्याची मोहिम चालविणारी उदाहरणे पाहताना 'सरकार काहीही करत नाही' हा मुद्दा आपोआपच संपतो. 'सरकार त्यांना हवे आहे तेच करते' हे अंतिम सत्य आहे. मग ते सरकार कोणतेही असो - कोणाचेही असो. राष्ट्रकूल स्पर्धा, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा अशा अनेक प्रकरणात केंद्र सरकार शांत राहिले. रेड्डी बंधूंच्या गैरप्रकारात कर्नाटकातील भाजप सरकार गप्प राहिले. अशा प्रकरणांत जे काही धोरण ठरते, ते दूरगामी असते. अण्णा-बाबांच्या आंदोलनातील हवा काढून घेण्यासाठी सरकार जाणीवपूर्वक प्रयत्नाला लागले आहे. भ्रष्टाचार - काळ्या पैशावरून इतरत्र लक्ष वेधण्यासाठी बाकीचे मुद्दे उकरून काढण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाच्या मनाचा थांग मात्र नीटसा लागत नाही.**

मिळू लागल्यानंतर सरकारची हबेलहंडी उडाली. त्या क्षणी हे आंदोलन शमणे शक्य नव्हते. पण 'ठंडा करके खावो' ही सरकारची नीती असते. 'शकुनीमामा' अशी प्रतिमा असणारे अतिशय चाणाक्ष वकील कपिल सिब्बल यांच्याकडे सरकारने आपले 'वकीलपत्र' दिल्याचे दिसल्यानंतरच मनात शंकेची पाल चुकचुकण्यास सुरवात झाली होती. लाखो कोटींच्या 'टूजी स्पेक्ट्रम' घोटाळ्याचे पुराव्यांनिशी आरोप होत असताना आणि आज केंद्रातील अनेक मंत्री गजाआड गेलेले दिसत असताना याच सिब्बल यांनी 'हा घोटाळाच झाला नाही' असे छातीठोक विधान केले होते ! खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करण्याच्या व्यवसायातील सारा अनुभव ते सक्रीय राजकारणात पणाला लावतात. त्याच वेळी आपल्या कौशल्यपूर्ण चाणक्यनीतीने विरोधकांवर मात करण्याचे मार्गही ते शोधत असतात.

अण्णा हजारे यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात ते प्रमुख होते. सर्वात आधी त्यांनी या आंदोलनात व आंदोलनातील नेत्यांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. ते शक्य होत नाही हे पाहून सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या आश्वासनांना 'आश्वासनाचेच' रूप राहील, या विषयाची अधिसूचना निघणार नाही या साठी ते आग्रही राहिले. अधिसूचनेऐवजी कायदा मंत्रालयाचे पत्र स्वीकारून आंदोलन थांबविणे, हाच खरे तर या आंदोलनाचा 'टर्निंग पॉइंट' ठरला. या मुळे सरकारची या विषयातील जबाबदारीच संपली. राहिला तो फक्त उपचार. जून-जुलैपर्यंत काही औपचारिक बैठका घेणे आणि नंतर 'समन्वयाने मसूदा ठरणे शक्यच नाही' असा कांगावा करीत आंदोलन विसर्जित करणे ही त्यांची कूटनीती होती. प्रारंभी त्यांनी कर्नाटकचे लोकपाल श्री. हेगडे आणि शांतीभूषण-प्रशांतभूषण यांच्यावर चिखलफेक करून त्यांची विश्वासार्हता कमी करण्याचा प्रयत्न केला. अण्णा हजारे यांच्या साधेपणावर खरपूस टीका केली. 'सिव्हील सोसायटी'चे पाच सदस्य फारसे गंभीर नाहीत हे दाखवून देण्याची एकही संधी त्यांनी घालविली नाही. अण्णा हजारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा या विषयातील नवखेपणा आणि साधेपणा त्यांच्या अंगलट आला. सरकार कशा पद्धतीने काम करते आणि त्यातही सिब्बल यांच्यासारखा 'शकुनीमामा' असेल तर काय काळजी घेतली पाहिजे, हे बहुदा त्यांना कळले नाही. परिणामी येत्या १६ ऑगस्टपासून पुन्हा एकदा उपोषण करण्याचा निर्णय आता अण्णांनी घोषित केला आहे.

**अण्णा-बाबांच्या आंदोलनातील हवा काढून घेण्यासाठी सरकार जाणीवपूर्वक प्रयत्नाला लागले आहे. भ्रष्टाचार - काळ्या पैशावरून इतरत्र लक्ष वेधण्यासाठी बाकीचे मुद्दे उकरून काढण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाच्या मनाचा थांग मात्र नीटसा लागत नाही. तशा अर्थाने सार्वत्रिक निवडणुकांना अजूनही दोन-अडीच वर्षे बाकी आहेत. या काळात नवे घोटाळे उघडकीस येतील की सध्याचे घोटाळे विस्मरणात जातील, या बद्दल आत्ताच काही सांगता येणार नाही, हेच खरे.**

बाबा रामदेव यांच्या आंदोलनाबाबतही असेच काहीसे झाले. वास्तविक, जेव्हा सरकारचे चार प्रमुख मंत्री त्यांना 'रिसीव्ह' करण्यासाठी विमानतळापर्यंत धाव घेत होते, तेव्हाच त्यांची मनोभूमिका स्पष्ट झाली होती. त्यामध्ये प्रणव मुखर्जी यांच्या सहभागामुळे सरकारच्या सकारात्मक इच्छाशक्तीची जाणीव होत होती त्याच वेळी कपिल सिब्बल यांच्या पुढाकाराने, ही सरकारची नवी चाल असावी अशी शंकाही येत होती. अखेर तसेच घडले. आंदोलन सुरू होण्याआधीच संपविण्याचा सरकारचा प्रयत्न बाबांच्या अतिउत्साहामुळे फसला. त्याच वेळी अण्णा हजारे आणि बाबा रामदेव यांच्यात फूट पाडण्याचा सरकारचा प्रयत्न फसला. पाशवी कारवाईने आंदोलन उधळण्याच्या सरकारच्या कृतीमुळे अण्णा-बाबा पुन्हा एकदा एकत्र आले. या पार्श्वभूमीवर सरकारने या दोघांकडेही त्यानंतर लक्ष दिले नाही. उलट ही दोन्ही आंदोलने बदनाम कशी होतील, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. बाबांच्या आंदोलनामागे रा. स्व. संघ होता, असा जोरदार प्रचार सरकारकडून झाला. मात्र, भ्रष्टाचाराच्या निर्मुलनासाठी, काळा पैसा रोखण्यासाठी संघानेही प्रयत्न करण्यास काय हरकरत आहे, या मुद्द्यावर सकारात्मक चर्चा सुरू होताच हा विषय सरकारने बाजूला सारला.

# पत्रकारांना संरक्षण कशासाठी?

पत्रकारांच्या विषयात मात्र माझे मत वेगळे आहे. पत्रकारांना सरकारने संरक्षण द्यावे, ही त्यांची एक प्रमुख मागणी आहे. म्हणजे सरकारने काय करावे? प्रत्येक पत्रकाराच्या घरासमोर एक पोलिस बसवावा, की घरातून निघून घरात परतेपर्यंत प्रत्येक पत्रकाराच्या मागे एक पोलिस फिरवावा? बरे, हे पोलिस शस्त्रधारी असावा की निःशस्त्र? तो कॉन्स्टेबल असावा, हवालदार दर्जाचा असावा, 'पीएसआय' की 'पीआय'? हा काय वेडगळपणा आहे? आणि पत्रकारांच्या संरक्षणासाठी कडक कायदा करावा याचा अर्थ काय? पत्रकारांवरील हल्ला अजामीनपात्र गुन्हा ठरविला पाहिजे, अशी यांची एक मागणी आहे. 'टाडा' आणि 'पोटा'मधील तरतुदी कोणत्या होत्या? तेथेही पकडलेले आरोपी अजामीनपात्रच होते. असा लोकशाहीविरोधी कायदा पुन्हा आणायचा? पत्रकार हे सामान्य नागरिकांपेक्षा मोठे आहेत का? सामान्य नागरिकांवर हल्ला झाला, त्याला लुटले, अबलेवर बलात्कार झाला तर एक कायदा आणि पत्रकारावर हल्ला झाला तर वेगळा कायदा? आणि एवढा कडक कायदा पत्रकारांच्या संरक्षणासाठी करायचा ठरलाच, तर पत्रकारांनी केलेल्या गुन्ह्यांसाठी वेगळ्या कायद्याची तरतूद करावयास हवी ना? पत्रकारांनी केलेले गुन्हेही अजामीनपात्र ठरवावेत. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराला इतरांच्या तुलनेत दुप्पट शिक्षा व्हावी.



डे यांची हत्या दुर्दैवीच आहे

राजकीय नेत्यांना दोष देत असतानाच पत्रकारांच्या वर्तनाकडेही तटस्थपणे पाहण्याची गरज आहे. अनेकदा तर नेते अधिक भ्रष्ट की पत्रकार, असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे. हप्ते गोळा करण्याची पत्रकारांची 'रेंज' पोलिसांपेक्षाही मोठी आहे. पोलिस फक्त गुन्हेगारांकडून किंवा कायद्याच्या कचाट्यात अडकलेल्या सावजाकडून हप्ते उकळत असतील. पत्रकारांच्या यादीत तर पोलिस स्टेशन, जिल्हा परिषदा, नगरपालिका- महानगरपालिका, नगरसेवक- आमदार-खासदार वा इतर लोकप्रतिनिधी यांच्यापासून मटकाकिंग, हातभट्टीवाले, वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असतो. 'देतो की छापू?' एवढ्या एकाच प्रश्नावर होणारी कोट्यवधींची उलाढाल थक्क करणारी आहे. लोकशाहीचा हा चौथा खांबही आता पुरता सडला-किडला आहे. दिल्लीतील बरखा दत्तपासून गल्लीतील लुंग्यासुंग्या पत्रकारापर्यंत असंख्य उपटसुंभांनी आपापली घरे भरण्याचे काम मोठ्या उत्साहाने केले आहे. अर्थात याचा अर्थ प्रत्येक पत्रकार भ्रष्ट असतो असा नाही. पत्रकारांमध्ये दोन प्रकार असतात. 'टेबलवरील' आणि 'फिल्डवरील'. दैनिकाच्या अथवाच्या न्यूज चॅनेलच्या कार्यालयात बसून कारकुनी पद्धतीची कामे करणाऱ्या पत्रकारांना टेबलवरील पत्रकार म्हणतात. यांच्यामध्ये कमाईला खूप कमी संधी असते. या उलट 'फिल्ड'वरील पत्रकारांना वरकमाईच्या संधी भरपूर असतात. या संधी नाकारणाऱ्या पत्रकारांचे प्रमाणही लक्षणीय आहे; पण आताशा नव्याने पत्रकारितेत येणाऱ्यांचा भर प्रामुख्याने 'फिल्ड'वर उतरण्याचा असतो. 'टेबल'वर काम करण्याची इच्छा असणाऱ्यांचे प्रमाण नगण्य आहे.

दुसरीकडे लोकपाल विधेयकाच्या बैठकींमध्ये सरकारतर्फे एकतर्फी भूमिका लावून धरत तो विषय अधांतरी ठेवण्यात आला आणि वरून 'सिव्हिल सोसायटी म्हणजे जनता नव्हे' अशी विधानेही सिब्बल यांनी केली. ती जनता नव्हे, तर त्यांच्याशी चर्चा का केली, या प्रश्नावर मात्र त्यांच्याकडे उत्तर नसते.

ही उदाहरणे पाहताना 'सरकार काहीही करत नाही' हा मुद्दा आपोआपच संपतो. 'सरकार त्यांना हवे आहे तेच करते' हे अंतिम सत्य आहे. मग ते सरकार कोणतेही असो - कोणाचेही असो. राष्ट्रकूल स्पर्धा, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा अशा अनेक प्रकरणात केंद्र सरकार शांत राहिले. रेड्डी बंधूंच्या गैरप्रकारात कर्नाटकातील भाजप सरकार गप्प राहिले. अशा प्रकरणांत जे काही धोरण ठरते, ते दूरगामी असते. अण्णा-बाबांच्या आंदोलनातील हवा काढून घेण्यासाठी सरकार जाणीवपूर्वक प्रयत्नाला लागले आहे. भ्रष्टाचार - काळ्या पैशावरून इतरत्र लक्ष वेधण्यासाठी बाकीचे मुद्दे उकरून काढण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाच्या मनाचा थांग मात्र नीटसा लागत नाही. तशा अर्थाने सार्वत्रिक निवडणुकांना अजूनही दोन-अडीच वर्षे बाकी आहेत. या काळात नवे घोटाळे उघडकीस येतील की सध्याचे घोटाळे विस्मरणात जातील, या बद्दल आत्ताच काही सांगता येणार नाही, हेच खरे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात एका कर्तबगार पत्रकाराची आहुती पडली. मुंबईतील मिड डे या वृत्तपत्राचे 'क्राईम रिपोर्टर' ज्योतिर्मय डे यांची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या प्रकरणी पकडण्यात आलेल्या आरोपींचा या हत्येत खरेच संबंध आहे का, या बद्दलच मुदलात शंका घेतली जात आहे. आपल्यावरील टीकेचा भडिमार टाळण्यासाठी सरकार असे काही डमी आरोपी उभे करीत असते. कालांतराने लोक अशी प्रकरणे विसरतात आणि त्यानंतर हे आरोपीही पुराव्यांअभावी निर्दोष सुटून जातात! मूळ मुद्दा पुन्हा एकदा मागे पडतो. या पार्श्वभूमीवर पत्रकारांना संरक्षण देण्याची मागणी मोठ्या आग्रहीपणाने पुढे येत आहे.

अशा पार्श्वभूमीवर स्वतंत्र कायदे आणि संरक्षणव्यवस्था उभी करण्यात शक्ती वाया घालविण्यापेक्षा सरकारने अशा मागण्यांना केराची टोपली दाखवावी हेच उत्तम. ज्योतीर्मय डे यांची हत्या निषेधार्ह आहे, त्याच बरोबर हत्येआधी त्यांनी मागणी केलेली असताना पोलिसांनी संरक्षण नाकारले असेल तर ते ही निषेधार्ह आहे. अशा पोलिसांविरुद्ध कठोर कारवाई व्हावी आणि दुसऱ्या 'डे'चे बलिदान होऊ नये यासाठी आवश्यक ती उपाययोजना सरकारने करावी. हाच यावरील उपाय होऊ शकतो. नाहीतर (हप्तेबंद) पत्रकारांच्या 'हैदोसा'लाच सरकारने कायदेशीर संरक्षण दिल्यासारखे होईल.

**दत्ता जोशी**

मो. ९२२५३०९०१०


■■

# राजकीय बुवाबाजीवर आत्मघाती हल्ला

**आरोग्य व्यवस्था उपलब्ध नसली किंवा कोलमडली तर जसे रोग बरे करण्यासाठी मंतरलेले पाणी किंवा धागा देणाऱ्या बाबांचे पेव फुटते तसेच सरकार आणि विरोधी पक्ष यांच्या आधारावर उभी असलेली राजकीय व्यवस्था निष्क्रिय व निष्प्रभ झाली, की बाबा आणि अण्णांसारख्या बुवांचा उदय होतो. पर्याय देण्याची भाषा करणाऱ्या संस्था, संघटना जेव्हा अवैज्ञानिक, अतार्किक व असंगत लढ्यात स्वत:चा शक्तीपात करून वैचारीक दिवाळखोर बनतात तेव्हा बाबा, अण्णांसारख्या बुवांचा पदर पकडणे लोकांना सुरक्षित वाटू लागते. बुडत्याला काडीचा आधार मिळण्यासारखा हा प्रकार आहे; पण हा काही संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग नव्हे.**

दिल्लीच्या रामलीला मैदानावर केंद्र सरकारच्या आदेशावरून पोलिसांनी बाबा रामदेव यांचा 'सत्याग्रह' चिरडून टाकण्यासाठी केलेली कारवाई पूर्णत: अनावश्यक व हडेलहप्पीची होती याबाबत ज्यांचे डोके ठिकाणावर आहे त्यांचे दुमत होणार नाही. बाबा रामदेव आणि त्यांच्या आंदोलनाला विरोध असणारा व्यक्तीही लोकशाहीला कलंकित करणारी घटना असेच या घटनेचे वर्णन करील. बाबांच्या सत्याग्रहाला, प्रत्येक धुण्याच्या पावडरला सर्फ किंवा निरमा म्हणतात अथवा प्रत्येक बोटलबंद पाण्याला बिसलरी म्हणतात त्या अर्थाने प्रत्येक आंदोलनाला सत्याग्रह म्हणण्याचा प्रघात असल्यानेच येथे बाबांच्या आंदोलनाला सत्याग्रह म्हणून संबोधित केले आहे. सैल शब्द वापरण्याचा ठेका फक्त काँग्रेस सरचिटणीस दिग्विजयसिंह यांनीच घेतला आहे असे समजण्याचे कारण नाही. रामलीला मैदानावर सरकारच्या हुकुमावरून पोलिसांनी ज्या लीला केल्या त्या अत्यंत निंदनीय असल्या तरी त्यावर प्रतिक्रिया देताना सर्वांच्याच जीभा सैल झाल्याचे सर्वांनीच बघितले आहे. भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करणाऱ्यांची वाणी भ्रष्टता यानिमित्ताने दिसून आली. बाबा रामदेवांनी तर पोलिसांनी गोळीबार केल्याचा आरोप केला! अण्णा हजारेंनी याची री ओढत या प्रसंगाची तुलना जालियनवाला बाग कांडाशी केली.

भाजपने मध्यरात्रीच्या या कारवाईची तुलना आणीबाणीशी केली. जालियनवाला बाग किंवा आणीबाणी या दोन्ही घटना अशा तुलनेने हलक्या वाटू लागतात याचे भान कोणी ठेवले नाही; पण घडलेला प्रसंग पाहता भावनावेगात असे बोलणे समजू शकते. मात्र सरकारने कोरडेपणाने जी कोडगी प्रतिक्रिया दिली ती जर लहान मुलांनी पाहिली, ऐकली असेल तर त्यांना खोटे कसे बोलावे याचा पाठ मिळाला असेल!



सुधाकर जाधव

### कारवाईचे असमर्थनीय समर्थन

बाबांच्या जिवाला धोका असल्याने व बाबांनी योग शिबिराची परवानगी घेऊन मोठा जमाव जमवून आंदोलन सुरू केल्याने कारवाई केल्याचे आधी सांगण्यात आले. पहिल्या कारणासाठी कोणताच पुरावा सरकारकडे नसल्याने ते कारण खोटे असल्याचे स्पष्ट झाले; पण दुसऱ्या कारणात पूर्ण तथ्य असले तरी ती बाब पोलिसांना व सरकारला आधीपासून माहिती होती. तरीही पोलिस व सरकारने बाबांच्या दिल्ली आगमनप्रसंगी पायघड्या घातल्या आणि त्या पायघड्या थेट रामलीला मैदानापर्यंत घालण्यात आल्या होत्या. बाबाला फुगवून आण्णांचे खच्चीकरण करण्याचा यामागे डाव होता हे आता लपून राहिले नाही. जोपर्यंत सरकारला बाबांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत होता तोपर्यंत पोलिसांनी व सरकारने कायद्याचे उल्लंघन होऊ दिले आणि बाबांनी ठेंगा दाखविताच नियम,

कायदे आठवले!

कारवाईसाठी पुढे केलेल्या या कारणावर सरकारचाच विश्वास नसल्याने आता वेगळे कारण पुढे केले जात आहे आणि ते जास्त आक्षेपार्ह आहे. रामदेव बाबांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असल्याचा साक्षात्कार सरकारला झाला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रतिनिधी सभेने मार्च महिन्यात झालेल्या बैठकीत भ्रष्टाचारविरोधी आघाडी स्थापन करण्याचा निर्णय घेऊन या आघाडीच्या संरक्षकपदी बाबा रामदेव यांची नियुक्ती केल्याचा दाखला आता गृहमंत्री चिदंबरम देऊ लागले आहेत. आपण असे गृहीत धरू की सरकार म्हणते त्यात १०० टक्के सत्य आहे. बाबांचे आंदोलन आरएसएसच्या पाठिंब्याने उभे राहिले आहे. नव्हे हे संघाचेच आंदोलन आहे असे मानून चालू; पण संघाने भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करू नये असा काही नियम आहे का? संघाने भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करणे घटनाविरोधी आहे का? संघाचा धर्मवाद राष्ट्रीय एकात्मतेसाठी घातक आहे यात शंकाच नाही.आणि बाबा रामदेव यांच्या व्यासपीठावरून जर धार्मिक द्वेष फैलावण्याचा थोडा जरी प्रयत्न झाला असेल तर या पेक्षाही अधिक कठोर कारवाई करणे नक्कीच समर्थनीय ठरले असते; पण असे काही झाल्याचा गृहमंत्री आरोप करीत नाहीत. त्यांचा आरोप फक्त आरएसएसचा या आंदोलनात हात असल्याचा आहे. बाबांच्या आंदोलनामागे पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय असल्याच्या थाटात गृहमंत्री बोलत आहेत! देशातील कोणत्याही नागरिकाइतकाच संघाला किंवा संघस्वयंसेवकाला आंदोलनाचा अधिकार आहे आणि त्या अधिकाराचे हनन घटनाविरोधी आहे. वस्तुतः धार्मिक कुचाळक्या व धर्मकलह करण्याऐवजी संघ सामाजिक प्रश्न हाती घेऊन लढत असेल तर त्याचे स्वागत करायला हवे. अर्थात संघाची सामाजिक, धर्मविषयक किंवा इतिहासातील मेलेले मुडदे उकरून काढण्याची प्रवृत्ती कोणाला आक्षेपार्ह वाटत असेल तर ते चुकीचे नाही; पण मग हे सगळे माहीत असताना संघाशी संबंधित व्यक्तीसाठी केंद्र सरकारातील सर्वांत ज्येष्ठ मंत्र्याने पायघड्या का टाकल्या हा प्रश्न शिल्लक राहतोच. एवढेच नाही तर ज्या पक्षाचे सरकार आहे त्या काँग्रेस पक्षाच्या अधिकृत प्रवक्त्याने बाबांसारखेच

**बाबांचे आंदोलन आरएसएसच्या पाठिंब्याने उभे राहिले आहे. नव्हे हे संघाचेच आंदोलन आहे असे मानून चालू; पण संघाने भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करू नये असा काही नियम आहे का? संघाने भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करणे घटनाविरोधी आहे का? संघाचा धर्मवाद राष्ट्रीय एकात्मतेसाठी घातक आहे यात शंकाच नाही.आणि बाबा रामदेव यांच्या व्यासपीठावरून जर धार्मिक द्वेष फैलावण्याचा थोडा जरी प्रयत्न झाला असेल तर या पेक्षाही अधिक कठोर कारवाई करणे नक्कीच समर्थनीय ठरले असते; पण असे काही झाल्याचा गृहमंत्री आरोप करीत नाहीत. त्यांचा आरोप फक्त आरएसएसचा या आंदोलनात हात असल्याचा आहे.**

अण्णा हजारेदेखील संघाच्या हातचे बाहुले असल्याचा आरोप केला आहे. तरीही या सरकारने अण्णा हजारेंना उपोषण करू दिले, त्यांच्या पुढे मान झुकवून त्यांच्या मागण्या मान्य केल्या. त्यांच्या मांडीला मांडी लावून लोकपाल बिलाचा मसुदा तयार करण्याचे काम सुरूच आहे. मग बाबाला एक न्याय आणि अण्णांना एक न्याय हे कसे? कारण अगदी स्पष्ट आहे. केंद्रातील मनमोहन सरकार पुरते गोंधळले आहे. सरकारमध्ये कोण निर्णय घेते, कसे निर्णय घेतल्या जातात हे कोणालाच माहीत नाही. आपले सरकार निष्प्रभ व निष्क्रिय असल्याची जाणीव झाल्याने प्रभाव दाखविण्यासाठी आंदोलकांवर सरकारने बडगा उगारला; पण या कृतीची सर्वत्र निंदा होऊन प्रकरण अंगलट आल्याने सरकारातील मंत्री व पक्ष प्रवक्ते या कारवाईसाठी सुचतील तितकी आणि सुचतील तशी कारणे देऊ लागले आहेत.

खरे तर या सरकारने दुसऱ्यांदा शपथ ग्रहण करून दोन वर्षे उलटून गेली तरी या सरकारचे अस्तित्व जाणवावे असे प्रसंगच फार कमी आहेत. दोन वर्षांत फक्त तीनदा सरकारने आपले अस्तित्व दाखवून दिले आणि तिन्ही वेळेस चढत्याक्रमाने अत्यंत चुकीच्या कारणासाठी सरकारने आपले अस्तित्व दाखवून दिले. पहिले निमित्त होते कांद्याचे व इतर शेतीमालाचे भाव पाडण्याचे, सरकारने आपले अस्तित्व दाखविण्यासाठी केंद्रीय सतर्कता आयुक्तपदी चुकीच्या व्यक्तीचे नाव रेटले. यातूनच लोकपालाचा भस्मासूर पुढे आला आणि सरकारने आपले अस्तित्व दाखविण्यासाठी तिसरे निमित्त निवडले बाबा रामदेव यांचे आंदोलन चिरडून टाकण्याचे!

**डाव उलटला!**

सरकारने या पद्धतीने आंदोलन चिरडून टाकावे अशी कोणतीही देशविघातक, समाजविघातक मागणी बाबा रामदेव यांच्या आंदोलनाने केली नव्हती. कायदा व सुव्यवस्थेला कोणत्याही प्रकारचे आव्हान उभे राहिले नसताना सरकारने घाईने केलेल्या आततायी कृतीने सुजाण नागरिक आणि राजकीय विश्लेषकांना अचंब्यात टाकले आहे.अनेक वर्षे चर्चेत असलेल्या मागण्याच बाबांनी पुढे रेटल्या होत्या. अर्थात मागण्या चर्चेत होत्या म्हणजे योग्य होत्या असे नाही. भारताबाहेर गेलेला काळा पैसा भारतात परत आला पाहिजे ही सर्वमान्य अशी प्रमुख मागणी बाबांनी पुढे केली होती.

ही मागणी लुभावणी असली तरी पूर्ण करणे सोपी नाही. या पैशांबाबत वस्तुस्थिती काय आहे हे सरकारी यंत्रणांनासुद्धा माहीत नाही, तिथे बाबांना याची माहिती असण्याचे कारण नाही; पण कोठून तरी कोणीतरी पुढे केलेला आकडा गृहीत धरून सोयीसाठी फुगवायचा हा प्रकार देशात सुरू आहे आणि तसे करण्यात बाबा आघाडीवर आहेत. अर्थात आकडा खरा नसला तरी भावना चांगली असल्याने याबाबत कोणी वाद घालत नाही इतकेच; पण सरकारचा बाबांवर ते चुकीचा आकडा पुढे करतात हाही आरोप नाही. तसा त्यांच्या कोणत्याच मागणीबाबत सरकारचा आक्षेप नव्हता. त्या मागण्यात लगेच होण्यासारखे काही नसल्याने आश्वासनावर सरकारला सुटका करून घेणे शक्य होते. जवळपास तसे झालेही होते.

बाबांनी स्वतःच ९० टक्के मागण्या मान्य झाल्याचे जाहीर करून टाकले होते. खरे तर सरकार आणि बाबा दोघांचे हेतू साध्य झाले होते. अण्णांनी उभ्या केलेल्या आंदोलनाने

ज्या मागण्या केल्या त्यापेक्षा मोठ्या मागण्या करून त्या 'पूर्ण' करून घेण्याचे श्रेय तर बाबांना मिळणार होतेच शिवाय अण्णांच्या आंदोलनाच्या वेळी बाबांना बाजुला टाकण्याचा प्रकार अण्णांच्या सहकाऱ्यांनी केला होता त्याचा बदला पूर्ण होणार होता.सरकारला कथित सिव्हिल सोसायटीला परस्पर शह देणारा मोहरा मिळणार होता. मात्र सरकार आणि बाबा या दोघांच्याही अपरिपक्वतेने दोघांचाही डाव उलटा पडला. दोघांचीही पूर्ण फजिती झाली. या दोघांनाही आत्मघाताचे डोहाळे लागले असावेत याची सरकार व बाबा यांच्या वर्तनावरून प्रचिती येते. खरे तर सरकारच्या कृतीने बाबांना मोठे होण्याची नामी संधी होती. सरकारने केलेल्या दडपशाहीचा सामना प्रसंगावधान राखून धीरोदात्तपणे व संयमाने केला असता तर बाबा जनतेचे हिरो झाले असते; पण बाबांनी पळपुटेपणा करून बेआबरू करून घेतली. उरलेली कसर बाबांनी हरिद्वारला गेल्यावर सरकारवर खुनाच्या इराद्यासारखे हास्यास्पद आरोप करून पूर्ण केली. पळपुटेपणाची झालेली घोडचुक लपविण्यासाठी बाबांनी आणखी चुका करून अडचणीत सापडलेल्या सरकारच्या सुटकेचा मार्ग प्रशस्त केला आहे. हजार युवकांची सशस्त्र सेना उभी करण्याची घोषणा करून बोलभांड बाबांनी सरकारी कृतीला वैधता प्रदान केली आहे. या निमित्ताने योगाने शरीर स्वास्थ्य ठीक राहत असले तरी संयम आणि समाजदारी प्राप्त होत नाही हे दस्तूरखुद्द योगगुरूंनी दाखवून दिले असे म्हटले तर ती अजिबात अतिशयोक्ती ठरणार नाही. दूसरी सिद्ध झालेली बाब जास्त महत्वाची आहे आणि ती सर्वसामान्यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. राजकीय आंदोलनासाठी राजकीय परिपक्वतेला कोणताच पर्याय नसतो. बाबांसारखे सन्याशी असणे किंवा अण्णांसारखे नि:संग असणे हा राजकीय परिपक्वतेला, सामाजिक-आर्थिक समाजदारीला पर्याय असू शकत नाही. समाजाने अण्णा-बाबांकडून तशी अपेक्षा ठेवली तर राजकीय पक्ष व सरकारांनी केला त्या पेक्षा मोठा भ्रमनिरास होऊ शकतो.

बाबाने ती झलक दाखवून दिली आहे आणि अण्णाही या बाबतीत बाबांच्या फार मागे नाहीत. अण्णा नैतिक अहंकाराने ग्रस्त असल्याने प्रश्न समजून घेण्याची व समजून देण्याची प्रक्रियाच बाधित झाली आहे. याची अपरिहार्य परिणिती आम्ही म्हणतो तसे करा नाहीतर मी उपोषणाला बसतो अशा धमक्या देण्यात होते. गांधी-जयप्रकाशांचे आंदोलन नैतिकतेच्या ताकदीवर उभे राहिले असा भ्रम समाजात विद्यमान आहे; पण तो चुकीचा आहे.राजकीय, सामाजिक व आर्थिक समजदारीची त्यांचे आंदोलन उभे राहण्यात निर्णायक भूमिका होती. नैतिकतेने त्यांना स्वत:ला लढण्याचे बळ दिले. शिवाय समाज स्वीकृतीसाठी नैतिकता उपयोगी पडली. नैतिकतेचा उपयोग या पलीकडे नाही हे समजून घेण्याची गरज आहे. बाबा आणि अण्णा यांच्याकडे कोणतीच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समजदारी नसल्याने निव्वळ नैतिक ताकदीवर प्रश्न सोडविण्याची भाषा करणे भंपकपणाचे आहे. बाबा आणि अण्णा यांच्या विचारात व व्यक्तित्वात भिन्नता असली तरी समजदारीच्या बाबतीत दोघे एकाच पातळीवर आहेत! याच कारणाने या दोघांच्या आंदोलनाचे वर्णन राजकीय बुवाबाजी यापेक्षा वेगळे करता येणार नाही. आरोग्य व्यवस्था उपलब्ध नसली किंवा कोलमडली तर जसे रोग बरे करण्यासाठी मंतरलेले पाणी किंवा धागा देणाऱ्या बाबांचे पेव फूटते तसेच सरकार आणि विरोधी पक्ष यांच्या आधारावर उभी असलेली राजकीय व्यवस्था निष्क्रिय व निष्प्रभ झाली की बाबा आणि अण्णांसारख्या बुवांचा उदय होतो. पर्याय देण्याची भाषा करणाऱ्या संस्था, संघटना जेव्हा अवैज्ञानिक, अतार्किक व असंगत लढ्यात स्वत:चा शक्तीपात करून वैचारीक दिवाळखोर बनतात तेव्हा बाबा, अण्णांसारख्या बुवांचा पदर पकडणे लोकांना सुरक्षित वाटू लागते. बुडत्याला काडीचा आधार मिळण्यासारखा हा प्रकार आहे; पण हा काही संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग नव्हे.

## राजकीय पर्यायाची गरज

बाबांचे आंदोलन चिरडण्यासाठी सरकारने ४ जूनच्या रात्री आत्मघातकी हल्ला केला असला तरी या सरकारला आत्मघाताचे डोहाळे आधीपासूनच लागून असल्याचे अण्णांचे आंदोलन ज्या पद्धतीने हाताळले त्यावरून दिसून आले होते. आज सिव्हिल सोसायटीला कायदा करण्याचा अधिकार न देण्याची व संसदीय लोकशाहीची बूज राखण्याची भाषा वापरणाऱ्या सरकारने अण्णांपुढे शेपुट घालून लोटांगण घातले होते. तेव्हा आत्मघातावर उतारू असलेल्या सरकारकडून अपेक्षा बाळगणेच व्यर्थ आहे. सरकारइतकाच प्रमुख विरोधी पक्ष असलेला भारतीय जनता पक्ष निष्क्रिय व निष्प्रभ असल्याने तो राजकीय पर्याय ठरू शकत नाही. बाबांच्या आंदोलनाच्या निमित्ताने राजघाटवर ज्या अपरिपक्वतेचे दर्शन या पक्षाने घडविले त्याला तोड नाही. काँग्रेस पक्ष ज्या हीनतेने बीजेपी नेत्यांच्या नाचगाण्याचा उल्लेख करतो तसा मी करणार नाही. नाच-गाणे यात वाईट काहीच नाही; पण एका अत्याचारी घटनेचा निषेध व्यक्त करताना जो आनंद भाजपा नेत्यांच्या चेहऱ्यावर विलसत होता ती बाब अशोभनीय होती. निरपराध लोकांवर झालेल्या पोलिसी अत्याचाराबद्दल चीड व्यक्त न होता या घटनेने सत्तेच्या जवळ पोचल्याचा आनंद व्यक्त होत असेल तर हा पक्ष कमालीचा असंवेदनशील व सत्तेसाठी हपापलेला आहे असेच म्हणावे लागेल. असा पक्ष पर्याय बनू शकत नाही. डाव्या पक्षांचा गेल्या निवडणुकीत सुंभ जळला तरी पीळ कायम असल्याने त्यांच्याकडून आशा करणे व्यर्थ आहे.

जातीयवादी पक्ष तर देशाला मध्ययुगात घेऊन जातील. असा पर्याय काय कामाचा? प्रसार माध्यमांनी क्लोनिंग करून जन्माला घातलेले गांधी हा काही गांधींना पर्याय होऊ शकत नाही. उरतो तो एकच पर्याय- देशातील तरुणांनी राजकीय प्रक्रियेत सामील होऊन देशाला नवा राजकीय पर्याय देण्याची.

असा पर्याय पक्षाचाच असेल असेही नाही. तो चळवळीचादेखील असू शकेल; पण त्यासाठी राजकीय प्रक्रियेत सामील होणे म्हणजे घाणीत लोळण्यासारखे आहे ही समजूत दूर करावी लागेल.

अण्णांसारखे नैतिकतेचे पूजारी अशी समजूत दृढ करण्यात धन्यता मानीत असल्याने तरुणांची समजूत दूर करणे कठीण होऊन बसले आहे. नव्या राजकीय पर्यायाला पर्याय नाही हे सत्य जेवढ्या लवकर आम्ही स्वीकारू तेवढ्या लवकर नव्या पर्यायाच्या उभारणीला प्रारंभ होईल.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# कुलगुरू साहेब आव्हान स्वीकारा... !

**पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे हजारो एकर जमीन आहे. सिंचनाची व्यवस्था आहे, तुम्हीच गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या संशोधनाची शिदोरी आहे. मग कृषी विद्यापीठाला अनुदानाची गरज का पडावी? विद्यापीठात काम करणाऱ्या तज्ज्ञांना शासनाकडून पगार घेण्याची गरज का भासावी? आता निव्वळ सल्ले देणे खूप झाले, या विद्यापीठाच्या हजारो एकरावर तुमच्याच संशोधनाच्या आधारे आता शेती करून किमान पाच वर्षे तरी जगून दाखवा, प्रपंच चालवून दाखवा आणि शेती करून होणाऱ्या मिळकतीवर विद्यापीठाचे सर्व कारभार, अनुदान अथवा पगार न घेता चालवून दाखवा. आधी केले मग सांगितले यासारखा दुसरा चांगला मार्ग नाही. स्वीकारणार का आव्हान?**

**मा. कुलगुरू डॉ. व्यंकट मायंदे,**
**पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला**
**स.न.वि.वि**

दि. ६ जून २०११ च्या लोकसत्तामध्ये एक बातमी प्रकाशित झाली आहे. कृषी अधिकाऱ्यांच्या तांत्रिक कार्यशाळेत प्रकल्प आधारीत शेती या विषयावर मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांना फुकट काही देऊ नये, नुसते फुकट जर दिले तर शेतकरी फुकट घेण्यासाठीच बसलेले असतात, अशी शेतकऱ्यांची प्रवृत्तीच झाली आहे अशा आशयाचे विधान केल्याचे प्रकाशित झाले आहे.

डॉ. मायंदे साहेब, आपण एका विद्यापीठाच्या कुलगुरूपदी विराजमान आहात आणि कुलगुरू या शब्दाची महतीसुद्धा फार मोठी आहे. पूर्वीच्या काळात गुरुकुल असायचे. त्या गुरुकुलात गुरू आपल्या शिष्यांना असे काही शिक्षण द्यायचे की शिष्य समग्र समाजाला नवी दिशा देऊन समाजप्रबोधनाचे कार्य करायचेत. त्या गुरुकुलातील गुरुही इतके प्रतिभावान व पारंगत असायचेत की राजालादेखिल आपला राज्यकारभार व्यवस्थित चालविण्यासाठी अशा गुरुंची गरज भासायची. त्यासाठी राजगुरूही नियुक्त केले जायचे.

आता गुरुकुल काय आणि कुलगुरू काय, दोन्ही शब्द सारखेच, अर्थही जवळपास सारखेच. नुसती अक्षरांची तेवढी हेराफेरी. फरक एवढाच की, पूर्वीच्या काळी गुरू स्व:सामर्थ्यावर आणि कठोर तपस्या करून मिळविलेल्या ज्ञानाच्या बळावर गुरुकुलाची स्थापना करून ते चालवायचे आणि नावलौकिक मिळवायचेत. आता मात्र आधीच अस्तित्वात असलेल्या विद्यापीठावर सेवा कार्यकाळ वरिष्ठता व राजकीय लागेबांधे या आधारावर आयत्या बिळात नागोबा बनून कृषिविद्यापीठात कुलगुरू या पदापर्यंत पोचले जात असावे. त्यात पात्रता, अभ्यास, शेतीविषयक सखोल ज्ञान, शेतीच्या उत्थानासाठी करावयाच्या प्रयत्नांसाठी आवश्यक असणारी ऊर्मी वगैरे बाजू विचारात घेतल्या जातात की नाही, याबाबत तुमचे वरील विधान वाचल्यानंतर संशय घ्यायला खूप जागा निर्माण झाल्या आहेत.



**गंगाधर मुटे**

शेतकऱ्यांना फुकटचे खायची सवय पडली आहे, असे म्हणणारे जगाच्या इतिहासातले तुम्ही पहिले नाहीत, हे मी मान्य करतो. अशा तऱ्हेची विधाने अधूनमधून ऐकायला-वाचायला मिळतच असतात; पण ऐरेगैरे नथ्थू खैरे यांनी तसे म्हटले तर ती गंभीर बाब खचितच नसते. कारण ही माणसे काही शेतीविषयातली खूप मोठी अभ्यासक नसतात. शेतीविषयाशी त्यांची बांधिलकी असतेच असेही नाही. पण जेव्हा एखाद्या कृषिविद्यापीठाचा थेट कुलगुरूच अशा तऱ्हेचे अशास्त्रीय आणि बिनबुडाचे निवेदन करतो तेव्हा ती बाब नक्कीच गंभीर आणि क्लेशदायक ठरत असते.

मायंदे साहेब, माझे तुम्हाला थेट प्रश्न आहेत की, सरसकट सर्व महाराष्ट्रीय शेतकऱ्यांना फुकटात काय मिळते? ते कोण देते? विद्यापीठ देते की कुलगुरू देते? शासन देते की शासनकर्ते देतात? किती देतात? कोणत्या स्वरूपात देतात? निदान चालू आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना फुकट वाटलेल्या रकमेचा आकडा सांगा. त्या रकमेच्या आकड्याशी महाराष्ट्रातील एकूण शेतकरी संख्येचा भागाकार करा. दरडोई मिळणारी रक्कम किती रुपयांत की नव्या पैशांत तेही जाहीर करा.

तुम्ही उत्तरेच देणार नाहीत, कारण तुम्हाला उत्तरे माहीत असती तर वास्तविकतेचे नक्कीच भान असते आणि वास्तविकतेचे भान असलेला मनुष्य अशी मुक्ताफळे उधळू शकत नाही. वास्तविकता ही आहे की, महाराष्ट्रच काय संपूर्ण भारत देशाच्या कोणत्याच कोपऱ्यात सरसकट सर्व शेतकऱ्यांना फुकटात काहीच मिळत नाही.

मायंदे साहेब, शेतकऱ्यांना सल्ला देण्याइतके सर्वांत सोपे काम दुसरे कुठलेच नाही. त्याला अनुभवसंपन्नता लागत नाही, सखोल ज्ञानाची गरज पडत नाही, बुद्धीला फारसा ताण द्यावा लागत नाही. कारण आधीच कोणीतरी पुस्तकात जे काही लिहून ठेवलेले असते त्याचीच घोकमपट्टी करून तशीच री ओढायची असते. शेतीविषयक सल्ला देणे म्हणजे यापलीकडे काय असते? आधी केले, मग सांगितले या म्हणीप्रमाणे वागावे लागत नाही. स्वतःच्या शेतीत किंवा विद्यापीठाच्या शेतीत ज्यांना कधी एकरी ३ क्विंटल कापूस पिकवून दाखवता आला नाही ते एकरी १२ क्विंटल कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याला सल्ला द्यायला उतावीळ असतात. स्वतःच्या शेतीत किंवा विद्यापीठाच्या शेतीत ज्यांना कधी एकरी १५ क्विंटल सोयाबीन पिकवून दाखवता आले नाही, ते स्वतःला शेतीतज्ज्ञ म्हणून मिरवत असतात. तसे नसते आणि शेतीमध्ये जर भरमसाट मिळकत मिळवता आली असती तर तुमच्यासारखी सर्व शेतीतज्ज्ञ मंडळी शेतीकरून मालक बनण्याऐवजी चाकर बनून बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात कशाला वाटत फिरले असते? स्वतः शेती करून आणि शेतीमध्ये कापूस, तूर, मूग, उडीद, गहू, बाजरा, भात, सोयाबीन किंवा हरबरा पेरून, शेतीत मिळणाऱ्या उत्पन्नांच्या बळावर शेतकऱ्याला क्लास वन किंवा सुपरक्लास वन जीवन जगता येऊ शकते, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविणारा एखादा तरी शेतीतज्ज्ञ निर्माण का होत नाही? याचे तरी समर्पक उत्तर देणार काय?

**शेतकऱ्यांना फुकटचे खायची सवय पडली आहे, असे म्हणणारे जगाच्या इतिहासातले तुम्ही पहिले नाहीत, हे मी मान्य करतो. अशा तऱ्हेची विधाने अधूनमधून ऐकायला-वाचायला मिळतच असतात; पण ऐरेगैरे नत्थू खैरे यांनी तसे म्हटले तर ती गंभीर बाब खचितच नसते. कारण ही माणसे काही शेतीविषयातली खूप मोठी अभ्यासक नसतात.शेतीविषयाशी त्यांची बांधिलकी असतेच असेही नाही. पण जेव्हा एखाद्या कृषिविद्यापीठाचा थेट कुलगुरूच अशा तऱ्हेचे अशास्त्रीय आणि बिनबुडाचे निवेदन करतो तेव्हा ती बाब नक्कीच गंभीर आणि क्लेशदायक ठरत असते.**

पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे सर्वदूर विदर्भात असलेली सर्व कृषीसंशोधन केंद्रे मिळून एकूण शेतजमीन किती? त्यांपैकी पडीक किती? जिरायती किती? बागायती किती? प्रत्यक्षात पिकाखाली किती? खरीप व रबी हंगाम-२०१० मध्ये झालेले एकूण उत्पादन किती? एकूण उत्पादनाला एकूण पिकाखालील क्षेत्राने भागाकार करून तुमच्या विद्यापीठाने एकरी कोणत्या पिकाचे किती उत्पादन घेतले ते तरी सांगणार का? उत्पादनाच्या विक्रीपोटी मिळालेली रक्कम वजा उत्पादन घेण्यासाठी आलेला खर्च बरोबर मिळालेला नफा किती? एवढे तरी जाहीर करणार काय?

विद्यापीठाच्या शेतीत एकरी उत्पन्न किती निघते, असा जेव्हा प्रश्न विचारला जातो तेव्हा विद्यापीठात उत्पन्नासाठी नव्हे तर संशोधनासाठी शेती केली जाते, असे विद्यापीठाच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांपासून ते कुलगुरूपर्यंत सर्वांकडून एवढे एकच छापील उत्तर दिले जाते. या प्रश्नाचे उत्तर देताना चतुर्थ श्रेणी कर्मचारी आणि कुलगुरू यांची बौद्धिकपातळी समानपातळीवरच खेळत असावी, असे दिसते. कारण विद्यापीठात संशोधन करून आपण काय दिवे लावलेत याचा आढावा घेण्याची गरज दोघांनाही वाटत नाही. तसे नसेल तर पंजाबराव कृषी विद्यापीठाने गेल्या वर्षात शेतकऱ्यांना उपयोगी पडेल किंवा त्यांच्या शेतीत चमत्कारिक बदल घडून येईल असे कोणते संशोधन केले आहे, ते तरी सांगा.

आज विदर्भात कपाशीच्या लागवडीसाठी खाजगी कंपन्यांनी संशोधित केलेल्या कपाशीच्या वाणांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. पंकृविद्वारे संशोधित AHH-468, PKV-Hy4 या वाणांकडे शेतकरी ढुंकूनदेखील पाहत नाहीत. सद्यस्थितीत तुरीमध्ये ICPL-87119, BSMR-736 किंवा मारुती या जातीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते आणि हे संशोधन पंकृवीचे नाही. सोयाबीनमध्ये JS-335 या जातीने सोयाबीन क्षेत्र व्यापून टाकले आहे, तेही संशोधन पंकृवीचे नाही. ऊसामध्ये तेच, केळीमध्ये तेच, भाजीपालावर्गीय पिकामध्ये तेच. मग पिकेव्हीचे संशोधन आहे कुठे?

नांगर, कुळव, वखर, डवरणी यंत्र, मळणीयंत्र, पेरणीयंत्र यातले संशोधन पंकृवीचे नाही. कीटकनाशके किंवा रोगप्रतिकारक शक्ती असलेले जनुकीय बियाण्यांतील संशोधन पंकृवीचे नाही. शेतीमध्ये ज्या-ज्या गरजा आहेत, त्यांपैकी कुठल्याही क्षेत्रात पंकृवीचे नाव घेण्यासारखे संशोधन नाहीच. मग तुम्ही संशोधन करता म्हणजे नेमके काय करता? याचे तरी उत्तर देणार की नाही?

मायंदे साहेब, मंत्र्यांची आणि शासन-प्रशासनाची गाढाभर कागदपत्रांच्या दस्तावेजाच्या आधारे दिशाभूल करणे फारच सोपे काम आहे; पण तुम्ही शेतकऱ्यांची दिशाभूल करू शकत नाहीत, हेही ध्यानात घ्या. शेतकरी आर्थिक स्थितीने परावलंबी झाल्याने तो कोणाच्याही समोर फारसे बोलत नाही म्हणून तुमच्यासारख्यांचे फावते, हेही लक्षात घ्या. कागदोपत्री संशोधनाच्या आधारे पीएचडी, डीलिट वगैरे मिळू शकते, पण शेती पिकवायसाठी बियाणे-खते-कीटकनाशके यांची गरज असते, कागदपत्री दस्तावेज हे काही पिकांचे खाद्य नाही. शिवाय या दस्तावेजांचे सेंद्रिय खतात रूपांतर केले आणि पिकाला खाऊ घातले तर जास्तीत जास्त क्विंटल-दोन क्विंटल अधिक अन्नधान्य पिकू शकेल, पिकाच्या भाषेत या दस्तावेजाला यापेक्षा जास्त काही अर्थ उरत नाही. मुलांची भाषा ज्याला चांगली कळते तोच चांगला पालक. ज्याला विद्यार्थ्यांची भाषा कळत नाही तो शिक्षक विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणू शकत नाही, अगदी तसेच, ज्याला पिकांची भाषा कळत नाही तो शेतीमध्ये चांगले संशोधन करूच शकत नाही. तुम्हीसुद्धा विद्यापीठात नोकरी करताय ती पगार मिळविण्यासाठी की शेतीचे भले करण्यासाठी, याचेही प्रामाणिक उत्तर स्वतःच स्वतःला विचारून पाहा. तुमच्यामुळे शेतकरी समाजाचे काही भले होणार नसेल तर नसू द्या; पण शेतकऱ्यांना डिवचण्याचे व त्यांचा

**नांगर, कुळव, वखर, डवरणी यंत्र, मळणीयंत्र, पेरणीयंत्र यातले संशोधन पंकृवीचे नाही. कीटकनाशके किंवा रोगप्रतिकारक शक्ती असलेले जनुकीय बियाण्यांतील संशोधन पंकृवीचे नाही. शेतीमध्ये ज्या-ज्या गरजा आहेत, त्यांपैकी कुठल्याही क्षेत्रात पंकृवीचे नाव घेण्यासारखे संशोधन नाहीच. मग तुम्ही संशोधन करता म्हणजे नेमके काय करता? याचे तरी उत्तर देणार की नाही?**

उपहास, उपमर्द करण्याचे उपद्‌व्याप तर बंद करा.

आज दुर्दैवाने विद्यापीठीय शेतीसंशोधक आणि प्रत्यक्ष शेती यांचा अर्थाअर्थी काहीही संबंधच राहिलेला नाही. शेतीचे अर्थशास्त्र तुमच्यासारख्या उच्चशिक्षित पंडितांना कळत नाही. थोडेफारदेखिल अर्थशास्त्र कळले असते तर कांद्याचे भाव २ रू. प्रतीकिलो, कापसाचे भाव रू. २५००/- आणि तुरीचे भाव आधारभूत किमतीपेक्षा खाली कोसळल्यावर कृषिविद्यापीठाचे कुलगुरू या नात्याने तुम्ही शासनाला दोन खडे बोल नसते का सुनावले? किंवा दोन खडे बोल सुनावण्याचे धारिष्ट्य नसेल तर अगदी प्रेमळ भाषेतही शासनापर्यंत शेतीच्या व्यथा पोचवायला काय हरकत होती? शेतमालाचे भाव कोसळल्यामुळे शेतीचे अर्थशास्त्र बिघडू शकते आणि शेतकरी देशोधडीस लागू शकतो, एवढीतरी बाब शासनाच्या कानावर घालायला काय हरकत आहे? पण तुम्हाला त्याची गरज भासत नाही कारण शेती किंवा शेतीसंशोधन याऐवजी शासकीय अनुदानावर तुमचे प्रपंच चालतात. शेतमालाचे भाव कोसळल्याचे फटके तुम्हाला बसत नाहीत. तुमचे पगार, भत्ते अगदी शाबूत असतात. निसर्गाचा लहरीपणा, हवामान, पाऊसपाणी किंवा ओला-कोरडा दुष्काळ यांच्याशी शासकीय अनुदानाचा काहीही संबंध नसतो. अनुदान व पगार हे हमखास पीक असते. असेच ना?

पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे हजारो एकर जमीन आहे. सिंचनाची व्यवस्था आहे, तुम्हीच गेल्या पन्नास वर्षांत केलेल्या संशोधनाची शिदोरी आहे. मग कृषी विद्यापीठाला अनुदानाची गरज का पडावी? विद्यापीठात काम करणाऱ्या तज्ज्ञांना शासनाकडून पगार घेण्याची गरज का भासावी? आता निव्वळ सल्ले देणे खूप झाले, या विद्यापीठाच्या हजारो एकरावर तुमच्याच संशोधनाच्या आधारे आता शेती करून किमान पाच वर्षे तरी जगून दाखवा, प्रपंच चालवून दाखवा आणि शेती करून होणाऱ्या मिळकतीवर विद्यापीठाचे सर्व कारभार, अनुदान अथवा पगार न घेता चालवून दाखवा. आधी केले मग सांगितले यासारखा दुसरा चांगला मार्ग नाही. स्वीकारणार का आव्हान?

आज कापसाचे बाजारभाव प्रतिक्विंटल रू. २५००/- आणि तुरीचे भाव प्रती क्विंटल रू. २०००/- एवढे खाली घसरलेत. २५०० रुपयांत क्विंटलभर कापूस आणि २००० रुपयांत क्विंटलभर तूर कसा पिकवला जाऊ शकतो, याचे विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक तरी करून दाखवायला काय हरकत आहे? दाखवणार का प्रात्यक्षिक करून? स्वीकारणार का आव्हान?

या सर्व प्रश्नांचे उत्तर देणे तुमची नैतिक जबाबदारी आहे. नैतिकतेची चाड नसेल तर निदान तुम्ही तरी फुकटाचा पगार खात नाहीत, हे सिद्ध करण्यासाठी उत्तरे दिली पाहिजेत. महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी समाज तुमच्याकडून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्याची प्रतीक्षा करीत आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४

■■

---

॥ श्री ॥

सप्रेम नमस्कार!

सौ. धनवंती व श्री. विनय हर्डीकर यांचा मुलगा

**चि. अनिरुद्ध**

आणि सौ. वर्षा व श्री. किशोर रणदिवे यांची मुलगी

**चि. सौ. कां. संयुक्ता**

**यांच्या विवाहानिमित्त**

*दिनांक. १२ जुलै २०११ रोजी स्नेहभोजनाचा कार्यक्रम ठरवला आहे.*
*नवीन दांपत्यास आशीर्वाद आणि शुभेच्छा देण्यासाठी अवश्य या.*
*नक्की भेटूया!*

**सौ. पद्मा वाबळे । श्री. रामचंद्र वाबळे**
**सौ. धनवंती हर्डीकर । श्री. विनय हर्डीकर । कु. संयोगिता हर्डीकर**
**सौ. माधवी कुबेर । श्री. अनिल कुबेर**

कार्यक्रमाची वेळ व स्थळ :
मंगळवार दि. १२ जुलै २०११, संध्याकाळी ६.३० वाजल्यापासून
हर्षल हॉल, कर्वे रोड, कासट पेट्रोल पंपाजवळ, कोथरूड, पुणे ३८.
आहेर किंवा पुष्पगुच्छांची औपचारिकता कशाला?

**संपर्क : विनय हर्डीकर मो. ०९८९०१६६३२७**

# दु:खी कार्यकर्ता विभाजित समाज

**[ जिस हिंदु कोड बिल के पक्ष में ये नारीवादी कार्यकर्ता तमाम दलीलें दे रही थी, वह कानून, एक व्यक्ति को सबसे नीचे के स्तर पर गिराकर एक लैंगिक दास में तब्दील कर देता है. एक मनुष्य के रूप में उसके सपने, उसकी लैंगिक ईच्छाओं की सरासर अवहेलना इस कानून की मूल धारणा है. इतिहास के समूचे विस्तार में महिलायें जिस शोषण से सबसे ज्यादा पिढ़ीत रही है, उसी लैंगिक शोषण को ढाल बनाकर यह कानून दांपत्य संबंधों के अधिकार और कर्तव्य निश्चित करने पर तुला है. जो कानून गुलामी को अवस्था और स्वतंत्रता को अपराध मानता हो, वह किसी का भी कैसे भला कर सकता है? ]**

पिछले सप्ताह नागपूर से प्रसारित एक टी.वी. चैनल पर महाराष्ट्र की लोकप्रिय समाज सेविका समझी जाने वाली महिलाओं की बहस चल रही थी. हिंदु कोड बिल से प्राप्त महिला अधिकारों का गुणगान, उनकी समूची बहस का एकमात्र उद्देश्य था. ये सभी महिलायें कोई न कोई गैर सरकारी संघठन चलाती है और समाज के किसी न किसी शोषित वर्ग को, दूसरे वर्ग के शोषण से बचाने के आंदोलन करती हैं.

इनकी आक्रोश से भरी देह बोली और इनके भीतर की हिंसा को देख कर ही यह स्पष्ट हो जाता है कि इनके व्यक्तिगत जीवन के कटु अनुभवों ने इन्हें काफी कुछ नुकसान पहुँचाया है. इनके नारित्व की उदात्त प्रतिमा और उसकी गरिमामय गंध, जो कुछ भी इनके पुरूष रिश्तेदारों ने उन्हें दिया, उस के लेखे जोखे में, भूतकाल में ही कहीं लुप्त हो चुकी हैं. बेहद चिडचिड़े स्वभाव और प्रत्येक बात का हिसाब माँगने के इनके आग्रह में, मुझे भारतीय इतिहास की दो महानतम महिलायें, सीता और द्रोपदी, ढूँढने से भी नहीं मिली. सीता और द्रोपदी ही इसीलिये, क्योंकि वे भी पुरूषप्रधान व्यवस्था की शोषित नायिकायें है. लेकिन उनका व्यक्तित्व पुरूषों के अन्याय से पराजित नहीं हुआ बल्कि उनके दौर के लगभग सभी नायक उनके सामने बेहद बौने या निरूत्तर दिखाई देते हैं. अन्याय और शोषण से उनके व्यक्तित्व भीतर से इतने नहीं जले कि उनकी चमक ही मंद पड़ जाये, बल्कि उनके भीतर की दाहकाता ने पुरूषों की वीरता, पुरूषार्थ और सृजनात्मकता को नयी दिशा और आभा दी. सीता ने राम से मिले अपमान का बदला अपने अकेले के दम पर लव कुश को बलशाली बना कर लिया तो द्रोपदी ने अपने अपमान की कीमत समूचे कुरू कुल को नेस्तनाबूद करके लगाई. ये महान नायिकायें अपने सम्मान के लिये पुरूषों का पीछा नहीं कर रही थी, बल्कि अपने चरित्र के आलोक में उस दौर के श्रेष्ठ नर-पुरूषों को अपनी शरण में आने के लिये मजबूर कर रही थी.



ॲड. दिनेश शर्मा

आज की ज्यादातर नारीवादी आंदोलन की महिला नेत्रीयों का इतिहास जख्मी है, पुरूषों से मिले धोखे और अपमानों से भरा हैं. किंतु इसके बाद में भी, इन्हें इज्जत से प्रेम या आदर देने वाले किसी भी पुरूष का नहीं मिलना, काफी दारूण लगता है. इनकी पूरी बहस को सुनते हुये केवल एक प्रश्न मैं अपने आप से पूछता रहा कि यदि अपने जीवन की पहली मुलाकात में किसी ने इन्हें जी भर कर चाहा होता, इन पर किसी कालिदास ने कोई मेघदूत लिखा होता, किसी बायरन या एल्विस प्रेसली के बेहद आत्मिक पुकार से भरे प्रेम गीतों की ये विषयवस्तु बनी होती, तो देश के नारीवादी आंदोलनों का क्या हश्र हुआ होता? क्या उस अवस्था में भी ये महिला नेत्रीयाँ इतनी ही ताकत से पुरूषों से हिसाब माँग रही होती?

यूरोप में जन्मी सीमोन द बोऊआर के सेकंड सेक्स नामक ग्रंथ से सारी दुनिया के नारीवादी आंदोलनों की शुरूआत कर दी थी. समूचे विश्व में महिलायें अपने व्यक्तित्व की अभिव्यक्ति के लिये अपने घरों से बाहर निकली. स्त्री-पुरूष समानता का एक विराट आंदोलन समूचे देश में शुरू हो गया. सारे देश में उन नारीवादी कार्यकर्ताओं की एक पूरी फौज सड़कों पर उतर गई, जो दहेज हत्या, मादा भ्रूण हत्या, स्त्री के संपत्ति और गुजारे भत्ते के अधिकार, शारीरिक और मानसिक शोषण, बच्चों पर उनके पालकत्व, इत्यादि कई मामलों में सरकार पर दबाव बना कर अपने पक्ष में कई कानूनों का निर्माण करवाने में सफल रही. आज इन्ही के संघर्षों के बल पर स्त्री शक्ति का विराट उदय जीवन के लगभग प्रत्येक क्षेत्र में देखने को मिल रहा हैं.

किंतु इस समूचे आंदोलन के साथ एक दुर्घटना इसके शुरूआती दौर में ही घटित हो गयी. स्त्री और पुरूष हर मामले में न केवल समान है बल्कि उनमें से किसी की भी प्रत्येक निर्मिती पर उन दोनो का समान अधिकार है, इस एकमात्र सिंद्धांत को अपना घोष वाक्य मानकर बाहर निकली ये महिला कार्यकर्ता, अपने जीवन के भौतिक और भावनीक अभावों और अवसादों से शायद ही कभी बाहर निकली हो. नारीवाद की सभी परिभाषायें इसके पत्नि रूप में ही कैद कर दी गयी. नारी के बाकी सभी रूप या छटायें इस पत्नि रूप के रणगाड़े के सामने बड़ी ही निर्ममता से कुचल दिये गये. इनके आंदोलनों की नारी में केवल और केवल पत्नियाँ थी और वे भी अपने पति के विरूद्ध अधिकारों की माँग करती नारों की तख्तियों के साथ. नारी के बाकी सभी रूपों का यह कत्लेआम दुर्भाग्य से पुरूषों के हाथों नहीं हुआ बल्कि नारीवादी आंदोलन के कारण ही हुआ है. इनके आसपास की दुनिया में शायद ही कुछ निर्मित हुआ हो, या ये स्वयं अपवाद रूप में ही सही, शायद ही किसी महान रचना की प्रेरणा बनी हो? इस पूरी यातनापूर्ण यात्रा में इन्हें शायद ही कहीं वह सम्मान या भावनिक प्रेम मिला हो, जिसका सपना लेकर वें उस आंदोलन का झंडा लेकर घर से चली थी.

**नारीवाद की सभी परिभाषायें इसके पत्नि रूप में ही कैद कर दी गयी. नारी के बाकी सभी रूप या छटायें इस पत्नि रूप के रणगाड़े के सामने बड़ी ही निर्ममता से कुचल दिये गये. इनके आंदोलनों की नारी में केवल और केवल पत्नियाँ थी और वे भी अपने पति के विरूद्ध अधिकारों की माँग करती नारों की तख्तियों के साथ. नारी के बाकी सभी रूपों का यह कत्लेआम दुर्भाग्य से पुरूषों के हाथों नहीं हुआ बल्कि नारीवादी आंदोलन के कारण ही हुआ है.**

हमारे जीवन में स्त्री अनेकानेक रूपों में मौजूद है. उसमें से कुछ नैसर्गिक है तो कुछ समाज मान्य या कानून सम्मत है. हमारी माँ, बहन, बेटी, माँसी, नानी, दादी, काकी, मामी या बुआ उसके नैसर्गिक रूप है, जो हमें हमारे जन्म से प्राप्त होते है. वहीं हमारी पत्नि, साली, भाभी या सास जैसे अन्य रिश्तें है जो समाज या कानून की मान्यता से पैदा या समाप्त होते है. स्त्री का एक रूप मित्र या सखा वाला भी है, जो केवल दो व्यक्तियों की आपसी समझदारी या एक दूसरे पर किये गये विश्वास से जन्म लेता है. इन तमाम नारीवादी आंदोलनों के परिणाम स्वरूप, हमारे तमाम कानून सम्मत रिश्तों की कीमत पर, हमारे सभी नैसर्गिक रिश्तों को घर के बाहर का रास्ता बताया जा चुका हैं. आज विवाह होते ही हमारे जीवन के सभी नैसर्गिक नारी रूप डरे डरे हमारे आसपास आते है, मानो वे कोई बहुत बड़ा अपराध कर रहे हो. सभी कानून सम्मत नारी रूप इस अंदाज में हम पर अधिकार जताने लगते है मानो हमारी प्रत्येक गतिविधी उनकी ईच्छाओं के अधीन है. एक स्त्री, यदि नैसर्गिक रूप से तिल तिल मर रही हो और केवल कानून या समाज की मान्यता की ताकत से ही बच रही हो तो यह अवस्था उस स्त्री के साथ सबसे बड़ा अन्याय है. यह उसके नारीत्व का सबसे बड़ा अपमान है. नैसर्गिकता चिरायु होती है, मान्यतायें कभी भी बदल सकती है. हम बिल्कुल इसका उल्टा कर रहे हैं. हम कानूनी मान्यताओं को चिरायु बना कर नैसर्गिकता को समाप्त कर रहे है. ऐसा करके हम किस सामाजिक व्यवस्था की ओर बढ़ रहे है, यह विचारणीय प्रश्न है. हम स्त्री की प्रेरणा को ही मानो जीवन से समूल रूप से विस्थापित करने पर तुले है. नतीजा बेहद जीवन विरोधी है. स्त्री पुरूष के इस संघर्ष में नारी अपना नारीत्व खो कर रूक्ष तथा तनावपूर्ण होकर उर्जा और प्रेरणा से हीन बन रही है तो पुरूष अपना पौरूषेय आचरण खो कर दब्बूपन या हीन भाव से भर रहे है. दोनो ही अपनी नैसर्गिकता को खो रहे है. जो इस अवस्था का बोझ उठाने के लिये तैयार नहीं है, वे हत्या या आत्महत्या जैसे कदम उठा रहे है. पति पत्नि में जानलेगा तनाव आज की जीवनशैली बन चुका है. एक पुरूष के लिये जिंदगी की सबसे मूल्यवान भेंट, एक गरीमा और प्यार से ओतप्रोत स्त्री का साहचर्य है तो एक स्त्री के लिये सबसे सुकून से भरा क्षण, उसकी प्रेरणा से उभरते पुरूष की उद्यमशील प्रतिमा को देखना है.

यहाँ पर मुझे भारतीय फिल्म इतिहास की दो सबसे महान और लोकप्रिय नारीवादी अभिनेत्रीयों, स्मिता पाटील और शबाना आज़मी की बेहद याद आई. श्याम बेनेगल, महेश भट्ट और गोविंद निहलानी जैसे फिल्म निर्देशकों ने उस दौर के नारीवादी आंदोलन को बड़े ही तूफानी अंदाज में परदे पर उतारा था. किंतु बाद के दौर में इन नारीवादी कार्यकर्ताओं में से कई तो अपने ही द्वारा स्थापित मान्यता के विरूद्ध समझौते करके घर बसाने के लिये मजबूर या प्रेरीत हुयी. स्वयं स्मिता पाटील को अभिनेता राज बब्बर की दूसरी पत्नि बन कर अपने व्यक्तित्व का अधूरापन पूरा करना पड़ा तो शबाना आज़मी ने प्रसिद्ध लेखक और गीतकार जावेद अख्तर की दूसरी पत्नि बनकर अपने जीवन उद्देश्य को पूरा करना चाहा. ये दोनों बेहद बुद्धिमान और सृजनात्मक उर्जा से भरी महिलायें थी, इसलिये जीवन के लंबित पड़ाव पर ही क्यों न हो, अपने अधूरेपन को पूरा करने में सफल रही. उनको देर से ही सही, मिले पुरूष सहयोगियों ने, अपनी पहली पत्नियों को तलाक देकर, इनके सम्मान और आंतरिक खोज की रक्षा की और एक नारी के रूप में उनके अस्तित्व को सार्थकता मिली. इनके पुरूष सहयोगियों ने भी इस नयी प्रेरणा का फायदा लेकर अपनी सृजनात्मकता से देश को समृद्ध ही किया है.

मेरा प्रश्न यह है कि बाकी की कितनी महिलायें इतनी भाग्यशाली है कि उनके सम्मान के लिये कोई पुरूष इतना बड़ा फैसला लेने का साहस दिखा सकेगा? और मान लो कि यदि ऐसी कोई हिम्मत करता भी है, तो क्या देश का कानून त्वरित में उसे इसकी इजाजत देगा? उस कानून की कोई भी धारा आपको अपनी ईच्छा से तलाक लेकर दूसरे व्यक्ति से विवाह करने की इजाजत नहीं देती. आपको अपने मौजूदा साथी के दोष अदालतों के सामने सिद्ध करने पड़ते हैं, तभी आप उससे मुक्ति माँग सकते है. आपकी आजादी का संबंध, दूसरे के गुनाहों या दोष के भरोसे है. आपकी आजादी, आपका अपना फैसला नहीं हो सकती. हिंदु कोड बिल ने विवाह को एक ऐसी भूल बना दिया है, जो कभी दुरूस्त हो ही नहीं सकती. ना तो दंड से, ना नुकसान भरपायी से आप इससे मुक्त हो सकते है. यदि आपका मौजूदा साथी कोई गल्ति नहीं करता है, जो कि कानून की नजर में संज्ञेय हो, तो मान लिजीये आप इस जीवन में अपने विवाह संबंध के बाहर नहीं जा सकते है. दूसरी शादी तो बहुत दूर की बात है, आप तो अकेले रहने की आजादी का भी उपभोग नहीं कर सकते है, क्योंकि उसके लिये भी आपको अदालत में यह सिद्ध

करना पड़ेगा कि आपके साथी का व्यवहार ऐसा है कि आप उसके साथ रहने में असमर्थ है.

यदि कोई हिंदु, कानून से बचकर ऐसा फैसला करना चाहे, तो उसे अपना धर्म छोड़कर ईस्लाम धर्म का अंगीकार करना होगा. स्मिता पाटील को यही करना पड़ा और हेमा मालीनी और धर्मेंद को भी यही करना पड़ा. यहाँ आकर हिंदु कोड बिल हार जाता है और मनुष्य की नैसर्गिक जीवन जीने की ईच्छाएँ जीत जाती है. स्वतंत्रता की चाह, प्रत्येक मनुष्य का जन्मसिद्ध अधिकार है. दुनिया के सभी कानून एक व्यक्ति की नैसर्गिक स्वतंत्रता का हनन दूसरों के हाथों से न हो, यही देखने के लिये है. क्योंकि स्वतंत्रता सृजन की जन्म भूमी है. दुनिया के समूचे इतिहास में दासों ने कुछ निर्मित किया हो, ऐसा दिखाई नहीं देता है. सारी संपत्ति, सारी रचनात्मकता, इसी स्वतंत्रता की गोद में जन्म लेती है. हमारे घर परिवार हमारी स्वतंत्रता की बाहरी हमलों से रक्षा करने के लिये है, हमें कैदी बनाकर हमारी प्रतिभा को तबाह करने के लिये नहीं. एक व्यक्ति की, व्यक्ति होने की स्वतंत्रता, किसी भी सृमद्ध समाज की पहली और निर्णायक शर्त है.

जिस हिंदु कोड बिल के पक्ष में ये नारीवादी कार्यकर्ता तमाम दलीलें दे रही थी, वह कानून, एक व्यक्ति को सबसे नीचे के स्तर पर गिराकर एक लैंगिक दास में तब्दील कर देता है. एक मनुष्य के रूप में उसके सपने, उसकी लैंगिक ईच्छाओं की सरासर अवहेलना इस कानून की मूल धारणा है. इतिहास के समूचे विस्तार में महिलायें जिस शोषण से सबसे ज्यादा पिढ़ीत रही है, उसी लैंगिक शोषण को ढाल बनाकर यह कानून दांपत्य संबंधों के अधिकार और कर्तव्य निश्चित करने पर तुला है. जो कानून गुलामी को अवस्था और स्वतंत्रता को अपराध मानता हो, वह किसी का भी कैसे भला कर सकता है?

एक की संपत्ति पर दोनों का अधिकार (अर्थात केवल पति पत्नि का) वाली संकल्पना को अधिकृत बनाकर इस कानून ने पति और पत्नि दोनो को एक दूसरे की संपत्ति में अधिकार तो दिया है किंतु संपत्ति कमाने या संपदा निर्मित करने की मूल प्रेरणा को ही नष्ट कर दिया है. इस दुनिया में कोई भी संपत्ति अकेले में आनंदित होने के लिये नहीं कमाता. प्रत्येक कला, रचना या सृजन के पिछे, अपने ही जीवनसाथी या प्रेम की प्रेरणा मौजूद रहती है. इस दुनिया के सारे युद्ध, सारे जीवन संघर्ष, सारी निर्मिती के मूल में अपने जीवन साथी के प्यार या सम्मान को जीतना ही एकमेव उद्देश्य रहा है. आप प्रेम की प्रेरणा को हटा दिजीये, बाकी कुछ बचता ही नहीं है. संपत्ति या सफलता की प्रेरणा को समाप्त करके आप समाज को बचा ही नहीं सकते है. और दुर्भाग्य से इस कानून ने यही किया है. इसने विवाह तो बचा लिये किंतु प्रेम को खत्म कर दिया है. यह संस्था को तो बचा रहा है, किंतु व्यक्ति को समाप्त करने पर तुला है. व्यक्ति कोई हाड़ माँस का पुतला या रोबोट नहीं होता. वह उच्च से उच्चतम स्तरों की ओर बढ़ रही समझदारी और समृद्धि की यात्रा है. उसका कोई भी फैसला, उसे आगे बढ़ाने, बदलने या फिर से लेने का अधिकार, किसी भी सभ्य समाज के निर्माण के लिये आवश्यक है. आप यदि उसके प्रत्येक फैसले पर न्यायालयीन मुहर लगाने की जिद पाल बैठें और वह मुहर भी मनमाना समय और अपवित्र समझौतों के बाद लगाने की व्यवस्था करते है तो आप व्यक्ति को केवल समाप्त कर रहे है. इससे प्रेम तो समाप्त होता ही है, संपत्ति के निर्माण की मूलभूत प्रेरणा भी नष्ट हो जाती है. ऐसे विवादग्रस्त समाज कुछ भी निर्मित नहीं करते बल्कि केवल दूसरे के दोष ही ढूँढने में ही अपनी सारी जीवन उर्जा नष्ट कर देते हैं.

आज देश के कई हिस्सों में महिलायें, टी.वी. कैंरे के सामने अपने पतियों को पीट रही है क्योंकि वह उसके साथ में रहने का तैयार नहीं है, दूसरी महिला को सरेआम पीटा जा रहा है, मानो उसका कोई अस्तित्व ही नहीं है. दुनिया में कई महिलायें भी अपने पति को छोड़कर किसी पुरूष के साथ रहती होगी, किंतु कोई पुरूष ऐसी हरकत के बारे में सोच भी नहीं सकता क्योंकि इसमें उनका ही अपमान होता है. सगाई करने के बाद शादी नहीं करने वाले पुरूषों को दहेज माँग के प्रकरण मे फँसाया जा रहा है. ऐसे लोगों को ठुकराया नहीं जाता या उनसे बचा नहीं जाता बल्कि सारा जीवन उनका पीछा किया जाता है. लेकिन यदि कोई लड़की विवाह पूर्व की रात को अपने मित्र के साथ फरार हो जाये तो दुनिया के किसी भी थाने या न्यायालय में उसके होने वाले पति के अपमान की फिर्याद दाखल करने का कोई कानून नहीं है. उसके और उसके परिवार के लिये बस एक ही व्यवस्था है कि वे चुपचाप अपने अपमान के घूँट पीकर जिंदा रहने की आदतें विकसीत करें.

जिस महिला या पुरूष ने एक दूसरे को दशकों पहले छोड़ दिया था किंतु तलाक नहीं ले पाये हो, वे एक दूसरे के मरने के बाद, मृतक की छोड़ी गयी संपत्ति पर दावे करने के लिये बाहर आ जाते है. एक दूसरे के साथ न रहते हुये भी एक दूसरे पर कब्जा ऐसे जताया जाता है, मानों लोग किराये पर मकान उठा देते हो.

देश के नारीवादी आंदोलन की कार्यकर्ताओं ने काफी मेहतन और शोध के बाद नारी शोषण के आकड़े जमा करके देश को इस बात के लिये राजी किया था कि वे सख्त से सख्त कानून बना कर स्त्री अधिकारों को बचायें. आज उनसे यह ईमानदार अपेक्षा है कि हिंदु कोड बिल पारित होने के बाद देश की अदालतों में जिन स्त्री पुरूषों ने अपने अपने अधिकारों की रक्षा के लिये मुकदमें दाखिल किये है, वे किस नतीजे पर पहुँचे, कितने परिवार टूटने से बचे और संपत्ति सृजन की प्रेरणा को कितना फायदा या नुकसान पहुँचा, इसका भी लेखा जोखा देश के सामने रखें. वे यह भी जाकर देखें कि कितनी संपदा इन मुकदमों में देश की न्यायालयीन प्रक्रिया में नष्ट हुई, कितने दंपत्तियों के मानव श्रम दिवस इनमें व्यर्थ हुये? यदि जिस प्रेम और सम्मान भरे जीवन के लिये यह सब किया गया था, वह हासिल नहीं हुआ हो, तो वे हमें वह हासील करने के नये सुझाव बतायें.

सबसे महत्वपूर्ण बात जो वे पता लगायें, वह यही, कि क्या आज की नारी अपने सभी गरिमापूर्ण प्रेरणा देने वाले रूप समाप्त करके केवल पत्नि के रूप में प्रसन्न है? और क्या उनके बच्चे, भाई, पिता और मित्र क्या उनके इसी रूप के आलोक में अपने जीवन के सभी आदर्शों की यात्रा जारी रख सकते हैं? कोई कालीदास, बायरन, एलविस प्रेस्ली, राज बब्बर या जावेद अख्तर आपसे प्रेरणा लेकर कुछ निर्माण करना चाहे, तो आपसे मिलने के लिये वह कहाँ आये?

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# कारखान्यांसाठी भूसंपादन की शेतकऱ्यांच्या जमिनीवर डाका?

**आमच्या भंडारा जिल्ह्यातील 'अशोक लेलँड' कारखान्यासाठी शेकडो एकर सुपीक शेतजमीन तसेच काही झुडपी जंगलाची जमीन संपादीत केली गेली. ५ ते १० हजार रुपये प्रति एकर नुकसान भरपाई देण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर भंडारा शहरापासून केवळ २० कि. मी. अंतरावर असलेला हा कारखाना सुमारे ३० वर्षांपासून सुरू आहे. कारखान्याचे बांधकाम हे केवळ झुडपी जंगलाचे जमिनीवर असून शेतजमिनीवर अद्याप कोणतेही बांधकाम झालेले दिसत नाही. शेतजमिनीभोवती केवळ तारांचे कुंपण करण्यात आले आहे. आज या जमिनीची किंमत सुमारे ४० लाख प्रति एकर आहे. स्थानिक शेतकरी स्वत:च्या जमिनीची वाढलेली किंमत आणि कंपनीद्वारे घातल्या गेलेल्या डाक्याने हैराण आहेत.**

**ॲड. कांचन कोतवाल**

कारखान्यांसाठी भूसंपादन की शेतकऱ्यांच्या जमिनीवर डाका?

आपल्या देशात शेतकऱ्यांच्या जमिनी फार मोठ्या प्रमाणात कारखान्यांकरिता संपादीत करण्यात आल्या आहेत आणि होत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या सुपीक जमिनींना कारखान्याकरिता त्यांच्या इच्छेविरुद्ध मुकावे लागत आहे. कारखाने म्हणजेच नफा कमविणारे व्यापारी. त्यांच्यासाठी हा भूमी संपादनाचा सरकारी खटाटोप म्हणजेच शेतकऱ्यांच्या जमिनीवर डाका तर नाही ना असा प्रश्न पडतो. त्यामुळे याबाबतीत कायदा काय आहे ते जाणून घेणे गरजेचे आहे.

### भूसंपादन कायदा १८९४

### कोणत्या कारणासाठी भूसंपादन?

हा कायदा स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आपल्या देशात होता त्याला आपण जसेच्या तसे स्वीकारले; परंतु महत्त्वाची बाब अशी की या कायद्यात कारखान्यांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्यासाठी तरतूद नव्हती. केवळ जनहितासाठी; (Public purpose) ती सोय केली होती. ज्याची व्याख्या कलम ३ एफ मध्ये दिलेली आहे. या कारणांमध्ये केवळ ८ बाबींचा समावेश केला आहे आणि त्यातील ८ व्या भागात 'यात कंपनीकरीता भूसंपादनाचा समावेश नाही' असा स्पष्ट उल्लेखदेखील आहे. त्यामुळे या आठ बाबींशिवाय इतर कोणत्याही कारणास्तव भूसंपादन करणे बेकायदेशीर ठरते.

१. गावठाण सुधारण्यासाठी, वाढीसाठी.

२. शहर अथवा ग्रामीण भागाच्या योजनेसाठी.

३. सरकारी योजना राबवून सरकारी निधी वापरून जमिनीवर सुधारणा करून नंतर ती संपूर्णपणे किंवा काही प्रमाणात भाडेतत्त्वावर किंवा विकून योजनेप्रमाणे सुधार करण्यासाठी.

४. सरकारी मालकीच्या अथवा नियंत्रणाखाली असलेल्या निगमांसाठी.

५. प्रकल्पग्रस्तांच्या तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसनाकरीता.

६. झोपडपट्टी निर्मुलनानंतर पुनर्वसनासाठी, शैक्षणिक कारणासाठी, वैद्यकीय कारणांसाठी, निवास व्यवस्थेसाठी.

७. प्रगतीच्या सरकारी योजना राबविण्यासाठी.

८. सरकारी कार्यालयासाठी.

परंतु यात कंपनीकरीता संपादनाचा समावेश नाही.

याबाबतीत आजवर अनेकदा वाद झाले असून कोणती बाब जनहिताची आहे किंवा नाही याबाबतीत सरकारने घेतलेल्या निर्णयाला मान्य करावे असे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

### कंपनी हितासाठी सरकारी ( भ्रष्टाचारी ) डाव?

सरकारने कंपनीकरीता शेतकऱ्यांच्या जमिनी अत्यल्प किमतीत संपादीत करून कंपन्यांना देण्याचा सपाटा लावला आहे. मायावती सरकार विरोधात शेतकरी आंदोलन करीत आहेत. राहुल गांधींनी गावाला भेट देऊन राजकीय फायदा करण्याचा प्रयत्न चालविला आहे की काय असा प्रश्न पडतो. त्यांना शेतकऱ्यांचे खरंच हित करायचे असेल तर या महत्त्वपूर्ण मुद्यांची दखल घेऊन त्यांचे राजकीय वजन वापरून त्यांनी सकारात्मक पाऊल टाकावे आणि शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा. ही नम्र विनंती.

### भूमी संपादन ( कंपन्याबाबत ) नियम १९६३

हे नियम स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भूसंपादन कायदा १८९४ च्या कलम ५५ मधील तरतुदींच्या आधारे तयार करण्यात आले आहेत.



यात कंपन्यांकरीता भूमी संपादन करण्यासाठी नियम बनविले गेले आहेत. विचारवंतांनी राहुल गांधींसारख्या नेत्यांना प्रश्न करावा की मुळात हे नियम कायदेशीर आहेत काय?

१. मूळ कायद्याच्या कलम ३ पोटकलम एफ ८ मध्ये स्पष्ट उल्लेख आहे की कंपन्यांकरीता संपादनाचा यात समावेश नाही. तसेच

२. कलम ५५ मध्ये स्पष्ट उल्लेख आहे, की या भूसंपादन कायद्याच्या तरतूदींशी विसंगत नसतील असेच नियम सरकारला बनविता येतील.

कलम ५५ प्रमाणे मूळ कायद्याच्या कलम ३ पोटकलम एफ ८ मधील तरतुदींशी विसंगत असा नियम आहे की नाही असा प्रश्न करताच उत्तर येते होय विसंगती आहे. कारण मूळ कायद्याने कंपनीकरीता भूमीसंपादनास समाविष्ट केलेले नाही. मग कंपनीकरीता भूमीसंपादन करावयाची असल्यास त्यासाठी एक तर वेगळा कायदा बनायला हवा किंवा मूळ कायद्यात सुधारणा करून कंपनीकरीता भूमी संपादीत करता येणार नाही ही तरतूद काढून त्याऐवजी कंपनीकरीता भूमी संपादीत करता येईल ही तरतूद करावी लागेल; परंतु तसे झालेले नाही. त्यामुळे कंपनीकरीता भूमी संपादीत करण्याची सोय करणारे नियम हे मूळ तरतूदींशी विसंगत आहेत असेच म्हणावे लागेल. हे नियम रद्द होणे गरजेचे आहे.

**मूळ कायद्याने कंपनीकरीता भूमीसंपादनास समाविष्ट केलेले नाही. मग कंपनीकरीता भूमीसंपादन करावयाची असल्यास त्यासाठी एक तर वेगळा कायदा बनायला हवा किंवा मूळ कायद्यात सुधारणा करून कंपनीकरीता भूमी संपादीत करता येणार नाही ही तरतूद काढून त्याऐवजी कंपनीकरीता भूमी संपादीत करता येईल ही तरतूद करावी लागेल; परंतु तसे झालेले नाही.**

## नियमातील महत्त्वाच्या तरतूदी

नियम ४-संपादन प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी खात्री करून घेणे

१. जिल्हाधिकारी पुढील बाबतीत अहवाल शासनास सादर करतील :

एक- कंपनीने संपादनाच्या प्रयोजनासाठी योग्य असलेल्या स्थानिक क्षेत्रामधील जमीन शोधून काढण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले आहेत.

दोन. कंपनीने अशा जमिनींमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींशी वाटाघाटी करून त्या जमिनी वाजवी किमतीने मिळण्यासाठी सर्व वाजवी प्रयत्न केले आहेत.

तीन. संपादन करण्यासाठी प्रस्तावित केलेली जमीन ही त्या कारणासाठी सोयीची आहे.

चार.संपादन करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ अत्याधिक नाही.

पाच. कंपनी अशी जमीन त्वरित उपयोगात आणू शकेल अशी परिस्थिती आहे.

सहा. संपादन करण्यासाठी प्रस्तावित केलेली जमीन ही सुपीक शेतजमिन असेल तर अशा शेतजमिनीचे संपादन टाळता येईल अशी कोणतीही पर्यायी योग्य जमीन आढळली नाही.

याबाबतीत जिल्हाधिकारी हे जिल्ह्याच्या कृषी अधिकाऱ्याशी विचार विनिमय करतील

आणि नुकसान भरपाईची अंदाजे रक्कम निश्चित करतील.

निश्चित केलेल्या अंदाजे रकमेपेक्षा अधिक रक्कम ही वाजवी किंमत म्हणून कंपनीने देऊ केली होती काय याची खात्री करून घेतील.

जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल आल्यानंतर भूसंपादन अधिनियमाच्या कलम ४१ नुसार करारनामा करण्यात येईल ज्यात पुढील बाबींचा अंतर्भाव राहील.

१- शासनाच्या पूर्व मंजुरीखेरीज, ज्या कारणांसाठी जमीन संपादन केली असेल त्याशिवाय अन्य कारणांसाठी कंपनी तिचा वापर करणार नाही.

२- राहती घरे, सुखसोयी, बांधकाम वगैरेंचा कालावधी हा जमीन हस्तांतरणापासून तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

३ कंपनीच्या नियंत्रणाबाहेरील कारणास्तव वरील कालावधीत कार्यपूर्ती न झाल्यास चौकशीनंतर असा कालावधी पुढील एका वर्षाकरीता वाढविता येईल; परंतु असा वाढविलेला एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

४ करारातील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास सरकारला जमिनीचे हस्तांतरण रद्द करता येईल व जमीन शासनाच्या ताब्यात येईल. संपादनाच्या खर्चापोटी कंपनीने शासनाकडे जमा केलेल्या रकमेच्या एक चतुर्थांश रक्कम कापून उर्वरित रक्कम कंपनीला परत करण्यात येईल. शासनाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

५ ज्या कारणांसाठी जमीन संपादीत केली असेल त्या कारणाकरीता एकूण भागांपैकी काही भागच उपयोगात आणला असेल तर शासन वापरात नसलेल्या जमिनीच्या बाबतीत हस्तांतरण रद्द केल्याचा आदेश पारित करू शकेल. यानंतर संपादनाच्या खर्चापोटी कंपनीने शासनाकडे जमा केलेल्या रकमेच्या एक चतुर्थांश रक्कम कापून उर्वरित रक्कम कंपनीला परत करण्यात येईल. शासनाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

६ वरील परतावा रक्कमेबाबत वाद असल्यास तो त्या न्यायालयात सोडविता येईल ज्यांचे अधिकारक्षेत्रात ती जमीन येईल.

वरील तरतुदींचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर तसेच आपल्याकडील झालेले कंपनीकरीता भूसंपादन पाहिल्यास आपल्या सहजपणे लक्षात येते की, शेतकऱ्यांच्या जमिनी बळकविण्याचा किंबहुना लुटण्याचा हा गोरखधंदा राजरोसपणे आपल्या देशात सुरू आहे.

आमच्या भंडारा जिल्ह्यातील 'अशोक लेलँड' कारखान्यासाठी शेकडो एकर सुपीक शेतजमीन तसेच काही झुडपी जंगलाची जमीन संपादीत केली गेली. ५ ते १० हजार रुपये प्रति एकर नुकसान भरपाई देण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर भंडारा शहरापासून केवळ २० कि. मी. अंतरावर असलेला हा कारखाना सुमारे ३० वर्षांपासून सुरू आहे. कारखान्याचे बांधकाम हे केवळ झुडपी जंगलाचे जमिनीवर असून शेतजमिनीवर अद्याप कोणतेही बांधकाम झालेले दिसत नाही. शेतजमिनीभोवती केवळ तारांचे कुंपण करण्यात आले आहे. आज या जमिनीची किंमत सुमारे ४० लाख प्रति एकर आहे. स्थानिक शेतकरी स्वतःच्या जमिनीची वाढलेली किंमत आणि कंपनीद्वारे घातल्या गेलेल्या डाक्याने हैराण आहेत.

अशीच सारखी परिस्थिती 'सनफ्लॅग पोलाद' कारखान्याच्या बाबतीत देखिल आहे. मला खात्री आहे जागरूक जनतेने सभोवार पाहिल्यास त्यांनादेखिल असे दरोडे आढळतील. यामागे प्रचंड भ्रष्टाचार होत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### आपण काय करू शकतो?

मी काय करू शकतो असे म्हणून आपण अन्याय सहन करतो आणि मग अन्याय करणाऱ्यांचे फावते. त्यामुळे आपण काय करू शकतो हे जाणून घेतले पाहिजे.

१. माहितीच्या अधिकाराखाली कंपनीने सरकारसोबत जो करार केला आहे त्याची माहिती घ्यावी. शक्य असल्यास संपूर्ण कागदपत्रे मिळवावे. म्हणजे जिल्हाधिकारी यांनी दिलेला अहवालदेखिल मिळेल.

२. सर्व कागदपत्रांचा बारकाईने अभ्यास करावा आणि अहवालातील खोटेपणा शोधून काढावा. तसेच करारनाम्यातील तरतुदींचा अभ्यास करून कंपनीने करारातील कोणत्या तरतुदींचे पालन केलेले नाही याचा शोध घ्यावा.

३. योग्य मुद्यांच्या आधारे सरकारकडे संपादन रद्द करण्यासाठी रीतसर अर्ज करून पाठपुरावा करावा.

४. आपल्या भागातील लोकप्रतिनिधिंच्या माध्यमाने विधानसभेत व लोकसभेत प्रश्न उपस्थित करून कार्यवाही होण्यासाठी प्रयत्न करावा.

५. जनहित याचिकादेखिल करता येईल.

व्यक्तीला विरोध न करता प्रवृत्तीला विरोध झाला पाहिजे. याबाबतीत जनआंदोलन होऊन असा हा भूमी संपादन (कंपन्यांबाबत) नियम १९६३ रद्द करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. म्हणजे ना रहेगा बांस नां बजेगी बांसुरी.

भूसंपादन कायदा १८९४ मधील जाचक तरतूद कलम १८ प्रमाणे जमीनमालकांना जो मोबदला दिला जातो त्या विरोधात ६ आठवड्यात रेफरंस करण्याची तरतूद यात आहे; परंतु सरकारच्या विरोधात सदरची कारवाई करण्यात कोणत्याही कारणाने उशीर झाल्यास त्या विलंबास माफ करता येत नाही अशी तरतूद आहे. कलम ५ लिमिटेशन ॲक्ट लागू नाही. ही तरतूद अतिशय अन्यायकारक असून शासन हे तांत्रीक बाब समोर करून याद्वारे अनेक भूमीपूत्रांना त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित ठेवीत आहे. याबाबतीत सुधारणा झाल्यामुळे अनेकांना त्यांचा हक्क मिळेल आणि सरकारला गैरफायदा घेता येणार नाही. सुधारणा होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला पाहिजे आणि ही जाचक तरतूद काढून यात सुधारणा करून कलम ५ लिमिटेशन ॲक्ट लागू राहील अशी दुरूस्ती झाली पाहिजे.

**ॲड. कांचन कोतवाल**
कृषी कॉलनी, गणेशपूर, भंडारा
मो. ९४२२१३००५६
advkotwalkv@rediffmail.com

■■

# मृगारंभाच्या शुभेच्छा



**दरवर्षीप्रमाणे याही वर्षी या हरणाचे प्रतिरूप मानल्या गेलेल्या हरिणकाळजाच्या बळिराजावर दोन शिकारी दबा धरून बसलेले आहेतच. हे दोन शिकारी म्हणजे बाजारपेठेतले कोल्हे आणि लांडगे यांचे वंशज म्हणायला हरकत नाही. कोल्ह्यासारखे चातूर्य दाखवून सर्वप्रथम शेतकऱ्याची शिकार करायला सज्ज असतो तो बी-बियाण्यांचा व्यापारी तर लांडगा म्हणून लचके तोडतो तो खत, किटकनाशकांचा व्यापारी. हे दोघेही मिळून कधीही हवे ते बियाणे, खते उपलब्ध होऊ देत नाहीत. इकडे मृगदेव बरसले तरी आमच्या बळिराजाने डुप्लिकेट बियाणे पेरलेले असते.**



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

**सूर्यदेवाला म्हैस आवडे**
**बसले तिच्या ते पाठी**
**ए मृगा तू धाव म्हणाले**
**नाही तर मारीन काठी**

यंदाचे मृगनक्षत्र नेहमीप्रमाणेच ज्येष्ठ महिन्यात आपल्या अंतरंगात सूर्यदेवाला प्रवेश करा म्हणाले. सूर्यदेवाला यंदा खास म्हणून म्हैस नावाचे वाहन दिले होते. ही म्हैस का दिली तर पाण्यात फतकल मारून बसायला आवडते ते त्या म्हशीला. म्हशीवर सूर्यदेव बसले म्हणजे तेही पाण्यातच छान स्वतःला आंघोळ घालत बसणारच की! नाहीतर संपूर्ण वैशाखात साऱ्या पृथ्वीला चटके देताना स्वतः ते सुद्धा स्वतःला होरपळवून घेतातच. हे सृष्टीकर्त्याला ज्ञात आहे. हे सगळे ज्योतीष संकेत या वर्षीचे आहेत. यंदा म्हणूनच पावसाळा चांगला जाईल हे एकदाचे म्हणायला काय जाते? खरे तर ज्या दिवशी सूर्याने मृगनक्षत्रात प्रवेश केला त्या दिवशी आकाशात मघा नावाचे नक्षत्र होते. पडली तर मघा नाहीतर सूर्याकडे बघा... असे ज्या नक्षत्राबाबत बोलले जाते त्या नक्षत्रदिनी पाऊस पडला हे अनुभवून गोड-गोड वाटले. खरेतर मृग म्हणजे हरिण आणि हरिणाची शिकार करणे तसे सोपे असते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी या हरणाचे प्रतिरूप मानल्या गेलेल्या हरिणकाळजाच्या बळिराजावर दोन शिकारी दबा धरून बसलेले आहेतच. हे दोन शिकारी म्हणजे बाजारपेठेतले कोल्हे आणि लांडगे यांचे वंशज म्हणायला हरकत नाही. कोल्ह्यासारखे चातूर्य दाखवून सर्वप्रथम शेतकऱ्याची शिकार करायला सज्ज असतो तो बी-बियाण्यांचा व्यापारी तर लांडगा म्हणून लचके तोडतो तो खत, किटकनाशकांचा व्यापारी. हे दोघेही मिळून कधीही हवे ते बियाणे, खते उपलब्ध होऊ देत नाहीत. इकडे मृगदेव बरसले तरी आमच्या बळिराजाने डुप्लिकेट बियाणे पेरलेले असते. ते उगवतच नाही आणि जर उगवले तर त्याला कीड लागू नये, रोग होऊ नये म्हणून वापरलेली किटकनाशके, खते ही तर साऱ्या वनस्पतीखाऊ जीवांना पौष्टिक आहार मिळाल्याचे समाधान प्राप्त करून देतात. हे एकीकडे तर दुसरीकडे दरवर्षीच संपूर्ण जून महिना अर्थात ज्येष्ठ महिना हा पांढरेशुभ्र, वांझोटे मेघ घेऊन आकाशात फिरताना आढळतो. जोपर्यंत या मृगहृदयी बळिराजाचे हृदय बंद पडायला येत नाही, जोपर्यंत तो त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याचा आकाशाकडे डोळे लावून, कपाळाला हात लावलेला फोटो वर्तमानपत्रात येत नाही तोपर्यंत वरुणराजाला पाऊस सुरू करावा असे वाटतच नाही. एकदा का कसाबसा पाऊस सुरू झाला, की शेतकरी भिजत-कुजत पेरणी करत बसतो. तर पुण्या-मुंबईपासून ते भामरागड

गडचिरोलीपर्यंत एक कोटी तेरा लाख चारशे सतरा कवींना पावसाच्या कविता होऊन जातात. खरे तर या कविता निर्माण होतील या भीतीनेच कधी कधी पाऊस पडत नाही असेही निरीक्षण अनेक कृषी संशोधकांनी शोधून काढलेले आहे.


हे जरी दरवर्षीचे रडगाणे असले किंवा दु:खभरी, दर्दभरी दास्तान असली तरी सर्वांत मोठे सुख दैव देते ते शेतीकर्म करणाऱ्या जोडप्यालाच. यात घडते काय की...

**अचानक सुटतो वारा,**
**एकदम दाटतात मेघ**
**कडाडते वीज अवचित**
**चमकते सपकन् रेघ**
**दचकते चटकन घरधनीण**
**अन् जवळ येते कशी**
**देहगंध तो मनात भरतो**
**कशास हवी उर्वशी**

हा अचानक येणारा पाऊस, एकदम जवळ येणारी कृषीकन्या, साधेच पण एकच गोणपाट, टप टप थेंब पडण्याआधी मातीचा गंध अन् कृषीकन्येचा देहगंध... खर्व, निखर्व मूल्याचा हा आनंद फक्त शेतकऱ्याला मिळतो. भले त्याला एक एकर का रान असेना. हे सगळे मृगवैभव आहे म्हणून तर पुढे जगायची ओढ आहे. बाकी नाहीतर दुसरे काय खरे आहे... दुसरे काहीही खरे नसल्यामुळे संपूर्ण भारतात सर्वप्रथम आम्हीच आपले गुरू असल्याने आमच्या साऱ्या बळिराजांना मृगारंभाच्या शुभेच्छा देत आहोत आणि ही भविष्यवाणी करत आहोत की,

**कसेही असो बियाणे**
**भरभरून जाईल कणगी**
**व्यापारीच म्हणेल यंदा तुम्हाला**
**कराल का माझी मुलगी**
तथास्तू!!

हे निव्वळ तोंडदेखले आणि कोरडे तथास्तू नसून या मागे आमच्या भरभरून सदिच्छा आहेतच कारण मृगराज जेव्हा सूर्याच्या आगमनावर आईये, आपका इंतजार है' हे गाणे म्हणत होते तेव्हा ती म्हैस साऱ्या जिनिंग मिल्सच्या व्यापाऱ्यांकडे रागात पाहत होती. तिला आम्ही तिच्याया रागाबद्दल विचारले तेव्हा ती म्हणाली, की या मेल्यांनी



इतका मोठा कापूस खरेदी करून त्याच्या सरकीची जी पेंड काढली होती. ती सारी एक्स्पोर्ट करून टाकली. आम्हाला गेल्यावर्षी सकस खाद्य मिळालेच नाही म्हणून तर आमचे पालक शेतकरी युरिया, साखर टाकून आमच्या बायप्रॉडक्टमध्ये अर्थात दुधामध्ये डिग्री आणत बसले होते. या मेल्यांना आता

**पुण्या-मुंबईपासून ते भामरागड गडचिरोलीपर्यंत एक कोटी तेरा लाख चारशे सतरा कवींना पावसाच्या कविता होऊन जातात. खरे तर या कविता निर्माण होतील या भीतीनेच कधी कधी पाऊस पडत नाही असेही निरीक्षण अनेक कृषी संशोधकांनी शोधून काढलेले आहे.**

असा शाप देते की यांना यावेळी असा कापूस खरेदी करायला मिळो की ज्याच्या तंतूमध्ये सारे सत्व येवो आणि यंदा माझ्या साऱ्या शेतकऱ्यांना प्रक्रियेआधीच्या कापसालाच इतकी मागणी येवो की यांच्या जिनिंग, प्रेसिंग गंजून जाव्यात. हा बोलून चालून म्हशीचा आशीर्वाद आहे. जो आम्ही ऐकला आहे. सौभाग्यवती म्हैस ही राजमान्य राजश्री हलगटराव यांची अर्धांगिणी असल्याने व हे हलगटराव यमराजाचे अधिकृत वाहन असल्याने मृत्यूभयासारखे हे भयसुद्धा खरे ठरणारच आहे म्हणून पुन्हा एकदा आम्ही म्हणतो तथास्तू !!

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com
टेम्परसी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■